मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला.

पुस्तक ५८ वें.

# भ्रमनिरसन.

[ पांच अंकी नाटक. ]

श्रीयुत विठ्ठल सीताराम गुर्जर,

यांनीं लिहिलें.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,

गिरगांव-मुंबई.

[ प्रथमावृत्ति. ]

किंमत ०-६-० ] सर्व हक्क स्वाधीन. [ जून १९११.

Printed at the Nirnaya Sagar Press, Kolbhat lane 23, Bombay,
by B. R. Ghaneker, and Published by Kashinath R.
Mitra, at the Manoranjan Office, 526 Girgaon
Rd., Bombay.

# अर्पणपत्रिका.

जिच्या मधुर व प्रेमळ सहवासांत पृथ्वीचा स्वर्ग होतो
त्या प्रिय व्यक्तीस ही कृति सप्रेमादर
अर्पण करितों.

वि. सी. गुर्जर.

# या नाटकांतील पात्रें.

| | |
|---|---|
| **भाऊसाहेब** | एक वृद्ध गृहस्थ. |
| **माधव** | एक श्रीमंत तरुण. |
| **मनोहर** | माधवाचा कनिष्ठ बंधु ( कवि ). |
| **मधुकर** | मनोहराचा मित्र. |
| **बापूसाहेब** | भाऊसाहेबांचे शेजारी वृद्ध गृहस्थ. |
| **पद्या** | माधवाचा नोकर. |
| **मनोरमा** | माधवाची सुशिक्षित पत्नी. |
| **उषा** | भाऊसाहेबांची विदुषी कन्या. |
| **सुशीला** | भाऊसाहेबांची विदुषी भाची. |
| कांहीं गृहस्थ इ. | |

**स्थल—हेमन्तपुर.**

# भ्रमनिरसन.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

[ **स्थल**—भाऊसाहेबांच्या बंगल्यासमोरील बाग. भाऊसाहेब व बापूसाहेब एका बांकावर बोलत बसले आहेत, असा प्रवेश. ]

**बापूसाहेब**—भाऊसाहेब ! मीं तुह्माला तेव्हांच सांगितलें होतें, कीं, तुमचे हे चाळे आमच्या जुन्या डोळ्यांनां कांहीं बरे दिसत नाहींत ह्मणून ! पण आमचें ऐकतो कोण ! घ्या, भोगा आतां त्याचीं हीं फळें ! अरे, जगांत का कुणाला मुलें नाहींत, का कुणाची आपल्या मुलांवर प्रीति नाहीं ? पण तुमची आपली कांहीं मुलखावेगळी विलक्षणच रीत ! भाऊसाहेब ! पुरातन कालापासून चालत आलेल्या गोष्टींत एकदम उलथापालथ करणें कधींहि श्रेयस्कर होत नाहीं बरें !

**भाऊसाहेब**—जाऊंद्यात बापूसाहेब आतां त्या गोष्टी ! मला तर त्यांचा कसा अगदीं वीट येऊन गेला आहे !

**बापूसाहेब**—वीट येईल नाहीं तर काय ? मी ह्मणतों, तुह्मी मुलींनां खुशाल शिक्षण द्या, अगदीं उच्च, अत्युच्च शिक्षण द्या; खऱ्या शिक्षणापासून पुरुषांचें असो, किंवा स्त्रियांचें असो, अपरिमित कल्याणच व्हावयाचें ! पण तुमची शिक्षण देण्याची ही कुठली विलक्षण रीत ! तुमच्या पोरीच्या आईला धड ट फ सुद्धां करतां येत नव्हतें, अन् तुह्मीं तर पोरीला बनविलीत मडम ! गाणेंबजावणें, फार काय, नाचणें देखील पोरीला शिकवायला तुह्मीं कमी केलेंत नाहीं ! ही का रीत झाली ?

**भाऊसाहेब**—हा सारा केवळ शिक्षणाचा परिणाम, असें मी केव्हांहि ह्मणावयास तयार नाहीं ! उच्च शिक्षणानें विभूषित झालेल्या किती तरी विदुषी,

आपल्या विनयादि सद्गुणांनीं आमच्या समाजाला भूषण झाल्या नाहींत का? पण जाऊंद्या बापूसाहेब! झाल्यागेल्या गोष्टींचा आतां मागाहून खल करण्यांत फायदा काय?

**बापूसाहेब**—काय! मागाहून खल? उषेला कॉलेजांत पाठविण्याच्या तुमच्या बेताला हा बापू अगदीं पहिल्यापासून विरुद्ध होता; पण तुह्मीं कुठें ऐकलेंत त्या वेळीं माझें?

**भाऊसाहेब**—बापूसाहेब! माझा तरी काय इलाज? लहान उषेला आणि मला विरहांत लोटून माझी प्रिय पत्नी निष्ठुरपणानें स्वर्गाला एकटीच निघून गेली—( डोळे पुसतो. ) तेव्हांपासून माझी उषाच काय ती माझें जीवनसर्वस्व होऊन बसली! माझ्या जीवनाला उषाच काय ती आधार होऊन राहिल्यामुळें माझ्या प्रेमाला तिच्याशिवाय दुसरें स्थानच नाहींसें झालें. ती जें जें कांहीं ह्मणेल तें तें मी मुकाट्यानें करूं लागलों. उषा जें जें ह्मणेल तें तें मी तिला देऊं लागलों. फाजील लाडांनीं ती बिघडेल, हें ठाऊक असतांहि केवळ आंतड्याच्या ओढीमुळें माझ्या मातृहीन उषेचे मी सर्व लाड पुरवूं लागलों. माझी उषा एखाद्या मोठ्या घराण्यांत पडावी या हेतूनें तिचें मराठी शिक्षण झाल्यावर मी तिला इंग्रजी शिक्षण देऊं लागलों. पोर विलक्षण तीक्ष्ण बुद्धीची असल्यामुळें थोड्याच अवकाशांत तिची पहिली परीक्षा उतरली. येथेंच तिचें शिक्षण पुरें करावें, अशी माझी फार इच्छा होती; पण माझे ते मेहुणे–ह्मणजे उषेचे मामा आहेत कीं नाहीं–अण्णासाहेब, त्यांनीं याच सुमारास आपल्या मुलीला कॉलेजांत घातली होती, ते उषेलाहि कॉलेजांत पाठविण्याबद्दल माझ्या फार पाठीस लागले.

**बापूसाहेब**—ठीक ठीक! बरें पुढें?

**भाऊसाहेब**—उषेला मीं मुंबईस अण्णासाहेबांच्या इथेंच ठेविली होती. स्त्रियांनां म्युझिक–संगीता–चें ज्ञान असणें अवश्य आहे, असें आमच्या अण्णासाहेबांचें मत असल्यामुळें त्यांनीं माझी संमति न घेतां आपल्या मुलीबरोबरच उषेलाहि गायनवादनाचें शिक्षण सुरू केलें. अण्णासाहेब नाटकांचे फार शोकी असल्यामुळें त्यांच्याबरोबर नाटकें पाहून या दोघी पोरीहि नाटकांच्या पुऱ्या शोकी बनल्या! पुढें अण्णासाहेब पेन्शन घेऊन आपल्या गांवीं आले व त्यांनीं आपल्या मुलीचें लग्नहि केलें. पोरीचें झालें इतकें शिक्षण पुरे झालें, असा विचार करून अण्णासाहेबांकडून उषेला मीहि इकडे घेऊन आलों, अन्

तिच्या लग्नाच्या तजविजीस लागलों; पण पहातों तों कादंबऱ्यांनीं अन् नाटकांनीं पोरीचें मस्तक पूर्ण फिरून गेलेलें! आपल्याला लग्नच करायचें नाहीं, असा ती हट्ट धरून बसली आहे. मीं शिकस्त केली, पण ती हट्टी कारटी कांहीं केल्या आपला हट्ट ह्मणून सोडित नाहीं !

**बापूसाहेब**—मग पुढें तुमचा विचार काय आहे? पोरगी लग्न करित नाहीं ह्मणून तुह्मी कपाळावर हात देऊन स्वस्थ बसून रहाणार कीं काय ?

**भाऊसाहेब**—मग करूं काय बापूसाहेब ? मी तर बुवा त्या कारटीपुढें हात जोडले! मला ती एक शब्दहि बोलूं देत नाहीं!

**बापूसाहेब**—अहो, पोरगी असा भलताच हट्ट धरून बसली, ह्मणून तिचें का ऐकायचें आहे? हिंदूची मुलगी, तिचें लग्न हें झालेंच पाहिजे, असें शास्त्र आहे. कादंबऱ्या अन् नाटकें वाचून अशा भलल्यासलल्या खुळसर कल्पना पुष्कळ सुशिक्षित मुलांच्या अन् मुलींच्या डोक्यांत शिरतात! लग्न करायचें नाहीं ह्मणून किती तरी तरुण मुलें हट्ट धरून बसतात! या हट्टी रोगाला रामबाण औषध काय ठाऊक आहे भाऊसाहेब ?

**भाऊसाहेब**—काय ?

**बापूसाहेब**—जबरदस्तीनें त्यांचें लग्न करून देणें! एकदा का लग्न झालें, ह्मणजे ही मंडळी आपोआप ताळ्यावर येते! अन् ज्यांनां 'लग्न' हा शब्द देखील सहन होत नसतो, तीच मंडळी मग आपल्या नवऱ्याला किंवा बायकोला डोक्यावर घेऊन नाचूं लागतात! भाऊसाहेब! एखादें चांगलेंसें स्थल पाहून तुह्मी तावडतोब उषेचें लग्न करून टाका, समजलांत?

**भाऊसाहेब**—अहो, समजलों सारें, पण उमजत नाहीं ना, त्याला काय करूं ? उपाध्येबुवा अन् मी स्थलें पाहून दमलों. जे जे मुलगी पहायला येतात, त्यांनां ती पसंतहि पडते—

**बापूसाहेब**—पसंत न पडायला काय झालें ? अशी नक्षत्रासारखी सुंदर, उपवर, सुशिक्षित मुलगी कोणाला नाहीं पसंत पडणार? पण पुढें अडतें कशावर घोडें ?

**भाऊसाहेब**—घोडें अडतें उषाताईसाहेबांच्या खुषीच्या खडकावर! कोणी तिला पहायला आल्यावर तिच्या अंगचा नुसता संताप होऊन जातो! त्याच्या तोंडावर ती बेलाशक सांगते, कीं, आपल्याला लग्न करावयाचें नाहीं! जुलमानें आपलें कोणीं लग्न केलें तर आपण गळ्याला फांस लावून जीव देऊं!

**बापूसाहेब**—तर मग तिच्या मनांत तरी आहे काय ?

**भाऊसाहेब**—तें माझें मलाच समजत नाहीं-तिच्या वेडावलेल्या मनांत आहे काय याचा मला पत्ताहि लागत नाहीं ! पाठीवर केश मोकळे सोडून एखाद्या वेडीप्रमाणें घरभर ती फिरत असते. फिरतांना तोंडानें गायन व हातांनीं हातवारे सुरू असतात ! सारा दिवस ती याप्रमाणें फिरत तरी असते, किंवा वाचित तरी असते. वाचतां वाचतां तिच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागतात; कधीं कधीं हर्षभरानें तिचें मुख उज्वल दिसूं लागतें; कधीं मोठ्या आरशासमोर उभी राहून हातवारे करीत ती बडबडतच रहाते ! माती अन् धोंडे ! ती काय करते तें मला ह्मातार्‍याला नीटसें कळत देखील नाहीं ! हा सर्व प्रकार पाहून मीं—

**बापूसाहेब**—काय केलेंत तुह्मीं पुढें ?

**भाऊसाहेब**—माझ्या भाचीला आमच्या घरीं आणली. ती तिची जिवाची मैत्रीण असल्यामुळें तिच्या शिकवण्यानें अन् उपदेशानें उषा सुधारेल, अशी माझी खात्री होती. तिचें लग्न झालें आहे, तिचा नवरा प्रोफेसर आहे ह्मणे ! आमच्या उषेला नीट उपदेश करून ताळ्यावर आणण्याऐवजीं माझ्या भाचीनें उलट तिचें मस्तक अधिकच भडकावून दिलें ! बापूसाहेब, असा हा माझा भोग आहे ! आमच्या घरीं असें कोणी बायको मनुष्य नाहीं, कीं, भडकलेल्या डोक्यांच्या या दोन्हीं पोरींचीं डोकीं उपदेशानें किंवा धाकदपटशानें शांत करील !

**बापूसाहेब**—तुमच्या उषेला वेड तर नाहींना लागलें ?

**भाऊसाहेब**—मनांतलें दुःख तुमच्यासारख्या मित्राशिवाय दुसर्‍या कुणाला सांगायचें आहे बापूसाहेब ? खरोखर, वेडी होऊन जर उषेचें मस्तक फिरलें असें ह्मणावें, तर खाण्यापिण्यांत अन् नटण्यामुरडण्यांत तिचें लक्ष्य अगदीं बरोबर ठिकाणावर दिसतें ! ती तर कांहीं वेडी झाली नाहीं; पण मी मात्र तिच्यामुळें वेडा होऊन गेलों आहें ! अन् मला अभाग्याला मरणहि नाहीं येत ! ह्मणजे हें सर्व मला पहायला नको होतें. पोरीवर मी फार प्रेम करूं लागलों ह्मणून देव मला हें शासन करतो आहे ह्मणायचा !

**बापूसाहेब**—भाऊसाहेब, उषेला तुह्मीं एखाद्या डाक्टराला किंवा वैद्याला दाखविली होती ?

**भाऊसाहेब**—डाक्टर अन् वैद्य का कुठले बाकी ठेवले आहेत मीं ? डाक्टरांच्या औषधांच्या मीं बाटल्या विकल्या त्याचेच मला पन्नास रुपये आले ! अन् वैद्यांच्या औषधांच्या पुड्यांच्या कागदाचे पंधरावीस रुपये तरी खास येतील !

**बापूसाहेब**—एकूण, रोग फार जबरदस्त आहे ह्मणायचा!

**भाऊसाहेब**—असें तर खरेंच. परंतु देवाच्या मनांत असेल तर माझें दुःख नाहींसें होण्याचा योग–

**बापूसाहेब**—हां ! काय ह्मणतां ? सांगा पाहूं तर मग लवकर !

**भाऊसाहेब**—ते पलीकडच्या मंगळपुऱ्यांतले नानासाहेब, ठाऊक आहेत कीं नाहींत तुह्माला ते ? ते मोठे घरवाले अन् तीनचार गाड्या आहेत ते, बडे सावकार नानासाहेब ?

**बापूसाहेब**—हां हां, पण त्यांचें काय ?

**भाऊसाहेब**—त्या नानासाहेबांचे चंद्रसूर्यांसारखे दोन सुंदर मुलगे आहेत. त्यांपैकीं धाकट्या चिरंजीवांची आमच्या उषेशीं लग्न करायची फार इच्छा आहे ह्मणे—

**बापूसाहेब**—त्यांची असेल इच्छा ! पण तुह्मीच ना आतां ह्मणालांत, कीं, पोरगी साफ लग्नच करायचें नाहीं ह्मणते ह्मणून ?

**भाऊसाहेब**—होय, तेंच तर मोठें दुःख आहे मला ! बापूसाहेब, याच विचारानें माझ्या मस्तकाला तीव्र यातना होतात ! करूं काय ? मला आतां माझे प्राण देखील जड झाले आहेत ! नानासाहेब सावकारांच्या स्थळासारखें स्थळ आह्मांला कोठून मिळणार आहे ? संपत्तीला तोटा नाहीं, घरचीं मनुष्यें अति सज्जन, शिवाय जांवईबुवांची बी. ए. ची परीक्षाहि उतरली आहे ह्मणे–

**बापूसाहेब**—स्थळ तर खरोखरच नामी आहे !

**भाऊसाहेब**—अन् जांवईबुवा स्वतः होऊन उषेशीं लग्न करायला तयार झाले आहेत! काय सांगूं बापूसाहेब! मुलगा पण मुलगा आहे! जणूं एखादा राजपुत्रच ! पण करणार काय? कारटी कांहीं लग्नाला कबूल व्हायची नाहीं !

**बापूसाहेब**—मग आतां याला उपाय ?

**भाऊसाहेब**—उपाय भगवंताची इच्छा! मनोहरपंतां– जांवईबुवां–च्या कानांवर उषेविषयींची ही हकीगत गेली होती, परंतु तिनें त्यांचा धीर खचला नाहीं. ते ह्मणाले, एकदा तिचें मला दर्शन घडूंद्या, तिच्याशीं मी लग्न करीनच !

**बापूसाहेब**—अस्सें ? मग पुढें ?

**भाऊसाहेब**—( हंसत ) मनोहरपंत माझ्या सूचनेवरून उषेला भेटायला आतांच तिच्याकडे गेले आहेत. मी तिथें असलों तर पोरगी लाजेलबिजेल, ह्मणून मी चटकन् इथें बागेंत येऊन बसलों. पोरीला परमेश्वरकृपेनें जर सुबुद्धि झाली—

**बापूसाहेब**—परमेश्वर करो अन् मनोहरपंतांनां यश मिळो !

**भाऊसाहेब**—बहुतकरून त्यांनां यश मिळाल्याखेरीज रहाणार नाहीं ! मनोहरपंतांनां मी अगदीं लहानपणापासून पहातों आहें, त्यांनां अपयश कोठेंच आलें नाहीं. लहानपणीं ते आमच्याकडे किती वेळ तरी येत असत—

**बापूसाहेब**—पण हे पहा मनोहरपंतच आले—

[ घरांतून मनोहर येतो. ]

**भाऊसाहेब**—या मनोहरपंत, काय, काम फत्ते ना ?

**मनोहर**—क्षमा करा भाऊसाहेब ! आपल्याजवळ मी कोणत्या तोंडानें बोलूं ? माझ्या साऱ्या जन्मांत माझा असा अपमान कधीं झाला नव्हता—

**भाऊसाहेब**—काय ? काय झालें असें ?

**मनोहर**—आपल्या कन्येला मीं तिचें नांव विचारलें मात्र, तों ती मोठमोठ्यानें हंसून मजवर कांहीं तरी अद्वातद्वा तोंडसुख घेऊं लागली. भाऊसाहेब, केवळ—

**भाऊसाहेब**—( मनोहराचा हात धरून ) मनोहरपंत, रागाऊं नका. आमचेंच दुर्दैव ह्मणायचें ! तुमचा तरी त्याला काय उपाय ? मनोहरपंत ! तुमचा आमचा आप्तसंबंध लक्ष्यांत आणून आमच्यावर रागावूं नका. त्या मूर्ख कारटीचें डोकें अगदीं फिरून गेलें आहे. कुणाला काय बोलावें, कुठें काय करावें, याचें तिला ज्ञान नाहीं. तिच्या तें डोक्यांतच येत नाहीं; परंतु लग्न झाल्यावर हें तिचें वेड तत्क्षणीं उतरेल, अशी माझी खात्री आहे.

**बापूसाहेब**—हें नुसतें शिक्षणानें आलेलें वेड आहे मनोहरपंत ! कधीं कधीं शिक्षणानें पुरुषांचीं मस्तकेंहि भडकून गेल्याचीं उदाहरणें आह्मी पहातों, मग उषा तर काय बोलूनचालून लहान पोर आहे !

**मनोहर**—नाहीं भाऊसाहेब, मी कुणावरहि रागावलों नाहीं. ( दीर्घ निश्वास टाकून ) माझ्या मनाला बरेच क्लेश झाले. मी आजपर्यंत—

**भाऊसाहेब**—मनोहरपंत ! त्या मूर्ख पोरीचे शब्द आपण मनावर घेऊं नका. तुमच्या वडिलांशीं माझा फार स्नेह होता. अहाहा ! काय त्यांची योग्यता–

**बापूसाहेब**—नानासाहेब ह्मणजे एक रत्न होतें बरें रत्न ! आमच्या हेमन्तपुरांत आजपर्यंत नानासाहेबांसारखा मनुष्य झाला नाहीं.

**भाऊसाहेब**—मनोहरपंत, तुह्मी नानासाहेबांनां अगदीं योग्य चिरंजीव आहांत. झाल्यासवरल्या गोष्टी आपण मनांतच आणूं नका अन् आह्मांला पदरांत घ्या. लग्न झाल्यावर उषेचें डोकें खास ठिकाणावर येईल.

**बापूसाहेब**—लग्न झाल्यावर स्त्रीपुरुषांचे अनेक असाध्य रोग बरे होतात.

**मनोहर**—नाहीं भाऊसाहेब ! आपणावर रागवायला मी का वेडा आहें ? तरी पण उषेनें असें—

**भाऊसाहेब**—ती गोष्ट तुह्मी आतां मनांतून काढून टाका. तुमचा अपमान केल्याबद्दल मी तिला चांगलें शासन करीन. बरें, मुहूर्त निश्चय करण्यासाठीं तुमच्या बंधूंकडे मी कधीं येऊं ?

**मनोहर**—मी–मी–त्याबद्दल आ–आपणाला कळवीन—

**भाऊसाहेब**—चला तर आंत. फराळ करून जा—

**मनोहर**—नको भाऊसाहेब. मी कांहीं आपणाला परका मानित नाहीं. मी येतांना फराळ करूनच निघालों होतों—

**भाऊसाहेब**—तें कांहीं चालायचें नाहीं, मनोहरपंत—

**मनोहर**—माफ करा भाऊसाहेब—

**बापूसाहेब**—अहो भाऊसाहेब ! ही मंडळी ह्मणजे young India ! बडी नाजूक ! आमच्या ह्मातार्‍यांसारखें का यांचें खाणें आहे ? एका लवंगेनें यांनां उष्णता अन् एका वेलचीदाण्यानें थंडी होते ! Dyspepsia तर यांच्या षष्ठीला पुजलेला ! तोंडपाटीलकीला अन् वक्तृत्व करायला मात्र यांचा गळा मोकळा अन् खायला आवळलेला !

**भाऊसाहेब**—हाः हाः हाः ! वाः, छान चित्र काढलेंत बापूसाहेब ! येतां बापूसाहेब ? ( स्वगत ) त्या कारटीला कधी भेटेनसें मला झालें आहे.

**बापूसाहेब**—नाहीं, पंडितांच्या लग्नाच्या प्रयोजनासाठीं यादी करायला मला जायचें आहे.

[ जातात.

**भाऊसाहेब**—मग नाहीं येत मनोहरपंत ? उषेचे शब्द मनांत घेऊन कष्टी होऊं नका—

**मनोहर**—माझ्यापेक्षां आपल्या मनालाच फार कष्ट होत आहेत !

**भाऊसाहेब**—तुह्मीच या संकटांतून आमचें संरक्षण करणार आहां मनोहरपंत ! बरें, येऊं मी आतां ?

[ जातात.

**मनोहर**—( निःश्वास टाकून ) सुंदरी उषेच्या दिव्य दर्शनानें माझें मन अधिकच अस्थिर होऊन गेलें आहे ! तिच्यावर राग धरावयाला तिचे शब्द माझ्या मस्तकांत राहिले आहेत कुठें ? तिच्या त्या रमणीय मुखाकडे पहात असतां ते पार कोठच्या कोठें नाहींसे झाले ! काव्यांत अन् नाटकांत अनेक पाषाणहृदयी रमणी कवींनीं रंगविल्या आहेत, त्यांपैकींच ही रमणी असेल का ? असेल तर माझ्या अश्रुजलांनीं देखील का या पाषाणांत प्राणसंचार होणार नाहीं ? या सुंदरीच्या निवासस्थानावरून नेहमीं जात येत असतां एखाद्या नायिकेप्रमाणें ही रमणी आपले भ्रमरकृष्ण केश पाठीवर मोकळे सोडून, हातांत पुस्तक धरून खिडकींत उभी राहून गुणगुणतांना माझ्या किती वेळ तरी दृष्टीस पडली आहे ! काय तिच्या नेत्रांतील मादकता ! सायंकालींहि घराच्या गच्चीवर, आपल्या रमणीय मुखचंद्राच्या प्रभेनें नुकत्याच उदय पावणाऱ्या चंद्राला दिपवून टाकित, ही रमणी इकडून तिकडे येरझारा करतांना मला किती वेळ तरी दिसली आहे ! जणूं काय शेक्स्पियरची जूलिएट गच्चीवर फिरत आहे ! उषेच्या या ललित चेष्टांनींच माझें मन विवश होऊन मी तिच्या प्रेमपाशांत सांपडलों ! आजपर्यंत घरीं बसून उषेला उद्देशून कवितेंत मीं माझें हृदय उघड केलें; परंतु आज तिच्या प्रत्यक्ष भेटीचा प्रसंग आला, तेव्हां मात्र मला तिच्याकडे धड पहावेना ! मग हृदय उघडण्याची गोष्ट दूरच राहिली. निष्ठुर पाषाणहृदये उषे ! माझ्या हृदयांतील प्रेमाची अगाधता तुला दिसली देखील नाहीं का ? नाहीं तर तूं माझा असा उपहास कां केला असतास ? तुला माझ्या जीवनाची चिरसहचरी करीन, तरच माझ्या जन्माचें सार्थक ! नाहीं तर–नाहीं तर काय ? नाहीं तर ती काव्यरचना, अद्भुत प्रेममयता, व्यर्थ होय ! तुझ्याशिवाय हें विषमय जीवित कंठण्यापेक्षां सारा जन्म अरण्यांत संन्यासवृत्तीनें घालविलेला काय वाईट ?

[ जातो.

---

## प्रवेश दुसरा.

[ **स्थल**—भाऊसाहेबांच्या बंगल्यांतील उषेची खोली. आरशासमोर उभी राहून उषा तोंडाला पावडर लावित आहे, तिचे मोकळे केश सुशीला झाडित आहे, असा प्रवेश. ]

**उषा**—( गाते )

**केश-पाशिं रचिं मम सखये ! सुरभिकुसुममाला । ही ॥ ध्रु० ॥**
**अंगरागिं सुमभूषणिंही भूषवीं तनूला ।**
**शांतवीन अभिनव वेषें विरहगुरुज्वाला ॥ १ ॥**

**सुशीला**—वहावा ! तुझा हा ' अभिनव ' वेष मोठ्या बहारीचा आहे ह्मणायचा !

**उषा**—( सुस्कारा टाकून ) गडे सु—

**सुशीला**—काय ह्मणत्येस उ ?—

**उषा**—गडे सु ! मी तर या अभिनव वेषानं सज्ज होऊन तापसी बनल्यें आहें. पण माझ्या विरहानलानं संतप्त होऊन विजन अरण्यांत, नदी-सागरतीरावर आपल्या बांसरींतून विरहसंगीत गाणारा तो हृदयवल्लभ नवीन तापस कुठं आहे ?

**सुशीला**—मला तें कसं बरं सांगतां येईल उ ? मला कांहीं Telepathy समजत नाहीं !

**उषा**—तर मग माझा हा तापसी वेष फुकट जाणार का ? हा फुलांनीं खचलेला अन् पाठीवर स्वच्छंदानं लोळणारा ' घनकृष्ण ' केशकलाप, हा अंगरागविभूतीनं भूषित झालेला देह, हें भगवं परिधानवस्त्र—

**सुशीला**—काय भगवं परिधानवस्त्र ? माझ्या डोळ्यांला तर ही चांगली रेशमी नारिंगी साडी दिसत्ये आहे—

**उषा**—तूं अगदीं पक्की अरसिक आहेस सु ! अग, ही साडी नसून तापसवेषाला योग्य असं हें परिधानवस्त्र आहे अशी नुसती कल्पना करायची !

**सुशीला**—हो का ? माझ्या नव्हतं हें लक्ष्यांत आलं ! पण तापसी बनून तूं आतां जाणार कुठं ?

**उषा**—( सुस्कारा टाकून गाते )

**वनिं उद्यांच जाइं निघोनी । हें रम्य वदन येथोनी । नच बघशिल सखये ! नयनीं । निश्चय जाण खरा—**

**सुशीला**—कां बरं? वनांत जाण्याइतकी कां बाई तूं विरक्त झाली आहेस?

**उषा**—वेडे! प्रणयिजनांचं प्रथम मीलन विजन अरण्यांतच व्हायचं हो! व्यर्थ व्यर्थ आजपर्यंत तूं इतकीं नाटकं वाचलींस अन् पाहिलींस! शाकुंतलांत शकुंतलेची अन् दुष्यंताची प्रथम भेट वनांतच झाली; शापसंभ्रमांत पुंडरीकाची अन् महाश्वेतेची गांठ अरण्यांतच पडली; पुढं तिचा हृदयेश्वर वैशंपायन झाल्यावरहि त्याची अन् तिची भेट वनांतच झाली आहे—

**सुशीला**—खरं ग खरं गडे उ! वीरतनयांत शूरसेन नि शालिनी यांचीहि पहिली भेट अरण्यांतच झाली आहे—

**उषा**—अन् शेक्स्पियरच्या नाटकांत दिखील तसंच. त्या Winter's Tale मधें राजपुत्राची व त्याच्या हृदयवल्लभेची गांठ वनांतच झाली! कांदब-यांतून दिखील नायकनायिकेचं प्रथम मीलन अरण्यांतच व्हायचं! बंकीमची तिलोत्तमा अन् जगत्सिंह यांचं अरण्यांतील मंदिरांतच मीलन झालं कीं नाहीं? (निःश्वास टाकून) परंतु अरेरे! माझा हा अभिनव तापस वेष अन् माझा हा उच्छ्वसित मुकुलित नव अनुराग शुष्क व्हायचा आहे अं?

**सुशीला**—हाय हाय—(गाते)

> **'सकल अनुराग हा व्यर्थ पाहीं!'**

**उषा**—गडे सु!

**सुशीला**—काय ह्मणत्येस गडे उ?

**उषा**—बाबा ह्मणतात, लग्न कर—

**सुशीला**—काय? लग्न कर, अगदींच गांवढळ बाई-मामांच्या कल्पना! मला वाटतं, अजून ते पहिल्या शतकांतच रेंगाळताहेत! लग्न करून स्त्रियांनीं पुरुषांच्या दासी व्हावं, असंचं त्यांचं मत कीं नाहीं? अन् मुंडावळ्या लावल्या, वरघोडा काढला, ताशाचौघड्यांचा थयथयाट केला, ह्मणजेच का लग्न होतं, असं त्यांनां वाटतं?

**उषा**—अग बाईग! कोण तो ताशाचौघड्यांचा कर्कश आवाज! कुठं हे मेलं राक्षसी लग्न अन् कुठं कादंबरीनाटकांत वर्णन केलेलीं romantic लग्नं! अहाहा! क्लॅरिनेटचा किंवा बांसरीचा मधुर स्वर चहूंकडे दुमदुमून राहिला आहे, कलकल शब्द करित मंद वहाणाऱ्या नदीच्या तीरावर किंवा सरोवराच्या तीरावर नायिका बसली असतां तिच्यामागून तिचा हृदयवल्लभ येऊन तिच्या गळ्यांत हळूच फुलांची माळ घालतो आहे-अहाहा—

**सुशीला**—अहाहा! त्या प्रेमप्रसंगाचं कुणाला यथातथ्य वर्णन का करतां यायचं आहे? तें प्रेम ह्मणजे केवळ अनिर्वचनीय, अचिंतनीय, स्वर्गीय! त्यांत अद्भुत कवित्व कसं परिपूर्ण भरून राहिलेलं असतं! जवळपास कुठं कुणी नाहीं! केवळ एकाचे दोन डोळे दुसऱ्याच्या दोन डोळ्यांकडे लागून राहिलेले असतात! इकडे सोसाट्याचीं वादळं उठोत कीं जलप्रलय होवो, या दोघांच्या प्रेमनिरीक्षणांत कुणाचा व्यत्यय यायचा नाहीं! सरोवराच्या तीरावर तें प्रणयियुग्म एकमेकांकडे प्रेमपूर्ण दृष्टीनं पहात असतां त्यांच्या सभोंवार अनंत प्रेमाची अखंड रागिणी सुरू असते—

**उषा**—अन् त्या अखंड प्रेमरागिणींत रमणीचा मंजुल कंकणध्वनि आणि मधुर नूपुररव सुरू असतो! ( गातेः )

**‘ पायीं पैंजण सिंजित करितां मंजुल किणकिण नाद।**
**श्रवणातें।**
**सुख होतें।**
**शतधा तें।**
**मन धातें।—**

**सुशीला—**

**वसुधासुधारस अनुभवि जो नर सेवी प्रेमास्वाद!’**

[ भाऊसाहेब पाय आपटित प्रवेश करतात. ]

**भाऊसाहेब**—( ओरडून ) काय ग ए कारटे!—

**उषा**—हें काय बाबा! छे, छे! अशा या सुंदर मधुर काळीं—

**सुशीला**—बांसरीच्या मंजुल तानेच्या ऐवजीं—

**उषा**—कर्कश कंठांतून तालसूरहीन ‘ कारटे! ’ इश्श ग बाई!

**भाऊसाहेब**—काय ग पोरींनों? काय ही तुह्मीं बडबड चालविली आहे?

**उषा**—हाय गडे सु!—

**सुशीला**—उः!—

**भाऊसाहेब**—मी काय ह्मणतों तें तुमच्या अजून कानावर गेलें नाहीं वाटतें! कान फुटले कीं काय तुमचे?

**उषा**—सुशिक्षित स्त्रियांशीं कसं बोलावं, तें तुह्मी अगोदर शिका बाबा! छी छी, कधीं तुह्माला हें समजणार?

**भाऊसाहेब**—काय शिकायचें ग पोरी?

**सुशीला**—विश्रम्भालाप !

**भाऊसाहेब**—गप्प रहा पोरटे ! उषे, तूं काय ही थट्टा चालविली आहेस माझी ?

**उषा**—असं काय केलं मीं बाबा ? काय ह्मणतां तुह्मी ?

**भाऊसाहेब**—कारटे ! आज तूं काय केलेंस हें ? असा श्रीमंत, विद्वान्, सुरूप, तरुण चांगुलपणानें आपण होऊन तुला पहायला आला असतां तूं त्याचा अपमान केलास अं ?

**उषा**—गडे सु—

**सुशीला**—( आश्चर्यानें ) हें काय प्रकरण आहे बाई !

**भाऊसाहेब**—प्रकरण तुझ्या डोचक्याचें ! असा सोन्यासारखा सद्गुणी तरुण आणि होऊन तुला पहायला आला असतां तूं त्याचा अपमान कां केलास ? त्याच्यांत तूं काय वैगुण्य पाहिलेंस ? त्याच्या चार परीक्षा झाल्या आहेत, तुझ्यापेक्षां देखील तो विद्वान् आहे.

**उषा**—ओ हो ! आतां आलं माझ्या लक्ष्यांत गडे सु !

**सुशीला**—काय तें बाई ?

**उषा**—अग ती जुनीपुराणी गोष्ट-ती रानटी खुळी चाल-लग्न !

**सुशीला**—काय-लग्न ? ( हंसते. )

**भाऊसाहेब**—उषे ! आजपर्यंत तुझ्या मनाला लागेल असा एक शब्द देखील मी तुला बोललों नाहीं, त्यामुळें शेफारून जाऊन तूं हे नवे नवे ढंग शिकली आहेस, नाहीं ? पण दम धर, तुझे हे सारे ढंग काढतों आतां बाहेर—

**उषा**—बाबा, आज तुमचं डोकं नाहीं ठिकाणावर खास ! अगोदर तुह्मी शांत व्हा-मग मी तुमचं काय ह्मणणं आहे तें ऐकून घेईन. अशा या निर्जन, मधुर सायंकालीं तुमची बडबड ऐकून घ्यायला मला वेळ नाहीं—

**भाऊसाहेब**—कारटे ! मोठ्या दोन परीक्षा झाल्या ह्मणून शेफारून जाऊन प्रत्यक्ष वडिलांनां वाटेल तसें बोलतेस नाहीं ? पण आज तुझें भडकलेलें डोकें ताळ्यावर आणल्याखेरीज नाहीं मी रहात—

**सुशीला**—( एकीकडे ) गडे उ ! मुकाट्यानं ऐकून घे त्यांचं ह्मणणं—

**उषा**—काय बाबा ? आज असं माझ्यावर अगदीं रागवायला काय झालं तुह्माला ?

**भाऊसाहेब**—पोरी, तूं इंग्रजी शिकून विद्वान् झालीस ह्मणून तुझ्या या ह्मातान्या बापाचं अगदींच ऐकूं नये असें नाहीं ! (सद्गदित कंठानें ) तुझी आई गेल्यापासून तुझ्याशिवाय मला कोण आहे बरें ? तूं लहानाची मोठी कशी होशील, मोठी झाल्यावर तुला चांगलें स्थळ कसें मिळेल, तूं सासरीं चांगली नांदूं लागून तुझें कल्याण कसें होईल, अशी अनेक तऱ्हेची काळजी वाहून वाहून हे माझे केंस पांढरे झाले. तुला एकदा चांगला पति मिळाला ह्मणजे मी सुखानें डोळे मिटीन. उषे ! आजपर्यंत झाला तो हट्ट पुरे झाला. तुला अगदीं तुझ्या मनाप्रमाणें नवरा पाहून देतों. विलायतेहून ब्यारिस्टर होऊन आलेला विद्वान् नवरा पाहिजे असेल तरी देखील माझी त्याला ना नाहीं. तुझ्या सुखासाटीं वाटेल तितका पैसा खर्च करायलाहि मी मागेंपुढें पहाणार नाहीं—

**उषा**—( तिरस्कारानें ) काय ! पुनः लग्नाची गोष्ट ? लग्न ह्मणजे हृदयांतील आशालतेला खुडून टाकणारं, नीरस, चिरकालचं पुरुषांचं दासत्वच कीं नाहीं ? त्रेतायुगापासून–मांधात्याच्या वेळेपासून चालत आलेली जुनीपुराणी, गचाळ romance हीन–प्रणयशून्य–चाल, तिचंच नांव लग्न, होय ना ? नाहीं बाबा, मला साफ लग्न कर्तव्य नाहीं. ती लग्नाची हिडीस चाल मनांत आली, कीं, अंगावर कसे शहारे येतात !

**भाऊसाहेब**—हें तूं काय बोलतेस कारटे ? आज जगाच्या उत्पत्तीपासून सर्वजण लग्न करित आले ते सारे मूर्खच बेटे ? तुझे आजेपणजे, निपणजे सर्वजण लग्न करितच आले आहेत, त्यांत तूंच एक दीडशहाणी निघालीस ह्मणायची ! अन् कॉलेजांतील तुझ्या मैत्रिणींची लग्नें झालीं आहेत तींग ?

**उषा**—नाहीं बाबा, मला क्षमा करा. तुमच्या त्या रानटी चालीचा स्वीकार मी कांहीं करणार नाहीं. धाकदपटशानं अन् जोरानं का कुठं love जडत असत्ये ?

**भाऊसाहेब**—राम राम राम ! काय बोलतेस हें ? बाप ह्मातारा झाला ह्मणून त्याच्यादेखत असे हे शब्द उच्चारायला तुला लाज नाहीं वाटत ? ( सुस्कारा सोडून ) पोरी, तुझ्या मनांत तरी काय आहे ?

**सुशीला**—उषेच्या मनांत काय आहे तें मी सांगत्यें, तिला सांगायला भारी लाज वाटते हो !

**भाऊसाहेब**–तूं आलीस मोठी वकिलीणबाई ! बरें तूं सांग—

**सुशीला**—उषेला कीनई मामा ! तुमचं तें नेहमींचं गचाळ चालीचं लगिन नको आहे ! घोड्यावर बसून ताशावाजंत्र्याच्या कर्कश कडकडाटांत वर

यायचा, सर्व गांवचे लोक मंडपांत जमायचे, त्यांचा अन् घरांत जमलेल्या वायकांचा कलकलाट, भटजींच्या मंगलाष्टकांचा अन् मंत्रांचा दणका-छे छे—

**भाऊसाहेब**—ह्मणजे? मग तिला कोणत्या तऱ्हेचें लग्न हवें आहे? सांग मला! तिला नको तर मी कुणाला बोलवणार नाहीं; कांहीं गडबड केल्याशिवाय वर येईल, अन् गुपचुप लग्न होऊन जाईल; लोकांची गडबड नाहीं, कांहीं नाहीं. पण मंगलाष्टकें अन् मंगलवाद्यें यांशिवाय मात्र लग्न होणें शक्यच नाहीं. तेवढी गडबड कशी तरी सहन केलीच पाहिजे.

**उषा**—नाहीं बाबा, तीं तुमचीं तासेवाजंत्रीं मला नाहीं पसंत! काय त्यांचा तो भेसुर आवाज! वाद्यंच पाहिजेत तर क्लॅरेनेट अन् बांसरी नाहींत का? अन्-अन् काय ग सु, सारं सांगना गडे!

**सुशीला**—मी सांगत्यें सारं. डोकीला भलं थोरलं पागोटं घालून, अन् त्यावरून त्या रानटी चालीच्या मुंडावळ्या बांधून, अंगावर शालजोडी पांघरून घोड्यावर बसून वरानं येतां कामा नये—

**भाऊसाहेब**—अगदीं गाढव आहांत तुह्मी दोघीजणी! लग्नासाठीं नवरा असा नाहीं तर कसा यायचा?

**सुशीला**—एखाद्या विजन विपिनांत, मोडक्या देवमंदिरांत, सपाटून मुसळधार वृष्टि सुरू असतां कोणत्या तरी अपरिचित तरुण नायकाशीं नायिकेचं प्रथम मीलन झालं पाहिजे. नंतर पुनः त्यांचा विरह झाला पाहिजे. विरहांत प्रेमविव्हलतेनं दोघांनीं दीर्घशोकनिश्वास, करुणक्रंदन, दूतप्रेरण, शोध, यांत काल कंठला पाहिजे. नंतर नायिका विरहदुःखानं मरणोन्मुख होऊन पडली असतां एकाएकीं त्या अपरिचित तरुणाशीं तिची पुनः दृष्टिभेट झाली पाहिजे. मग नवजीवनसंचार, आकाशांत दुंदुभिध्वनि, अप्सरांची पुष्पवृष्टि, कोरस अन् शेवटीं पडदा! बस्स्—

**भाऊसाहेब**—काय मघांपासून तडतड फडफड बोललीस, तें मातीन् धोंडे, मला कांहीं देखील समजलें नाहीं! कुठलें विजन, कुठलें विपिन? कुठल्या देवळाजवळ त्याचें घर? सर्व मला नीट समजावून सांग, ह्मणजे मी त्याचा शोध करतों.

**उषा**—ओ हो! बाबा, तुह्मी कांहीं दिखील समजलां नाहीं त्यांतलं romance! तुह्माला जर तें समजतं तर तुह्मीं लग्न कर लग्न कर. ह्मणून मला भंडावून कशाला सोडलं असतं? बाबा, मी तुह्माला सांगत्यें. जशी कांहीं मीं

गच्चीवर उभी असायची; समोरून एक तरुण वीर भरधाव घोडा दवडित यायचा; मंदिराजवळ येतांच माझ्या हातांतील बकुलमाला गळून नेमकी त्याच्या गळ्यांत पडायची, परंतु तो तसाच निघून जायचा; पुढं मी अनाथ भिकारीण बनून त्याच्या शोधासाठीं देशोदेश वणवण फिरायची; शेवटीं, एके ठिकाणीं राजसिंहासनावर पहात्यें तों माझ्या हृदयवल्लभाची मूर्ति! तेव्हां झटकन् धावत जाऊन मी माझ्या जीवनदेवतेच्या चरणतलाशीं मूर्च्छित पडायची—

**सुशीला**—अहाहा! अन् त्या तरुण कुमारानं झटकन् आपला राजमुकुट काढून खालीं फेंकून द्यायचा अन् गळ्यांत बाळगून ठेवलेली शुष्क बकुलमाला काढून तिनं आपणाला व आपल्या सखीला बद्ध करून टाकायचं—जणूं काय प्रेमसूत्रानंच! इतक्यांत चहूंकडून सखीजनांनीं भैरवींत मधुर मीलनाचं अपूर्व गायन सुरू करायचं—

**भाऊसाहेब**—( त्रासून ) जळो तुमची ती बडबड! मला तुमच्या त्या अनुप्रासांच्या आणि कवितेच्या भाषणांतील एक अक्षरहि समजलें नाहीं. मला साध्या, सरळ शब्दांत सांगा. त्या तरुणाचा तुम्हीं अपमान कां केलात? आमच्याकडे तो आला हें केवढें भाग्य! बिचारा खिन्न होऊन परत गेला—

**उषा**—गडे सु! कुणाची गोष्ट सांगताहेत बाबा ही?

**सुशीला**—हं हं समजल्यें गडे, तो आतांच आला होता तो—

**उषा**—उंः, तो हतभाग्य! प्रेमानं क्षुब्ध झालेला मुलगा! त्याच्या बद्दल काय म्हणतां बाबा?

**भाऊसाहेब**—कारटे! कां उगीच चिडवितेस मला? सांग, त्याला तूं घालवून कां दिलास?

**उषा**—त्या हतभाग्याच्या मनांत लग्न करायचं होतं म्हणे!

**भाऊसाहेब**—तर मग काय माझं श्राद्ध करायचें? कारटे, त्याला काय म्हणालीस तूं?

**उषा**—त्याला लग्न काय होय बाबा? त्याच्यांत प्रणय नाहीं, romance नाहीं, स्त्रियांची मर्यादाहि ठाऊक नाहीं त्याला! तो एकदम मला विचारतो "तुमचं नांव काय? माझ्याशीं तुमचं लग्न झालेलं तुम्हाला पसंत आहे का?" ( उषा व सुशीला मोठमोठ्यानें हंसतात. ) पूर्वराग नाहीं, विरह नाहीं, प्रेमाकर्षण नाहीं, प्रणयकाव्यं नाहींत, एकदम विचारतो 'तुमचं नांव काय?'

**सुशीला**—मामा—

**भाऊसाहेब**—( रागानें ओरडून ) चूप रहा कारट्यांनों! तुह्मांला दोघींजणींनांहि मी आतां चांगली मजा दाखवतों! फुकाचें खाऊन पिऊन, कामधाम न करतां तुह्मांला खुशाल लोळायला अन् खिदळायला सांपडतें, म्हणून तुह्मांला असले हे भलभलते ढंग सुचतात, नाहीं का? घरांतल्या चाकर माणसांनां हांकून देऊन स्वयंपाक, दळणकांडण, पाणी भरणें वगैरे सारीं कामें चाबकांचा मार दे-देऊन तुमच्यापासून आतां करून घेतलीं पाहिजेत, ह्मणजे तुमचें हें सारें वेड झटकन् तुमच्या माथ्यांतून उतरेल! अन् सुशीले! तुझ्याच संगतीनें ही फार बिघडली! तुला इथें ठेवून उपयोगी नाहीं! तुला इथून आज तुझ्या नवऱ्याकडे धाडून देतों. पहिल्यानें आज ही व्यवस्था, अन् मागाहून दुसरीं कामें.

[ जातात.

**सुशीला**—(निःश्वास टाकून) गडे उ! काय ही आपली दशा! आतां पुढं काय अनर्थ होणार गडे?

**उषा**—( खिन्न होऊन ) माझं मलाच कळत नाहीं!

**सुशीला**—मामा मला तिकडे धाडणार! मग आपला हा काव्यविनोद, स्नेहालाप, प्रणयकथा, यांचा पूर्ण लोप होऊन आपण पुनः त्या गचाळ दैनंदिन गद्यमय नीरस जीवितांत लोळूं लागूं! अन् तिकडे गेल्यावर माझ्या नशीबीं काय? तर तो भयंकर स्वयंपाक, केरपोतेरं–छे छे–असह्य असह्य! नाहीं उ! मी नाहीं जाणार गडे!

**उषा**—नाहीं सु! मी तुला नाहीं जाऊं देणार! नाहीं–नाहीं–नी नाहीं!

**' विरहीं राहुं कशी मी।**
**कशि अन्तर पाडूं सखिच्या धर्मीं......'**

[ गळ्यांत गळा घालून दोघीजणी स्फुंदत स्फुंदत जातात.

---

## प्रवेश तिसरा.

[ **स्थल**—मनोरमेचें शय्यागृह. झोंकदार पोषाक करून माधव बाहेर जावयास निघाला आहे, तों पानांचा डबा घेऊन मनोरमा प्रवेश करते. ]

**मनोरमा**—कुठं बरं जायचं इतक्या घाईनं?

**माधव**—जरा बाहेर फिरून यावें ह्मटलें—

**मनोरमा**—काल सारी रात्र नाटकाला जागरण केलं, आज दिवसभर बाहेरच गाणंबजावणं झालं, जरादिखील झोंप घेतली नाहीं, नी पुनः आतां कशाला बरं बाहेर जायचं ? बरं, परत कधीं यायला होईल ?

**माधव**—तें-तें-आतांच नाहीं सांगतां येत !

**मनोरमा**—नाहीं गडे ! सांगायलाच हवं ! ( त्याचा हात धरून ) मी नाहीं जा गडे, सांगितल्याशिवाय सोडायची !

**माधव**—चल, हें काय असें वेड्यासारखें करतेस ?-मला मोजे घालूं दे.

**मनोरमा**—मी घालत्यें आपले मोजे. आपण नुसतं खुर्चीवर वसून रहायचं. ( माधवाच्या पायांत मोजे घालते. ) अगबाई ! पण बोलण्याच्या नादांत इकडे विडा द्यायला विसरल्येंच कीं ! ( माधव हात पुढें करतो. ) नाहीं, मी आपल्याला असा नाहीं देणार !

**माधव**—आज तूं हें काय चालविलें आहेस ? आज कांहीं मला निराळाच प्रकार दिसतो आहे !

**मनोरमा**—कसला प्रकार ?

**माधव**—हे मोजे चढविणें, विडा देणें-अरे, पण माझी काठी कुठें आहे ? मघांपासून—

**मनोरमा**—आपली काठी मीं लपवून ठेविली आहे-बूटदिखील मीं लपविले आहेत !

**माधव**—पुरे झाली तुझी थट्टा ! आणून दे माझी काठी अन् बूट—

**मनोरमा**—मी नाहीं आज बाहेर जाऊं देणार—

**माधव**—काय वेडी आहेस ? मग मोजे कशाला चढविलेस तर ?

**मनोरमा**—कां बरं ? मोजे घालून घरांत नाहीं वाटतं रहातां येत ?

**माधव**—न यायला काय झालें ? पण मला आज काम आहे, गेलेंच पाहिजे. आज कांहीं काम नाहीं वाटतें तुला ?

**मनोरमा**—नाहीं, सारं झालं. दुपारीं तर काय, इकडे घरीं यायला दिखील फावलं नाहीं. स्वारीशीं अगदीं मुळीं बोलूंचालूं दिखील नयें वाटतं आह्मीं ?

**माधव**—नये कां ह्मणून ? आपण तर आमच्या राणीसरकार ! परंतु अशा या वेळीं—

**मनोरमा**—‘ पाहिजे सखी कुणि जवळी ! ’

**माधव**—( चपापून ) वः, रसिकता फारच वाढली ! खरोखर तूं जर आहेस इतकी शिकलेली नसतीस, तर फार बरें झालें असतें ! तुझ्या रसिकतेच्या थट्टेपासून आह्माला त्रास तरी झाला नसता ! बरें, माझी छडी अन् बूट कुठं आहे? सांग, उशीर होतो आहेग !

**मनोरमा**—तें कांहीं चालायचं नाहीं, सांगल्यें आहे. कुठं जायचं तें सांगितल्याशिवाय मी कांहीं आज सोडायची नाहीं !

**माधव**—हें पहा, मी कुणाच्या ओंजळीनें पाणी पिणारा मनुष्य नाहीं—

**मनोरमा**—अगबाई ! पण मी कुठं सांगल्यें आहें माझ्या ओंजळीनंच पाणी प्यावं ह्मणून ! कुठं जायचं तें समजण्याची मला सहज इच्छा झाली ह्मणून विचारल्यें. सांगायचं गडे, त्यांत काय मेलं एवढं ओढून धरायचं तें ?

**माधव**—मी काय आजच असा जातों आहें ? रोज तर बाहेर फिरायला जातों; दररोज नाहींस कुठें मला विचारीत ती ? मग आजच कां अशी माझ्या पाठीस लागली आहेस ?

**मनोरमा**—आज मला विचारायची इच्छा झाली ह्मणून विचारल्यें. कुठं जायचं ? आपल्यापुढं पदर पसरल्यें–पायां पडल्यें–सांगायचं आतां !

**माधव**—आधीं माझी छडी कुठें आहे बोल–( इकडे तिकडे शोधतो. )

**मनोरमा**—( माधवाजवळ जाऊन, त्याच्या हात धरून ) 'तुला सुखी करण्यासाठीं काय वाटेल तें करीन' असं नेहमीं मला ह्मणायचं असतं, अन् आज कुठं जायचं एवढंच मीं विचारलं, त्याचं उत्तर द्यायचं दिखील स्वारीला इतकं कठीण पडलं अं ? बरं आहे–( तोंड फिरविते. )

**माधव**—काय बुवा त्रास आहे हा तुझा ? मी फिरायला जातों आहें–फिरायला जातों आहें–आणखी किती वेळ सांगूं ? त्या गान्धर्वसमाजांत मला आमंत्रण आहे–समजलें ? दे आतां माझी छडी अन् जोडा (ओरडून) पद्या–ए गध्या पद्या—[ पडद्यांतून—काय शेट ? ]—लेकाचा तिथूनच ओरडतो आहे ! कशीं मला सारीं माणसें मिळालीं आहेत ! पद्या, गाढवा, इकडे आलास तर तुझे पाय मोडतील वाटतें ?

[ पद्या डोळे चोळीत येतो. ]

**पद्या**—नाहीं शेट, पाय नाहीं मोडणार, पण झोंपमोड झाल्यामुळें माझे डोळे फुटणार खास !

**माधव**—चुप! फाजील कुठला, आतांच्या आतां जाऊन एक छडी विकत घेऊन ये अन् माझा दुसरा जोडा शोधून आण. अन् गाडी जोडून तयार आहे का पहा.

**पद्या**—जी सरकार! ( जाऊं लागतो. )

**मनोरमा**—(माधवाकडे रागानें पहात) पद्या, पलीकडच्या खोलींत टेबला-खालीं बूट आहेत अन् छडी मी आणून देत्यें. ( पद्या जातो. मनोरमा छडी आणून माधवासमोर फेंकून देते. पद्या बूट आणून ठेवून निघून जातो. )

**माधव**—हें पहा, उगीच रागावून मस्तक तापवून घ्यायचें कांहीं कारण नाहीं. मनुष्यानें तरी आपण कोण, आपली योग्यता काय, हें ओळखूनच काय करायचें तें केलें पाहिजे. मी काय करतों, कुठें जातों, वगैरे प्रत्येक गोष्टीची कैफीयत देण्यासाठीं तुला कांहीं इथें आणून ठेवलेली नाहीं, समजलीस? आपल्या स्वैंपाकघराच्या राज्यांत कढींत अन् ताकांत तुझी वाटेल तशी ढवळाढवळ करा, पण पुरुषांच्या कामांत ढवळाढवळ करायचें तुह्मांला कांहीं कारण नाहीं! तूं माझी पत्नी—तुझ्यावर मी प्रेम करतों—तुझा मी आदर करतों, त्यामुळें शेफारून जाऊन तूं माझ्यावर कुरघोडी करूं पहातेस, पण तूं कोण, मी कोण याचा कांहीं विचार केलास का? मोठी इंग्रजी शिकलीस अन् परीक्षा पास झालीस ह्मणून अशीं—

**मनोरमा**—( स्फुंदत ) पुरे पुरे गडे! आतां अधिक बोलूं नये, मी आपल्या आड कशांत कशांत दिखील येत नाहीं, झालं? जिथं आपणाला जायचं असेल तिथं खुशाल जावं, नको ह्मणायला मी कोणच्या झाडाचा पाला? परंतु तिकडून परत आल्यावर ही आपली दासी आपल्या कांहीं जीवंत दृष्टीस पडायची नाहीं, हें नीट लक्ष्यांत असावं.

**माधव**—( परत फिरून मनोरमेची हनवटी धरून ) वेडी कुठली! रागावून असा त्रागा करायला काय झालं?

**मनोरमा**—खरंच वेडी मी! रागवायला मला कांहीं कारणच लागत नाहीं!

**माधव**—खरोखरच नाहीं लागत. हें पहा, आतां रागावून रडायला लागलीस तें कां? बरें सांग, तुझ्या मनांत काय आहे?

**मनोरमा**—सांगायचं काय? आपण कुणीकडे जायचं तें—

**माधव**—( चपापून ) तें काय?

**मनोरमा**—आपण कुठं जायचं तें मला ठाऊक आहे. मला कळलं आहे-
[ आंतून माधवाचा मित्र—काय ए माधव ! किती वेळ मी इथें उभा राहूं ? येतोस कीं नाहीं खालीं ? Coward ! ]

**माधव**—काय कळलें आहे तुला ?

**मनोरमा**—तें मी आपणाला सांगणार नाहीं.

**माधव**—असें काय बरें ? सांग सांग—

**मनोरमा**—इतकी लाडीगोडी लावायची कांहीं जरूर नाहीं हो !

**माधव**—नाहीं सांगत ?

**मनोरमा**—मला काय आपलीं गुपितं कळायचीं आहेत ? काल जिकडे आपण जायचं झालं होतं, आज दुपारींहि जिकडे जायचं होतं, इतकंच नव्हे, तर आज कित्येक महिने जिकडे जाणं होतं आहे–तिकडेच आजहि आपण जायचं, हें का मला कळत नाहीं ? मला काय आपण कुकुलं बाळ समजायची, ह्मणून अशीं एकेक निमित्तं सांगायला होताहेत ! आज गान्धर्वसमाजांत जातों, उद्यां सभेला जातों, परवां नाटकाला जातों, तेरवां पार्टी आहे, अशीं खोटीं कारणं दाखवायची आपणाला खरोखर कांहीं जरूर नव्हती !

**माधव**—वाहवा, वाहवा ! शिक्षणाचें हें चांगलेंच फळ ह्मणायचें ! प्रत्यक्ष नवऱ्यावर देखील तुझा विश्वास नाहीं अं ?

**मनोरमा**—विश्वास नाहीं ? धडधडीत कांहीं गोष्टी चक्क समजून आल्यावर मनुष्य अगदीं श्रद्धाळु असलं, तरी दिखील त्याचा प्रत्यक्ष परमेश्वरावरचा विश्वास उडेल ! पूर्वीं मला दिवसांतून पंचवीसदा तरी चोरूनमारून भेटल्याखेरीज आपला एकहि दिवस जात नसे; आतां आपली गांठ पडल्याखेरीज दिवसच्या दिवस जातात. नव्हे–मला भेटणं मुद्दाम टाळायला होतं. माझ्याशीं पूर्वींसारख्या प्रेमाच्या गोष्टी बोलायला आपणाला धीर होत नाहीं–फार काय, माझ्या तोंडाकडेहि आपणाला बघवत नाहीं ! पूर्वीं माझ्याशीं प्रेमांत गोष्टी बोलतां बोलतां रात्र केव्हां सरली हें दिखील आपणाला कळून येत नसे; आतां मी होऊन आपणाशीं दोन गोष्टी मुद्दाम बोलायला गेल्यें तर 'झोंप येते–पुरे करा' ह्मणून मला सांगायला होतं. कुठल्या तरी रीतीनं माझा पाश नाहींसा झाला ह्मणजे आपणाला बरं वाटेल ! आपणाला असं का वाटतं, कीं, मला कांहींच कळत नाहीं ह्मणून ? मला सर्व कांहीं समजतं हो !

**माधव**— Well done ! कुठल्या तरी नाटकांतलें भाषण पाठ करून ठेवलें होतेंस, तें मला ह्मणून दाखविलेंस वाटतें ? आच्छा ! मी फिरायला जातों कीं कुठें दुसरीकडे जातों, तें तूं सैसाला तरी विचार–पाहिजे तर मनूला माझ्यामागून हळूच शोध करायला पाठव, मग तर झालें ? ( स्वगत ) ही तसें करायला बसली आहे थोडीच !

**मनोरमा**—मी कशाला तसं करूं ? मी कुणाला विचारित नाहीं अन् कुणाला शोधालाहि पाठवित नाहीं. आपल्या मनाला खरंखोटं काय तें ठाऊक ! मला सर्व कळलं आहे अन् सारा अनुभवहि आला आहे. आतां एकदा माझे डोळे—

**माधव**—मनोरमे !—

**मनोरमा**—कशाला उगीच खोटं प्रेम अन् आदर दाखवायचा ? खरंच, या जिवाचा मला अगदीं वीट येऊन गेला आहे. मला थोडं विष तरी आणून द्यावं–मग वाटेल तें करायला आपण मोकळेच आहां !

**माधव**—ठीक आहे. तुझ्या ह्मणण्याप्रमाणेंच कां होईना ! तुला कळलें तर ठीकच झालें. मी देखील या आंधळ्या कोशिंबिरीला अन् लपंडावाला अगदीं कंटाळून गेलों होतों; मला काय करायचें तें आजपासून तुझी भीति न धरतां करतां येईल, हा काय आजच्या तंट्यावरून मला कमी फायदा झाला ?

**मनोरमा**—( माधवाचे पाय धरून ) आपले मी पाय धरत्यें–हा भलता सलता नाद आपण सोडून द्या. आपलं निष्कलंक शुद्ध वर्तन अलीकडेच कां बिघडलं ? आपल्यासाठींच माझा जन्म–केवळ आपल्या सुखासाठींच माझं सारं जीवन ! आपण कशानं सुखी व्हाल, काय केलं असतां आपणाला बरं वाटेल, हीच चिंता अष्टौप्रहर मी बाळगीत असत्यें. आपल्या आवडीनावडीं-कडे लक्ष्य देऊन आपणाला सौख्य द्यावं ह्मणून माझ्या सुखाकडे किंवा आवडी-नावडींकडे दुर्लक्ष्य करून मी आजपर्यंत वागत आल्यें–केवळ आपली इच्छा ह्मणून माझ्या मनांत नसतांहि गायला शिकल्यें–आपल्याला सौख्य व्हावं ह्मणून वडील माणसांची भीडमर्यादा आणि मनांतली लाजलज्जा गुंडाळून ठेवून भर दुपारींहि पियानो वाजवून गायला मीं कमी केलं नाहीं–यांत मी बढाई मारत्यें असं नव्हे–आपल्याला सुख व्हावं ह्मणून प्राणदान करणं हा या दासीचा धर्मच आहे. माझ्या धर्माप्रमाणं मी वागत असतां आपण मात्र मला लाथेनं दूर उडवून देतां ! माझ्या हातून असा अपराध तरी कोणता झाला ? (रडूं लागते.)

**माधव**—मनोरमे! तुला लाथेनें मीं कधीं झुगारली? तूं तर माझी प्रिय सहधर्मिणी!

**मनोरमा**—महाराज! कुसंगतीसारखी अनर्थकारक गोष्ट दुसरी कोणतीहि नाहीं. कुसंगतीसारखा दुसरा रोग नाहीं. कुसंगतीनं मनुष्य कवडीमोल होऊन जातो, हें या दासीनं आपणाला शिकवावं अशी माझी योग्यता नाहीं. आपणा-सभोंवतीं जमलेल्या चांडाळचौकडीची आपण संगत सोडा–आपल्या घरांत त्यांनां पाऊल घालूं देऊं नका. त्यांच्या संगतीनं आपला पुरा अधःपात होईल. घरांतल्या घरांत गाणं बजावणं वगैरे गोष्टी आपण चालू ठेवल्या तर त्यांत कोणी सुज्ञ मनुष्य आपणाला नांवं ठेवणार नाहीं. या मित्रांनां झुरळासारखे झाडून टाकून आपण खऱ्या हिताचा उद्योग करूं लागलां तर आपलं अन् आपल्या मनुष्यांचं किती कल्याण होईल! त्यामुळं आपल्या मनाला खरं सुख आणि समाधान प्राप्त होईल. ईश्वरदयेनं आपणाला कांहीं कमी नाहीं. मग पुण्याच्या भारतसेवक संस्थेसारख्या अत्यंत उपयुक्त संस्थेला साहाय्य होऊन आपण देशहित कां करित नाहीं? भाऊजी ह्मणत होते—

**माधव**—मनोरमे! या सर्व गोष्टी मला समजतात. तूं मला शिकवायला नको आहेस. या सर्व पुराणांतल्या गोष्टी पुराणांत ठीक दिसतात. वेडे! सर्व प्रकारची अनुकूलता असतां या वयांत तूं उपदेश करतेस त्याप्रमाणें जर आह्मी संन्यासी बनून वेदान्ताचें अध्ययनअध्यापन करूं लागलों, तर परमेश्वरानें दिलेल्या ऐश्वर्याचा अन् तारुण्याचा उपयोग काय? मग एका दृष्टीनें आह्मी परमेश्वराचा गुन्हा करित नाहीं काय?

> **“ नवयौवन सुंदरता ही। तनुलतासुकुसुमें पाहीं।**
> **बहु कोमलपरि दोन्हींही। लघुकाल वास त्यां राही—”**

अन् मनोरमे! माझ्या वर्तनानें तुला तरी इतकें वाईट कां वाटावें, हें मला कळत नाहीं! तुला कोणतें सुख कमी आहे?–सांग–(मनोरमा रागानें जाऊं लागते.) मनोरमे–मनोरमे! रागाऊं नकोस–तूं माझ्या जिवाचा कलिजा–तुजवरचें माझें प्रेम—(मनोरमा जाते.) गेलीस तर जा! इथें कोण लेकाचा—(आंतून–काय ए माधव! कमाल केलीस आतां–तूं येतोस का जाऊं आह्मी?)

**माधव**—येतों येतों–तुह्मी सैतान आपल्या पकडींतून कसचे मला सोडतां?

[ जातो.

[ मनोरमा येते. ]

**मनोरमा**—शेवटीं जाणं झालंच अं ? देवा नारायणा !—( उशीवर डोकें टेंकून स्फुंदूं लागते. )

[ मनोहर येतो. ]

**मनोहर**—( स्वगत ) हें काय ? वहिनी रडते आहे ! दादा आतांच इथून रागावून गेल्यासारखे दिसले !—काय ? असें असेल ? दादांचें गौप्य वहिनीला कळलें तर नसेल ? दादांनीं वहिनीच्या अंगावर हात टाकण्यापर्यंत मजल तर आणली नसेल ? मग या वेळीं इथून निघून जाऊं मी ? अरेरे ! काय मी निर्दय तरी ? आत्मसुखपरायण होऊन त्या सुंदरीचा लाभ मला कसा होईल याच विचारांत मीं गुंगून गेलों आहें ! परंतु माझ्या या मातृतुल्य वहिनीचें दुःख दूर करायला आणि दादांनां कुमार्गापासून परावृत्त करायला मी अल्पसुद्धां प्रयत्न करित नाहीं ! या वेळीं इथून जाणें बरें नव्हे. हिच्याशीं दोन शब्द बोलून हिचें दुःख थोडेंसें तरी हलकें केलें पाहिजे. ( उघड ) वहिनी !—

**मनोरमा**—( चपापून ) कोण ! भाऊजी ?

**मनोहर**—वहिनी ! तूं रडत होतीस वाटतें ?

**मनोरमा**—नाहीं भाऊजी ! तसं कांहीं नाहीं झालं. माझं डोकं संध्याकाळपासून असं कांहीं दुखत आहे कीं काय सांगूं ? स्मेलिंग सॉल्टची बाटली कुठं आहे भाऊजी ?

**मनोहर**—वहिनी ! दादा आतांच गेले वाटतें बाहेर ?

**मनोरमा**—होय, आज त्या गान्धर्वसमाजांत मोठी धामधूम आहे ह्मणे ! भाऊजी ! तुह्मी कां बरं त्या गांधर्वसमाजांत नाहीं जात ? मोठमोठ्या गवयांच्या गाण्यापेक्षां दिखील गांधर्वसमाजाच्या गाण्यांत मजा येते ह्मणतात, खरं का हें ?

**मनोहर**—मला त्यांत कांहीं समजत नाहीं वहिनी ! तिथें मोठमोठे लोक येतात, एवढें मात्र मीं ऐकिलें आहे. जाऊं दे तो गान्धर्वसमाज ! मी स्मेलिंग सॉल्टची बाटली शोधून आणतों अं ? [ जातो.

**मनोरमा**—भाऊजींनां माझ्या दुःखाचं कारण कळलं असेल का ? बहुतकरून कळलं नसावं असं दिसतं. नाहीं तर माझ्या रडण्याच्या गोष्टीचा त्यांनीं पुरता पिच्छा घेतल्याशिवाय सोडला नसता. त्यांनां खरी गोष्ट कळली असो वा नसो-परंतु ती कुणालाहि न कळण्याबद्दल आपणाला मात्र अतिशय

काळजी घेतली पाहिजे. असलं हें हृदयाचं विदारण करणारं दुःख खऱ्या कुलस्त्रीनं कुणापाशींहि सांगतां कामा नये. तें मुकाट्यानं भोगण्यांत अन् त्यानं झुरून झुरून मरण्यांतच स्त्रीजातीचं खरं वीरत्व आहे. आई अंबाबाई ! माझ्या मनाला सुदृढ कर, म्हणजे तिकडचं शुद्ध, परंतु हल्लीं पापमार्गाला प्रवृत्त झालेलं मन मी परत फिरविल्याखेरीज रहाणार नाहीं ! जर मला त्यांत यश आलं नाहीं, तर माझा स्त्रीजन्म व्यर्थ होय ! मला आतां राग, दुःख, अभिमान— सर्व कांहीं मुकाट्यानं गिळून टाकलं पाहिजे आणि माझ्या प्राणनाथांनां सन्मार्गाकडे वळविलं पाहिजे. विशुद्ध प्रेमाच्या जोरावर मला या कामांत यश आल्याखेरीज कधींहि रहाणार नाहीं. किती तरी तिकडची स्वारी भोळी म्हणायची ! माझ्यापासून या साऱ्या गोष्टी लपवून ठेवायला पहायचं होतं ! परंतु अशा गोष्टी कधीं लपून का रहात असतात ? तिकडच्या चेहऱ्यावरून, स्वप्नांतल्या बरळण्यावरून आणि बदललेल्या चालचलणुकीवरून माझ्या सर्व कांहीं लक्ष्यांत आलं—पण हे भाऊजी आले वाटतं ?

[ स्मेलिंग सॉल्टची बाटली घेऊन मनोहर येतो. ]

**मनोरमा**—सांपडली वाटतं अखेरीस ? सारं त्रिखंड शोधलं त्या बाटलीसाठीं, पण कुठं म्हणून तिचा पत्ता लागेना ! तिकडून नेहमीं मला गृहव्यवस्थेसंबंधानं कितीतरी उपदेश करायला होत असतो, पण स्वतः ठेवलेली वस्तु कधीं वेळीं मिळेल तर शपथ ! तुम्हां पुरुषांचं ' लोकां सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडा पाषाण ! ' असंच असायचं, नाहीं हो भाऊजी ? ( बाटली हुंगून ) अहाहा ! किती तरी बरं वाटतंय् आतां मला !

**मनोहर**—( स्वगत ) नाहीं वाटतें, दादांची गोष्ट हिला समजलेली नाहीं दिसत. एका अवाक्षरानें देखील त्या गोष्टीचा हिला पत्ता लागूं देतां कामा नये ! वहिनीच्या मनाला लवमात्रहि कष्ट झालेले मला सहन होत नाहींत ! ( इकडे तिकडे फिरूं लागतो. )

**मनोरमा**—( बाटली हुंगून ) भाऊजी ! आज तुमचं मन स्वस्थ दिसत नाहीं—कांहीं तरी मला सांगण्याच्या उद्देशानं तुम्ही इथं आलां आहां खास ! काय बातमी आहे ?

**मनोहर**—ना—नाहीं—त—तशी नाहीं कांहीं—

**मनोरमा**—( बाटली हुंगून ) तरी पण ? कांहीं तरी बातमी तुम्हीं आणली आहे, यांत कांहीं संशय नाहीं ! मघांपासून मला ती सांगावी कीं न सांगावी,

याबद्दल तुमच्या मनाची चलबिचल चालली आहे. एखाद्या मासिक पुस्तकानें तुमच्या 'अमृतधारे'वर सडकून टीका तर नाहीं केली ? का तुमच्या काव्यकल्पनेंतील प्रणयिनी या खरोखरच्या जगांत तुह्माला कुठं दिसली ?

**मनोहर**—( चपापून ) वहिनी ! तुझी आपली कांहीं तरी भलतीच थट्टा !

**मनोरमा**—तर मग सांगाना काय तें एकदा भाऊजी ! नाहीं तर अशा शांत वेळीं तुमच्या त्या वेड्या रसिक मित्राबरोबर-मधुकराबरोबर-नदीच्या तीरावर कल्पनासृष्टींत गुंग होऊन इकडे तिकडे भटकायचं सोडून तुह्मी या वेळीं इकडे कुठं ? खास खास कांहीं तरी तुह्माला सांगायचं आहे. तर मग मघाशीं मीं ह्मटलं तेंच खरं ! या प्रणयी मनोहराला एखादी प्रणयिनी 'सरस्वती' कुठं तरी सांपडली असेल !

**मनोहर**—( निःश्वास टाकून ) आंः ! एवढें कुठें माझें भाग्य आहे वहिनी !

**मनोरमा**—( हंसत ) अगबाई ! मीं अंदाजानं सोडलेली गोळी नेमकी लागली वाटतं ? तुह्मी असे एकदम गंभीर कां झालांत भाऊजी ?

**मनोहर**—मी तुला सर्व कांहीं सांगतों वहिनी ! पण नुसतें या कानानें ऐकून त्या कानानें सोडून द्यायचें नाहीं, समजलीस ? तुला कांहीं तरी उपाय शोधून काढायला हवा.

**मनोरमा**—कसला उपाय ? तुह्माला कसला रोग झाला आहे ?

**मनोहर**—झाली तुझी थट्टा सुरू. वहिनी, अगोदर थट्टा करणार नाहीं असें कबूल कर, तर सांगतों !

**मनोरमा**—( बाटली हुंगून ) बरं-नाहीं थट्टा करीत—

**मनोहर**—वहिनी ! मी तुला खरेंच सांगतों, या गोष्टीला तूं कांहीं तरी उपाय शोधून काढलाच पाहिजेस ! नाहीं तर हा मनोहर तुझ्या कांहीं फार दिवस दृष्टीस पडायचा नाहीं, हें खास समज—

**मनोरमा**—अगबाई ! रोग तर मग भारीच बळावलेला दिसतो ! मग इतके दिवस तुह्मीं त्याची उपेक्षा कां केलीत ? कुणी तरी डॉक्टर पहावा कीं नाहीं ? कां ? आला वाटतं राग ? बरं-एकदम सांगा पाहूं काय तें—

**मनोहर**—आपल्या घराच्या पिछाडीला ती लहानशी टुमदार बाग आहे ती तुला ठाऊक आहे कीं नाहीं वहिनी ? त्या बागेंतला बंगला देखील तूं पाहिला असशील-तो ग-पिवळ्या गच्चीचा बंगला. आपल्या गच्चीवरून दिसतो तो ? आली कीं नाहीं तुझ्या लक्ष्यांत ती बाग अन् तो बंगला ?

**मनोरमा**—ह्मणजे ? गच्चीच्या कठड्यावर मधून मधून गुलाबाच्या कुंड्या ठेवलेल्या दिसतात, तोच कीं नाहीं तुमचा तो बंगला ?

**मनोहर**—( त्रासून ) होय ग-तोच !

**मनोरमा**—बरं मग ? तुह्माला त्या बंगल्याशीं काय करायचं आहे ? आपणाला आपला हा वाडा पुरेसा नाहीं वाटतं ?

**मनोहर**—नाहीं ग ! तो बंगला कांहीं आपल्याला विकत नाहीं घ्यायचा आहे ! तो बंगला भाऊसाहेब ह्मणून एक श्रीमंत गृहस्थ आहेत, त्यांचा आहे. ते भाऊसाहेब आज किती दिवस सारखे माझ्या पाठीमागें लागले आहेत-त्यानीं अगदीं माझा नाइलाज केला आहे ह्मणेनास—

**मनोरमा**—कशाबद्दल पाठीस लागले आहेत ? एखाद्या नाच्या पोऱ्यांच्या मेळ्यासाठीं वर्गणी तर नाहीं ना मागत ?

**मनोहर**—छे छे, ते असल्या भानगडींत कधींहि नसतात ! त्यांना एक मुलगी आहे, समजलीस वहिनी ?

**मनोरमा**—तीच कीं नाहीं भाऊसाहेबांची मुलगी ? मुंबईस आपल्या मामांकडे कॉलेजांत जाण्यासाठीं त्यांनीं ठेविली होती ती ?

**मनोहर**—होय तीच ! त्याच मुलीविषयीं मी तुला सांगतों आहें.

**मनोरमा**—काय कविराज ! त्या भाऊसाहेबांच्या कन्येला आपली जीवन-सहचरी करायचा आपला विचार आहे वाटतं ? मग माझा मघांचा तर्क कांहीं खोटा नव्हता ह्मणायचा !

**मनोहर**—भाऊसाहेबांचा सारखा आग्रह चालला आहे! काय करूं वहिनी? माझा अगदीं नाइलाज—

**मनोरमा**—शाबास भाऊजी, शाबास ! तुह्मी तर कालपरवांपर्यंत नाकानं वांगीं सोलीत होतां, कीं, लग्न करून मी आपल्या पायांत पत्नीची शृंखला अडकावून घेणार नाहीं ह्मणून !-माझं प्रेम ह्मणे आपलं कवितेपुरतंच ! बरेच आहांत कींहो तुह्मी ? आह्मी काय आपलीं भोळींभाबडीं माणसं ! आह्मांला आपलं तुमचं बोलणं खरं वाटे !

**मनोहर**—( हंसून ) मी का तें खोटें सांगत होतों वहिनी ? पण भाऊ-साहेबांपुढें माझा कांहीं इलाज चालत नाहीं ना ? काय करूं ? अलीकडे या हेमन्तपुरच्या रस्त्यांतून कुठें फिरणें देखील मला मोठ्या मुष्किलीचें झालें आहे. भाऊसाहेब कुठें भेटले, कीं, त्यांनीं माझ्यामागें पिरपिर सुरू केलीच !

**मनोरमा**—अं: ! मग त्यांत कांहीं अर्थ नाहीं. तुमची इच्छाच नसली, तर त्या झातार्‍याला हां हां ह्मणतां तुह्माला ठकवतां येईल ! कांहीं दिवस द्या गुंगारा हेमन्तपुरांतून ! कांहीं दिवस गेले, कीं प्रकरण आपोआप मिटेल पहा !

**मनोहर**—ह्मणजे ?

**मनोरमा**—एकदोन महिने मुंबईपुण्याकडे याना चक्कर मारून ?

**मनोहर**—छे: छे: वहिनी ! त्या भोळ्याभाबड्या झातार्‍याला फसविणें बरें दिसतें का ? माझ्याबद्दल भाऊसाहेबांच्या व इतर मंडळींच्या मनांत जो कांहीं आदर आहे, तो या कृत्यानें कधीं तरी टिकेल का ?

**मनोरमा**—अहाहाहा ! केवढी पण काळजी आपल्या आदराविषयीं ? भाऊजी ! भाऊसाहेबांनीं कांहीं तुमचा नाइलाज केलेला दिसत नाहीं—कदाचित्—कदाचित्—मला वाटतं, त्यांच्या गळीं पडून तुह्मीच उलट त्यांनां भंडावून सोडलं असेल !

**मनोहर**—आतां तुझ्यापासून चोरून ठेवण्यांत काय फायदा ? वैद्याकडे जाऊन हात मागें ठेवण्यांत शहाणपण कुठें राहिलें ? तुला आतां खरें सांगतों वहिनी ! माझ्या कवितेची जनयित्री, माझ्या हृदयाला उल्हासदात्री, माझी मूर्तिमंत स्फूर्ति ती रमणीच आहे ! वहिनी ! जर त्या सुंदरीशीं माझा विवाह झाला नाहीं तर ( दीर्घ निःश्वास टाकून ) संसारत्याग करून, संन्यासी होऊन मी हिमालयाकडे निघून जाईन !

**मनोरमा**—कविमहाराज ! तुमचं हें भाषण तुमच्या काव्यस्फूर्तीच्या फवार्‍यापैकींच समजायचं, कीं, यांत कांहीं सत्य आहे ? आपली ही इतकी शोचनीय अवस्था कधींपासून झाली बाई ?

**मनोहर**—वहिनी ! थट्टा करून माझ्या आधींच पोळलेल्या हृदयावर आणखी कां बरें चरके देतेस ? तूं माझी दुसरी आईच समजून माझें अंतःकरण मीं तुला पूर्णपणें उघड करून दाखविलें, सर्व लज्जा सोडून माझ्या प्रेमक्षुब्ध हृदयाचा पाट मीं तुझ्यासमोर खुला केला आहे. वहिनी ! आतां मीं संसारांत रहावें अशी तुझी इच्छा असली तर तूं या गोष्टीला ताबडतोब कांहीं तरी उपाय शोधून काढ—

**मनोरमा**—ह्मणजे तुह्माला चतुर्भुज करून टाकायचं हेंच कीं नाहीं ? ठीक आहे. ही सारी हकीगत मी तिकडच्या कानावर घालत्यें. प्रणयव्यवहारांत

चतुर्भुज व्हायला अर्जुनाप्रमाणं ज्याची त्यानंच आपल्या सुभद्रेची चोरी केलेली बरी !

**मनोहर**—भाऊसाहेबांनीं दादांच्या कानावर ही गोष्ट केव्हांच घातली आहे–

**मनोरमा**—मग ?

**मनोहर**—दादा ह्मणाले, कीं, मनूकडून कांहीं हरकत नसली तर माझें कांहीं ह्मणणें नाहीं.

**मनोरमा**—मग आतां हरकत कसली ? मी लागूं तर आतांपासून सांडगेपापडांच्या तयारीला ? जोशीबुवांनां बोलावणं पाठवलं होतं का ? मुहूर्त कधींचा ठरला ? अगदीं चारआठ दिवसांतलाच धरला असेल ?

**मनोहर**—नाहीं वहिनी ! आमच्या हरकतीवरच सर्व गोष्टी अवलंबून असत्या तर आणखी काय पाहिजे होतें ? सर्वांत वाईट गोष्ट ही आहे, कीं, खुद्द उषाच लग्न करायला कबूल नाहीं !

**मनोरमा**—ह्मणजे ? हा काय बाई विलक्षण प्रकार ? एकेक ऐकावं तें नवलच !

**मनोहर**—वहिनी काय सांगूं ? तिचें मस्तकच विघडलें आहे. ती ह्मणते कीं नाटककादंबऱ्यांतून नायकनायिकेचा ज्याप्रमाणें romantic प्रेमव्यवहार घडून येतो, त्याप्रमाणें घडून आल्यशिवाय आपण साफ लग्न करणार नाहीं ! कांहीं केल्या ती हा हट्ट सोडित नाहीं. मला वाटतें, नाटककादंबऱ्यांनीं तिचें मस्तक पुरें फिरून गेलें आहे !

**मनोरमा**—अगबाई ! खरं का काय ? अशा या वेडीला घेऊन तुह्मी काय करणार भाऊजी ?

**मनोहर**—वहिनी ! तिचें हें वेड केवळ वरवरचें आहे. तिची आई लहानपणींच वारल्यामुळें तिला नीट भारदस्त रीतभात लावायला तिच्या घरीं कुणी बायको मनुष्य राहिलें नाहीं, त्यामुळें सहजच तिच्या बापानें तिला फाजील लाडांत वाढविली. विद्येच्या झऱ्याचें तिनें अतिशय अल्प अमृत चाखल्यामुळें भलत्याच कल्पनांनीं तिचें मस्तक थोडेंसें भडकून जाणें साहजिक आहे. अगोदरच आईसारख्या जवाबदार बायको मनुष्याचा तिला ओळा नाहीं, त्यांतून मुंबईसारख्या बकाली शहरांत तिचें शिक्षण झालेलें अन् ज्यांच्याकडे भाऊसाहेबांनीं तिला शिकायला ठेवीली होती, ते नाटकांचे पुरे भोक्ते ! मग या साऱ्या गोष्टींचा तिच्या कोवळ्या मनावर असा विलक्षण

परिणाम होऊं नये तर काय व्हावें? तुझ्यासारख्या चतुर गृहिणीच्या हाताखालीं ती जर दोन दिवस राहील तर तिचें हें वेड—तिच्या शुद्ध सरळ मनाचा हा वरवरचा मळ—हां हां ह्मणतां पार नाहींसा होऊन जाईल, अशी माझी पक्की खात्री आहे. या एका वेडाशिवाय तिच्या अंगीं लोकांनीं नांवें ठेवण्यासारखा एकहि दुर्गण नाहीं. अहाहा! काय तिचे ते डोळे! त्यांत तिच्या हृदयाची सरलता पूर्णपणें प्रतिबिंबित झालेली दिसते. तिचें लावण्य तर—त्याचें वर्णन करायचा मी कशाला व्यर्थ प्रयत्न करूं?—प्रत्यक्ष कालिदासहि तिथें थकून जाईल!

**मनोरमा**—शाबास शाबास कविराज! शेवटीं आपल्या येळकोटावर आलांच आपण! तिचें लावण्य वर्णायला तुह्मीं कधीं तिला इतकी पाहिली होती?

**मनोहर**—किती तरी वेळ!

**मनोरमा**—अगबाई! तरीच तुमचं लिहिणंवाचणं वरती गच्चीवर गेल्याशिवाय होत नाहीं तें अलीकडे?

**मनोहर**—( हंसून ) छे छे! असें नाहीं कांहीं—आज भाऊसाहेबांनीं माझा अगदीं पिच्छाच घेतला, तेव्हां मी त्यांच्या मुलीला बघायला गेलों होतों.

**मनोरमा**—( आश्चर्यानें ) खरं कीं काय? बरं, मग पुढं काय झालं?

**मनोहर**—पहिल्याच भेटींत माझी निराशा झाली वहिनी! अशी फजीती माझी पूर्वीं कधींहि झाली नसेल! मोठा धीर करून मीं तिला तुझें नांव काय? ह्मणून प्रश्न केला मात्र तों कसचें काय अन् कसचें काय! उपहासानें मोठमोठ्यानें हंसून मला ती जी कांहीं अद्वातद्वा बोलूं लागली आहे ह्मणतेस, काय सांगूं? माझ्यानें तर कांहीं बुवा वर तोंड करून तिच्याकडे बघवेना देखील! शेवटीं, एकेक पाय मागें घेऊन खिन्नमुखानें मीं तिथून 'यःपलायते' केलें!

**मनोरमा**—हः हः हः! बरेच शूर आहां ह्मणायचे आपण! रणांगणांत पहिल्या धडाक्यासच तुह्मीं शत्रूला पाठ दाखविलीत? मग पुढं लग्न झाल्यावर तुम्हां दोघांत जीं युद्धं होतील त्यांत तिच्यापुढं तुमचा टिकाव कसा लागणार? पण भाऊजी! एका अक्षरानं तरी या हकीगतीपैकीं मला कांहीं कळवायचं होतंत तुह्मीं? का ही दिखील तुमची काव्यकल्पनांची भरारीच?

**मनोहर**—मी तुला केव्हांच ही हकीगत सांगणार होतों; परंतु लज्जेमुळें मला बोलवेनाच! शिवाय, एकदम तुला चकित करून सोडावें असाहि माझा बेत होता.

**मनोरमा**—मग आतांहि तुह्मीं मला चकित करून सोडलंच कीं ! मी तुह्मांला आजपर्यंत नुसते आकाशांत भराऱ्या मारणारे, पण प्रेमशून्य कवीच समजत होत्यें. तुमचं तें नवीन ‘आकाश-पाताळ’ काव्य मला दाखवा बरं.

**मनोहर**—जळूं दे तें माझें काव्य ! वहिनी ! मी तुला खरेंच सांगतों—या सर्व गोष्टींचा तूं लवकरच बंदोबस्त कर, नाहीं तर मी मरणार खास—

**मनोरमा**—त्या पुंडरीकाप्रमाणं—जिव्हा जड पडली । प्रिये ! ये—इथपर्यंत पाळी आली वाटतं ?

**मनोहर**—वहिनी, मी थट्टेनें नाहीं सांगत—

**मनोरमा**—अन् मीहि थट्टेनं नाहीं बोलत ! मी काय तुमच्या प्रियेप्रमाणं नाटककादंबऱ्यांत दंग होऊन गेल्यें आहें ह्मणून मला थट्टाविनोद करतां येईल? बरं तें असो–परंतु तुह्माला सांगून ठेवत्यें भाऊजी ! जर तुह्मी प्रत्येक गोष्टींत अधीर झालेत, तर माझ्यानं या बाबतींत कांहींसुद्धां होणार नाहीं ! मी सांगत्यें तें नीट ऐका—

**मनोहर**—ठीक आहे.

**मनोरमा**—तुमच्या वेडीचं वेड मला प्रत्यक्ष पाहिलं पाहिजे.

**मनोहर**—अर्थात् !

**मनोरमा**—तिच्या रोगाची मला नीट परीक्षा केली पाहिजे.

**मनोहर**—ठीकच आहे.

**मनोरमा**—मग तिच्या रोगावर योग्य उपचार करून तो नाहींसा केला पाहिजे.

**मनोहर**—उघडच आहे !

**मनोरमा**—अन् इतकं सारं झाल्यावर मग पुढं काय तो लग्नाचा विचार.

**मनोहर**—वहिनी वहिनी ! इतका वेळ मी धीर कसा धरूं ? तूं तरी—

**मनोरमा**—भाऊजी ! काय हें वेड तुह्माला ? अहो, तिचं वेड गेल्याशिवाय तुमचं लग्न होणार कसं ? अन् तिचं वेड ह्मणजे लग्न करायचं नाहीं, हेंच कीं नाहीं ?

**मनोहर**—हो, असें तर खरें ! बरें, पण याला उपाय ?

**मनोरमा**—प्रत्यक्ष रोगी पाहिल्यावर उपायाची योजना करूं–पण पहिल्यानं तुह्मी अगोदर एक काम करा पाहूं. उद्यां तुह्मी तुमच्या श्वशुरांच्या—

भाऊसाहेबांच्या घरीं जाऊन त्यांच्या घरांतील एकूणएक पुरुषमंडळी कोणत्या नाकोणत्या तरी निमित्तानं बाहेर जातील अशी युक्तीनं व्यवस्था करा. नंतर मी त्यांच्या घरीं कांहीं तरी निमित्तानं जाऊन तुमच्या त्या वेड्या वल्लभेची गांठ घेत्यें. त्यानंतर तिथं ज्याप्रमाणं रागरंग दिसून येईल त्याप्रमाणं पुढची कशी काय व्यवस्था करायची तें आपण ठरवूं. पण इकडे पहा, ही गोष्ट या कानाची त्या कानाला दिखील कळतां कामा नये हो–फक्त तुह्माला अन् मलाच काय ती ठाऊक ! लढाईत अन् प्रेमांत गौप्याचाच नेहमीं विजय होत असतो !

**मनोहर**—ठीक आहे. तूं सांगतेस त्याप्रमाणें व्यवस्था करणें कांहीं फारसें कठीण नाहीं. कारण, भाऊसाहेबांच्या घरीं पुरुष ह्मटले ह्मणजे कायते ते एकटेच ! त्यांचें काय मोठेंसें ? त्यांनां कुठेंहि पाठवतां येईल.

**मनोरमा**—पाहिजे तर तुह्मी त्यांनां सांगा, कीं, माझ्या वहिनीला मुलगी पहायची आहे ह्मणून. इतक्यानं काम झालं तर ठीकच झालं–नाहीं तर—

**मनोहर**—तें सगळें होईल ग वहिनी ! परंतु मी स्वतः कांहीं हें भाऊसाहेबांना सांगणार नाहीं.

**मनोरमा**—कां बरं ?

**मनोहर**—मला भारी लाज वाटते वहिनी !

**मनोरमा**—हः हः हः ! अगबाई ! खरं कीं काय ? लाज वाटते तुह्माला ? मग मुलगी पहायला जातांना कुठं नाहीं लाज वाटली ती ?

**मनोहर**—त्या वेळीं वाटली नाहीं खरी–परंतु तिची भेट होऊन बाहेर आल्यानंतर भाऊसाहेब आणि त्यांचे शेजारी बापूसाहेब यांची माझी जेव्हां गांठ पडली तेव्हां मला अतिशयच लाज वाटली.

**मनोरमा**—मग आतां याला उपाय ?

**मनोहर**—तूं सांगितल्याप्रमाणें सारी व्यवस्था मी मधुकराकडून करवितों, मग झालें कीं नाहीं ?

**मनोरमा**—अगबाई ! या कामांत कशाला मधुकर ?

**मनोहर**—नाहीं, वहिनी ! तुला ठाऊक नाहीं. मधुकर बोलण्यांत नुसता बांका असल्यामुळें माझ्यापेक्षां देखील हें काम त्याच्याकडूनच चांगलें होईल. तुझ्यावर तर मधुकराची फारच भक्ति आहे. तो नेहमीं ह्मणत असतो, कीं, माझ्या आईपेक्षां देखील मला मनोरमावहिनी प्रिय व पूज्य वाटतात.

**मनोरमा**—बरं तर, त्याच्याकडून व्यवस्था करा–माझी हरकत नाहीं.

**मनोहर**—वहिनी ! तूं सांगतेस तोंपर्यंत मी कसा तरी धीर धरतों, परंतु तूं मात्र माझ्या मनाच्या स्थितीकडे पाहून आपलें कार्य लवकर आटोप. या वैशाखांत कसेंहि करून अक्षता पडल्याच पाहिजेत पहा—

**मनोरमा**—ओहो ! या मधुर वसंत ऋतूंतच कवीचं अन् कवितेचं लग्न लागलं पाहिजे ह्मणतां ? मला वाटतं, पंचांग तयार करणारे जोशी सारे लुचे असले पाहिजेत–चैत्रांत ते लग्नाचा मुहूर्तच पंचांगांत देत नाहींत—

**मनोहर**—या वैशाखांत पहिल्या मुहूर्तावर जर हें लग्न झालें वहिनी—

**मनोरमा**—तर मला बक्षीस काय द्याल ? सांगा.

**मनोहर**—आज किती दिवस तूं एक हरिणांची जोडी बाळगणार आहेस–मी तुला एक अतिशय मौल्यवान् अशी सुंदर हरिणांची जोडी विकत घेऊन देईन—

**मनोरमा**—नाहीं भाऊजी ! तेवढ्या फीवर या वेळीं नाहीं भागायचं ! अनाथबालिकाश्रमाला पांचशें रुपये ताबडतोब द्यायला पाहिजेत तुह्माला ! आहे कबूल ?

**मनोहर**—कबूल ह्मणून काय विचारतेस ? जें तूं सांगशील त्याला मी कबूल आहें.

**मनोरमा**—अहाहा ! काय गुणाचं बाळ तरी ! ज्याप्रमाणं एखादं गुणी बालक जें जें द्यावं तें तें खातं, त्याप्रमाणं मी सांगेन तें करायला तुह्मी कबूल आहां ह्मणतां ? बरं, ठरल्याप्रमाणं सारी व्यवस्था करायचं काम तुमच्याकडे लागलं ना ? मी आतां कामाला लागत्यें, तुह्मीहि आतां आकाशांच्या ताऱ्यांकडे पाहून कविता रचण्याचं तूर्त सोडून प्रत्यक्ष काम करायला कंबर बांधा ! माझ्या विचाराशिवाय मात्र कांहीं करायचं नाहीं, हें लक्ष्यांत असूं द्या.

**मनोहर**—ठीक आहे. बरें, आतां तुझें डोकें दुखायचें राहिलें अगदीं ? थोडें लव्हेंडर नाहीं तर कोलन वॉटर घालना डोकीवर. आणून देऊं ?

**मनोरमा**—नको, आतां डोकं वरंच उतरलं आहे. भारीच बाई आज डोकं दुखलं हो ! माझ्यानं अगदीं सोसवेना दिखील–अगदीं रडूं यायला लागलं. ( बाटली हुंगीत हुंगीत जाते. )

**मनोहर**—अहाहा ! आमची वहिनी ह्मणजे साक्षात् लक्ष्मी आहे ! स्त्रीशिक्षणाच्या द्वेष्ट्यांनों ! स्त्रिया सुशिक्षणानें भूषित झाल्या आणि त्याबरोबरच

भलत्यासलत्या विचारांनीं त्यांनीं आपलें मस्तक भडकूं दिलें नाहीं, ह्मणजे त्या प्रत्यक्ष स्वर्गीय देवता कशा होतात, हें तुह्मांला माझ्या पूज्य वहिनीच्या उदाहरणावरून स्पष्ट दिसून येईल. पूर्व जन्मींच्या सुकृतानें अशी ही पत्नीरूपी देवता प्राप्त झाली असतां आमचे दादा तिला आपल्या दुष्कृतींनीं छळतात, तेव्हां ते खरोखर हतभागी नव्हेत का? वहिनी, वहिनी! माझ्यांत जर कांहीं मनुष्यत्व असेल तर शक्य ते प्रयत्न करून मी दादांनां असन्मार्गापासून परत वळवीनच वळवीन!

[ जातो.

[ पडदा पडतो. ]

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

[ **स्थलः**—नदीतीर. भाऊसाहेब आणि मधुकर बोलत येतात. ]

**मधुकर**—आपली काळजी आणि दुःख ज्यानें नाहींसें होईल तें तें करणें आमचें आद्य कर्तव्य आहे, असें मी समजतों. या साऱ्या हेमन्तपुरांत आपणासारखे थोर, सन्मान्य आणि पूज्य गृहस्थ सांपडणें अशक्य आहे. माझ्यासारख्या तरुणांनीं आपल्यासारख्या ज्ञानवृद्ध पूज्य गृहस्थांची सेवा अवश्यमेव केली पाहिजे.

**भाऊसाहेब**—अहाहा! तुमच्या तोंडांतून नुसतें अमृत स्रवतें आहे! भाषण किती गोड आणि त्यांत विनय तरी किती! पण जाऊंद्या—आपण तूर्त आपल्या कामाविषयींच बोलूं. नानासाहेबांचे हे चिरंजीव—मनोहरपंत—मला सर्वथैव पसंत आहेत. नानासाहेबांशीं माझी किती दाट स्नेह होता ह्मणून सांगूं? अगोदर नानासाहेबांचे चिरंजीव-त्यांतून विद्वान्, बुद्धिमान्! वर्तनानें अत्यंत निर्मल! मुद्दाम हुडकूं लागलों तरी त्यांच्यांत दोष सांपडणें कठिण आहे-खरें कीं नाहीं मी ह्मणतो हें?

**मधुकर**—उघडच आहे, आमच्या मनोहरासारखें स्थळ मिळावयाला सात जन्म तपश्चर्या करूनहि भागावयाचें नाहीं!

**भाऊसाहेब**—मनोहरपंतांचे तुह्मी मित्र, नाहीं कां? तुमचें नांव काय ह्मटलेंत? काय पहा-तुमचें नांव तर मोठें गोड आहे. आमच्या बाबासाहेबांचे तुह्मी चिरंजीव! मग काय विचारायचें आहे? तुह्माला मीं अगदीं लहान असतांना पाहिलें होतें—हल्लीं तुह्मी बरेच मोठे झालां हो! बाबासाहेब अन् मी, या दोघांत अगदीं हरिहराप्रमाणें स्नेह होता, समजलें? '**शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः!**' हो, पण तुमचें नांव काय ह्मणालांत? म-म-मधुसूदन नाहीं का?

**मधुकर**—( स्वगत ) ह्मातारा बराच विसराळू दिसतो-मघांपासून यानें हें पांचव्यांदा माझें नांव विचारिलें. ( उघड ) नाहीं भाऊसाहेब! माझें नांव मधुकर—

**भाऊसाहेब**—मधुकर-मधुकर-नांव फार गोड आहे; आतां अगदीं नीट लक्ष्यांत धरून ठेवलें पाहिजे. परमेश्वर तुह्माला दीर्घायु करो! हो, पण तुह्मी काय ह्मणत होतां?

**मधुकर**—मी असें ह्मणत होतों भाऊसाहेब!—कीं, आमच्या वहिनीबाईंचें असें ह्मणणें आहे, कीं, उषाताईंनां उपदेशाच्या दोन गोष्टी सांगून त्याचें मन वळवील असें बायको मनुष्य—आई ह्मणा, मावशी ह्मणा किंवा वडील बहीण ह्मणा—आपल्या घरीं कोणीहि नाहीं. अगोदरच लिहिण्यावाचण्याच्या किंवा शिक्षणाच्या खोट्या कल्पनेनें उषाताईंचें मस्तक बिघडून गेलेलें आणि त्यांतून एकटें रहाण्याचें त्यांनां भाग पडल्यामुळें तें अधिकच भडकलें! कांहीं काळ जर त्या चारचौघी मैत्रिणींच्या संगतींत घालवितील, तर त्यांच्याशीं दोन गप्पागोष्टी होऊन उषाताईंचें हें सर्व वेड थोड्याच अवकाशांत पार नाहींसें होईल, अशी वहिनींची पक्की खात्री आहे.

**भाऊसाहेब**—अहाहा—अगदीं लाख रुपयांची गोष्ट बोललांत तुह्मी मधुसूदनराव! तुह्माला काय सांगूं? माझी उषा ह्मणजे माझा दुसरा प्राण होऊन राहिली आहे! ती जेव्हां अगदीं लहान होती, तेव्हांच आह्मां सर्वांनां चिर दुःखांत लोटून तिची आई स्वर्गाला निघून गेली. तेव्हांपासून तिची आई आणि बाप हीं मीच स्वतः होऊन उषेचें संगोपन केलें आणि मोठ्या प्रयत्नानें तिला लहानाची मोठी केली. माझ्या सर्व संसाराचा आणि जीविताचा ती एकटीच काय ती आधार असल्यामुळें माझ्याकडून तिचे फाजील लाड झाले असतील-मी नाहीं ह्मणत नाहीं—पण मी तर काय करूं म–म–मधुसू—मधुकरपंत? परमेश्वर कृपा करील आणि जर नानासाहेबांच्या चिरंजीवांशीं–मनोहरपंतांशीं उषेचा विवाह होईल, तर माझ्या मस्तकावरील एक केवढें तरी ओझें नाहींसें होऊन मी राम राम ह्मणत सुखानें डोळे मिटीन.

**मधुकर**—होय भाऊसाहेब! आपण ह्मणतां त्या सर्व गोष्टी अगदीं खऱ्या आहेत; परंतु आपला हेतु जर सरळ साध्या मार्गानें साध्य होत नाहीं, तर तो साध्य होण्याला आपणाला कांहीं निराळा उपाय केला पाहिजे. आमच्या वहिनींनीं या गोष्टीला एक युक्ति शोधून काढली आहे.

**भाऊसाहेब**—ईश्वर तुमच्या वहिनींचें कल्याण करो. काय त्यांचें ह्मणणें आहे?

**मधुकर**—वहिनींचें ह्मणणें असें आहे, कीं, उषाताईंनां घेऊन राजेबहाद्दरांच्या नजरबागेसारख्या ठिकाणीं आपण फिरायला यावें, आपल्या मैत्रिणींनां बरोबर घेऊन तेथें वहिनीहि येतील; तेथील उघड्या हवेंत फिरल्यानें, उषाताईंच्या कोंडलेल्या शरीराला आणि मनाला व्यायाम मिळून चार मैत्रिणींशीं

गप्पागोष्टी झाल्यानें त्यांचें चित्त प्रसन्न होईल. अशा रीतीनें कांहीं दिवस गेल्यावर उषाताईचें वेड हळुहळू नाहींसें होऊन सर्व कांहीं आपल्या मनाप्रमाणें होईल. आपण हें मुद्दाम करित आहों असें मात्र उषाताईनां कळूं देऊं नये, म्हणजे झालें. पाहिजे तर पहिल्यानें राजेबहाद्दरांच्या बागेंतच आपण जाऊं. राजेबहाद्दर माझ्या चांगल्या परिचयाचे आहेत. आपल्या कामासाठीं त्यांची बाग आपणाला मिळेल, अशी मी तजवीज करतों. उद्यां आपण उषाताईनां घेऊन तेथें या. वहिनींनां घेऊन मीहि येतों. याप्रमाणें एक दिवस राजेबहाद्दरांच्या नजरबागेंत, एक दिवस कात्यायनी टेंकडीवर, एक दिवस शिकारखान्यांत, याप्रमाणें आपण फिरायला जात जाऊं. उषाताईचा रोग आहे मानसिक; त्याला असलेच उपचार केले पाहिजेत.

**भाऊसाहेब**—तुमच्या वहिनींची युक्ति फार पसंत आहे. त्यांच्या चतुरस्रपणाबद्दल आणि सुशीलाबद्दल साऱ्या हेमन्तपुरांत ख्याति आहे ती कांहीं उगीच नाहीं. ठरलें तर, उद्यां पांच वाजण्याच्या सुमारास उषेला घेऊन मी राजेबहाद्दरांच्या बागेंत येतों, वहिनींना घेऊन तुम्हीहि या. तुम्ही सर्व मिळून माझ्या पोरीला ताळ्यावर आणण्याचें यश घ्या, आणि मनोहरपंतांबरोबर तिचे दोहोंचे चार हात होऊंद्यात, एवढीच माझी म्हाताऱ्याची इच्छा, दुसरें काय ? तुम्ही तर आमच्या बाबासाहेबांचे चिरंजीव, तुमचा आमच्यामध्यें तिळमात्र सुद्धां परकेपणाचा भाव नाहीं, समजलांत म–म–मधु–काय तुमचें नांव म्हणालांत ? काय बरें ? माधव—नव्हे–मधुसूदन नाहीं ?

**मधुकर**—( हंसून ) नाहीं–मधुकर.

**भाऊसाहेब**—हो हो—मधुकर ! हें पहा मधुकरपंत ! तुमची आज भेट झाली—मला काय आनंद झाला म्हणून सांगूं ? जणूं काय माझा प्रत्यक्ष मुलगा मला आज फार वर्षांनीं भेटला असें मला वाटलें. मधुकरपंत ! उषा तुमची पाठची बहीण असें समजून तिच्या कल्याणाचा भार तुम्हींच आतां घेतला पाहिजे. तुमचे वडील, बाबासाहेब, माझ्या पोरीला स्वतःच्या मुलीप्रमाणें मानित असत. राजेबहाद्दरांच्या नजरबागेंत दुसरें कोणी फिरायला येत नाहीं, एवढें बरें आहे. हो, मुलींनां तेवढा जास्त एकान्त सांपडलेला कांहीं वाईट नाहीं. मधुकरपंत ! तुमच्या मनोहराशीं उषेचें लग्न जेणेंकरून होईल असा सर्व भार आतां तुम्हीं आपणांवर घेतला पाहिजे. पोरीचे तुम्ही वडील बंधु आहांत—

**मधुकर**—भाऊसाहेब! इतक्या काकुळतीनें मला हें बजावून सांगण्याची जरूर नाहीं—

**भाऊसाहेब**—बरें तर मी जाऊं आतां? उषेनें मला कांहीं पुस्तकें विकत आणायला सांगितलीं आहेत, तेवढीं आज मला नेलींच पाहिजेत. बरें उद्यां संध्याकाळचें ठरलें ना?

**मधुकर**—भाऊसाहेब! उद्यां संध्याकाळचें ठरलें असेल तर तुह्मी उषाताईनां पुस्तकांचें दर्शनहि सध्या करूं देऊं नका. त्यांनींच तर त्यांचें मस्तक भडकून गेलें आहे. हा खुद्द वहिनींचा निरोप आहे तुह्माला. मघाशीं मी सांगायला विसरलों.

**भाऊसाहेब**—तुह्मी ह्मणतां तें खरें आहे मधुकरपंत! परंतु पोरीची कोणतीहि इच्छा न पुरविणें ह्मणजे माझ्या अगदीं जिवावर येतें पहा! परंतु तुह्मी ह्मणतां तसेंच करणें बरोबर आहे. हो, नाहीं तर वैद्याचें औषध घ्यायचें आणि कुपथ्यहि करायचें, मग रोग्याला गुण कसा येणार?

[ जातो.

[ मनोहर येतो. ]

**मनोहर**—काय बुवा, कसा काय उतरला बेत?

**मधुकर**—पलीकडच्या झाडीआड राहून ठरल्याप्रमाणें तूं सारें ऐकलेंस ना?

**मनोहर**—हो, ऐकलें, अशा प्रसंगीं का मी चुकणार?

**मधुकर**—मग माझ्याच तोंडून ऐकण्यांत काय अधिक आहे?

**मनोहर**—आहे, खरोखरच तुझ्या तोंडून तें ऐकण्यांत माझा कांहीं हेतु आहे.

**मधुकर**—कोणता तो?

**मनोहर**—असें पहा मधु! मी अगोदरच भ्रमिष्ट आहें असें तुह्मीं सर्वांनीं ठरविलें आहे; त्यांतून अलीकडे माझें डोकें खरोखरच ठिकाणावर नाहीं; आतांशीं मी कांहीं तरी ऐकतों-भलतेंच बोलतों, अशी माझ्या मनाची चलविचल उडून गेली आहे. तेव्हां तुझें अन् भाऊसाहेबांचें आतां झालेलें संभाषण जरी मीं बहुतेक ऐकलें आहे, तरी भ्रान्तिष्टपणामुळें मी तें सारें जवळजवळ विसरूनच गेलों आहें ह्मणेनास! ह्मणून ह्मणतों, तूंच काय तें सांगितलेंस तर बरें पडेल.

**मधुकर**—( हंसून ) भ्रमिष्ट कविमहाराज! मीं सांगितलेलें तरी आपल्या ध्यानांत राहील याला प्रमाण काय? तरी पण तुला सांगून एकदा मोकळें झालेलें बरें! अशी ह्मणतोस भाऊसाहेबांजवळ पक्की भद्रेश्वरी केली आहे, कीं, वहिनींचा बेत हजार हिश्शांनीं पार पडलाच पाहिजे. पण–पण—

**मनोहर**—( त्रासून ) पण—पण—काय करतोस? आतां अडलें आहे कशांत?

**मधुकर**—द्रव्यांत! मीहि स्पष्ट सांगतों तुह्माला भुजंगनाथ, द्रव्यांत! हो, आतां प्रत्यक्ष माझ्या धंद्याशीं संबंध आला तेव्हां तुह्माला स्पष्ट सांगणें भाग आहे. आमची मध्यस्ती चांगली पटली पाहिजे आतां!

**मनोहर**—( हंसून ) कसली मध्यस्ती दीक्षित?

**मधुकर**—आमच्या क्लबला एक बडी मेजवानी झडली पाहिजे मनोहर! तुझ्याकडून, आहे कबूल?

**मनोहर**—'बाजारांत तुरी अन् भट भटणीला मारी!' अशांतलाच हा प्रकार ह्मणायचा! अगोदर 'शुभमंगल' तर होऊं द्या, मग मेजवानीचें पहातां येईल!

**मधुकर**—त्याबद्दल अजूनहि शंकाच आहे तुला? तुझ्या वहिनीसारख्या कुशल डॉक्टरांनीं ही 'केस' हातांत घेतल्यावर 'ती' हटकून बरी झालीच पाहिजे! हो, पण बरी आठवण झाली. तुझ्या दादाचें तारूं अलीकडे बरेंच भडकत चाललें आहे असें दिसतें. तें आवरण्याला आपणाला प्रयत्न करायला नको का?

**मनोहर**—( सुस्कारा टाकून ) ही गोष्ट तर माझ्या डोळ्यांसमोर सदोदित उभी असते. पण करणार काय? कोणत्या उपायांनीं दादा पुनः ताळ्यावर येतील, मला कांहीं सुचत नाहीं!

**मधुकर**—अशा गोष्टींत कुपथगामी मनुष्याला उपदेश करण्यापलीकडे त्याच्या हितचिंतक सुहृदांच्या हातीं फारसें कांहीं नसतें; परंतु शुष्क उपदेशाचा त्याच्यावर कांहीं देखील परिणाम होत नाहीं. तो जात असलेल्या कुमार्गापासून त्याची सुटका व्हावयाची असेल तर ती त्या मार्गांत त्याला बसलेल्या तडाक्यांनींच होते. तुझ्या दादासारख्या कुलशीलवान् सद्गुणी मनुष्याला असा एखादा जबरदस्त तडाका बसला तर त्याचे डोळे उघडायला बिलकुल

वेळ लागत नाहीं. कुमार्गगामी मनुष्याला असे तडाखे बसल्याशिवाय कधींहि रहात नाहींत. वहिनीहि आपल्याकडून प्रयत्नांची शिकस्त करित असतील—

**मनोहर**—हें काय विचारतोस ? जर परमेश्वर परम दयाळु आणि न्यायी असेल तर वहिनीसारख्या साध्वीच्या प्रयत्नांला यश येऊन तिचे मनोरथ पूर्ण झाल्याशिवाय कधींहि रहाणार नाहींत हें खास !

**मधुकर**—परमेश्वर करो आणि वहिनीचे अन् तुझे सर्व मनोरथ पूर्ण होवोत. बाकी, अशा प्रसंगीं परमेश्वराची करुणा भाकण्यापलीकडे आपल्या हातून कांहीं होऊं नये, हें खरोखर आपणाला लांछनास्पदच आहे !

[ जातात.

---

## प्रवेश दुसरा.

[ **स्थळः**—राजेबहाद्दरांची नजरबाग. एका घनदाट कुंजापाशीं मनोहर आणि पुरुषवेष घेतलेली मनोरमा बोलत उभीं आहेत, असा प्रवेश. ]

**मनोहर**—(घड्याळाकडे पाहून) वहिनी, पांच वाजून दोन अडीच मिनिटें झालीं. अजून भाऊसाहेबांचा कुठें पत्ता नाहीं !

**मनोरमा**—( गुणगुणते )

> **‘ राधा ’ वदनीं, ‘ राधा ’ नयनीं,**
> **‘ राधा ’ अशनीं, ‘ राधा ’ स्वप्नीं;**
> **माधव ! राधामय जनिं विपिनीं**
> **राधा-बाधा तुज ही कैशी ?**

**मनोहर**—( मोठ्यानें हंसत ) होः होः होः ! वहिनी ! माझी थट्टा करतांना तूं दादांच्या नांवानें स्पष्ट उल्लेख करून त्यांचीच टर उडविलीस कीं !

**मनोरमा**—( खालीं मान घालून हंसत ) अगबाई ! खरंच कीं भाऊजी ! दुसऱ्यासाठीं खोदलेल्या खड्यांत मनुष्य स्वतःच पडतो तो असा बरं ! (स्वगत) माझ्या मनांत चाललेली खळबळ लपविण्याविषयीं मी शिकस्त करित असतां याप्रमाणं एखादे वेळीं ती अचानक प्रगट होते ! निसर्गावर मनुष्याचा ताबा किती चालणार ?

**मनोहर**—पण वहिनी ! भाऊसाहेब इतक्यांत यावयाला पाहिजे होते. मधूनें कांहीं चूक तर नाहींना केली ?

**मनोरमा**—तुह्मी तरी भाऊजी, लग्नासाठीं भारीच उतावीळ झालेले दिसतां ! येतील आतां ते. पण तुह्मी आडआडच रहा बरं का ? ह्मणजे जसजशी वेळ येईल, तसतसं पुढं वागायला बरं पडेल; नाहीं तर उतावीळपणानं सगळी घाण करून टाकाल.

**मनोहर**—नाहीं वहिनी ! माझ्या आयुष्यांतील परम सुखाचा नाश करायला मी का वेडा आहें ?

**मनोरमा**—आणखी वेड तें काय असतं ? प्रणयिजन, कवि आणि वेडे हे सारे एका माळेंतले मणि, असें तुमच्याच एका कवीनें ह्मटलं आहे ना ? पण भाऊजी ! माझ्या या वेषांत कुठं कांहीं चुकलं तर नाहीं ? मी खरोखरी पुरुषासारखी दिसत्यें ना ? हा अंगरखा, ही विजार, हा चढाव, हा पटका—सारं जागच्याजागीं नीट आहे ना ?

**मनोहर**—अगदीं बरोबर ! पटक्यांतून नाटकी फॅशनवर खांद्यावर लोंबणाऱ्या केशांमुळें खरोखर तूं एखाद्या नायकाप्रमाणें दिसते आहेस वहिनी ! जणूं प्रतिभाऊरावच ! वहिनी ! आतां सारें यश तुझ्या हातीं !

**मनोरमा**—अन् तुमच्या कपाळीं ! पण आह्मीं रचलेला हा सारा घाट कुण्णा—कुण्णाच्या कानांवर जायचा नाहीं अशी पूर्ण सावधगिरी आपणाला ठेवली पाहिजे भाऊजी ! जर का ही गोष्ट एखाद्या वर्तमानपत्राच्या एडिटराच्या कानीं गेली, तर मग आपल्या फजितीला पारावार नाहीं पहा! मग आमच्यावर टीका होतील, गोष्टी लिहिल्या जातील, नव्हे—आमचंच संविधानक घेऊन नाटककर्ते romantic नाटकंदिखील लिहितील !

**मनोहर**—नाहीं ग वहिनी! तुझ्या आपल्या कांहीं तरीच शंका! ही राजेबहाद्दरांची खासगी नजरबाग आहे—कांहीं सार्वजनिक बाग नव्हे—इथें कोण कशाला येतें आहे ? ओहो ! पण ती मंडळी आली पहा—मधु सर्वांच्या पुढें आहे. चल चल वहिनी, आपण त्या कुंजाच्या आड होऊं या झटकन् !

**मनोरमा**—आहे, एवढं तरी प्रसंगावधान आहे ह्मणायचं तुमच्यांत !

[ जातात.

[ भाऊसाहेब आणि मधुकर येतात. ]

**मधुकर**—वहिनी वगैरे मंडळी केव्हांची येऊन तें मंदिर पहात आहेत. पुष्करणीच्या तीरावरील या शिलासनावर उषाताईनां आपण बसायला सांगा

ना? चला भाऊसाहेब! आपण जाऊं या आतां. वहिनींना मी जाऊन कळवितों–बायकाबायकांत आह्मां पुरुषांची उगीच अडचण नको.

[ जातो.

**भाऊसाहेब**—उषे! पोरी—ये ये अशी—इतकें कांहीं यांनां लाजायला नको हो! हे मधुकरपंत ह्मणजे तुझे वडील भाऊ आहेत, समजलीस?

[ उषा आणि सुशीला प्रवेश करतात. ]

**भाऊसाहेब**—या, बसा या शिलांवर. अहाहा! किती सुंदर गोड जागा आहे ही, नाहीं उषे? ही विस्तीर्ण पुष्करणी, हीं कारंजीं, हे सुरूचे खांब—अहाहाहा! किती रम्य बाग ही! बरें उषे, तुह्मी जरा इथें बसा, मी जरा जाऊन येतों हं पलीकडून? स्वस्थ बसा, इथें तुह्माला कोणी त्रास देणार नाहीं.

[ जातात.

**उषा**—सु—

**सुशीला**—काय गडे उ?

**उषा**—गडे सु–! किती रम्य हें उपवन? बाबांसारख्या गद्यमय, unromantic मनुष्याच्या साध्या भोळया मनालादिखील.या बागेनं मोह पाडला! अहाहा! अद्भुत, रम्य, स्वप्नमय, रमणीय, काव्यकल्पनापूर्ण अशा ज्या सुंदर स्थलाची कल्पना आज अनेक दिवस माझ्या मनांत सतत वास करित होती, तेंच हें स्थळ माझ्या सुदैवानं मला दिसत आहे! अहाहा! romontic-romantic! ही पद्मपुष्पांनीं सुंदर दिसणारी विस्तीर्ण पुष्करणी, तिच्या कांटचीं हीं शिलाखंडें, हे घनदाट लताकुंज, हे नागमोडी रस्ते, प्रेमजलांचे फवारे उडविणारीं हीं संगरमरवरी कारंजीं, हीं पक्षिगृहें, हें दिव्य मंदिर, झाडांवरून किलबिलाट करून बागडणारीं हीं पांखरें, हे मयूर, ही रमणीय शांतता–सारेंच अद्भुत, सारेंच हृदयंगम, सारेंच romantic! पण—( दीर्घनिःश्वास टाकून ) गडे सु! या सर्व romance चा काय उपयोग?—

“ बघुनि उपवना विरहाग्नीची ज्वाला भडके उरीं,
पुष्पांचा तो सुगंध माझ्या शूल निपजवी शिरीं!
कोकिलकूजित ऐकुनि वाटे वीज कडाडे वरी!
कारंजांचे तुषार भासति अग्निकणाचे परी!

सुमंद शीतल सुगंध मारुत येतां अंगावरी,
थरथर काळिज कांपे, वाटे डाग बसति अंतरीं !
पक्ष्यांचीं जोडपीं खेळति नानापरी;
दे तंतुस हंसहि स्त्रीच्या वदनांतरीं;
सुखवाया कान्ता मोर सुनृत्या करी;
जिकडे तिकडे पाहुनि ऐसें मी होतें घाबरी—"

**सुशीला**—ऐक, ऐक गडे उ–तें पहा, पलीकडील कुंजाकडे कुणी बांसरी वाजवून गात आहे—

[ प्रणयी नायकाच्या आविर्भावानें मधूनमधून बांसरी वाजवित व मधून मधून खिन्नपणानें गात मनोरमा एका कुंजांतून दुसऱ्या कुंजाकडे जाते. ]

**मनोरमा**—

"राधे ! राधे ! हृदयवल्लभे ! त्यजिं कोपा सदये !
शोधुं कुठें तुज ? श्रम कां देसी ? मधुर वचा वद ये—
कुंजवनींच्या लतिका-रमणी भ्रमिं समजुनि राधा,
आलिंगीं; परि तीव्र कंटकीं देती मज बाधा !
रक्त न गे ! अनुरागराग तव मनिं समजुनि दयिते !—
स्मरुनि तुझा मुखचंद्र–, मानितों स्वर्गसुखचि तयिं तें !
तुजविण सुंदरि ! विष परि गणितों स्वर्गसुखा अतुला;
अमरपुरीपरि वन हें, वक्षीं जरि मी धरिन तुला !
राधे ! राधे ! हृदयवल्लभे ! त्यजि कोपा सदये !
शोधुं कुठें तुज ? श्रम कां देसी ? मधुर वचा वद ये—"

[ जाते.

**उषा**—अहाहा ! मी जागृत आहें, कीं स्वप्नांत आहें? किती गोड बांसरी–गायन तरी किती मोहक? सु, सु–! क्षणार्धांत आपल्या मधुर गायनानं मनाला वेड लावणारा, स्वरूपानं कोटिमदनांला लाजविणारा कोण गडे, हा तरुण ? झाला, झाला, romance चा अगदीं कळस झाला! गडे सु—!

**सुशीला**—बोलूं नकोस गडे उ–बोलूं नकोस ! त्या गन्धर्वराजाच्या गायनानं माझी कशी विलक्षण स्थिति झाली आहे ! माझा चित्त-चकोर अगदीं उद्भ्रान्त होऊन गेला आहे !

**उषा**—अहाहा ! त्याच्या गायनाची अन् बांसरीची तान कानांत कशी सारखी गुणगुणते आहे ! "राधे ! राधे ! हृदयवल्लभे ! त्यजि कोपा सदये !" मनमोहना! तुझ्यासारख्या नयनमनोहर सुंदर माधवावर कोप करणारी कोण बरं ही अरसिक हतभागी राधा ? अहाहा ! तुझ्यावरून पंचप्राण ओंवाळून टाकावे ! गडे सु ! याचा वेष तरी किती सुंदर ! अन् ते खांद्यावर मोकळे सोडलेले केश ! त्या केशपाशानंच तर त्यानं माझं हृदय आकर्षून घेतलं–सु सु ! मला आतां वेड लागणार खास ! बांसरी वाजवितांना अन् गाणं ह्मणतांना त्याची मुद्रा तरी नायकाला किती अनुरूप होती ती पाहिलीस ना ? अहाहा ! romantic, romantic !

**सुशीला**—खरंच इंद्रजाल !–सारंच magic ! गडे उ–! मला वाटतं, आपल्या ध्यानीं मनीं स्वप्नीं सदासर्वदा वसणारं हें दिव्य romance एकदम मूर्तिमान् प्रकट करून त्यांतच परमेश्वर आमचा अंत करणार ! अहाहा ! हा मलयवायु तरी किती गोड वहातो आहे ?

**उषा**—खरंच, प्रकृतिसुंदरी किती मनोहर नृत्य करित आहे ! गडे सु ! मला अशी उत्कट इच्छा झाली आहे, कीं, गायनाची तान होऊन या शांत स्निग्ध वायूच्या लहरींबरोबर तरंगत तरंगत वहात जावं—

> **"कवण सांग गुरु पथिका ! भेटला तुला जनीं ?**
> **अर्पित जो गानकला तुजसि विश्वमोहिनी !**
> **गानशरा सोडिशी,**
> **हृदयमृगा विंधिसी !**
> **मृति न देसि, टाकिसि परि वेड तया लावुनी !**
> **कवण सांग गुरु पथिका ! भेटला तुला जनीं ?**
> **अर्पित जो गानकला तुजसि विश्वमोहिनी !"**

गडे सु- सु ! माझी आतां धडगत नाहीं खास ! त्या गंधर्वराजाला मीं डोळ्यांनीं धड पाहिलंदिखील नाहीं ग ! त्याच्या त्या दिव्य गायनाच्या तानेनंच माझ्या हृदयांत अगदीं कालवाकालव करून सोडली आहे ! काय करूं ?

> **" तुजसी न पाहिं नयनीं; ऐकें मुरलीच कानीं !**
> **परि जें मदीय होतें, हृदयादि अर्पिलें तें—**
> **तुजला जनाभिरामा ! शामा ! मनोविरामा !**
> **मग कां मदीय अन्ता बघसी सखया अनन्ता ?**

चल ये; भरोनि डोळां, बघुं दे मुखपंकजाला.
तुजसीं न पाहिं नयनीं; ऐकें मुरलीच कानीं ! ”

**सुशीला**—स्थिर हो, गडे उ ! स्थिर हो ! विचार करून मनाला शांत कर. एक अनोळखी पथिक आपल्या वाटेनं गाणं गात जातो काय, अन् तूं चांगली शिकलीसवरलेली सुजाण स्त्री त्या गाण्यानं इतकी अधिर अन् चंचल होऊन जातेस काय ? काय ह्मणावं तुला ?

**उषा**—खुळे सु ! याच वेळीं तुला हा भलता वेदान्त कसा सुचतो ग ? तुला खरंच कांहीं कळत नाहीं असं ह्मटलं पाहिजे. Love at first sight ह्मणतात तें का उगीच ? फुकट ग फुकट तूं इतकीं नाटकं पाहिलींस अन् वाचलींस ! प्रणयिजनांचं प्रेम एकमेकांवर पहिल्या भेटीला निमिषार्धांत जडावं लागतं, समजलीस ? नाहीं तर 'चक्षूराग' किंवा 'तारामैत्रक' हीं विशेषणं प्रेमाला कशीं लागू पडणार ? मालती-माधव, दुष्यन्त-शकुंतला, शूरसेन-शालिनी, रोमिओ-जुलिएट, इत्यादि नाटकांतल्या प्रणयियुग्मांचं प्रेम पहिल्या भेटीलाच जडलं नाहीं का ? ज्यांचं प्रेम पहिल्या मीलनांत एकमेकांवर जडत नाहीं, तें जोडपं नायक-नायिकेच्या भूमिकेला मुळीं योग्यच नाहीं !

**सुशीला**—वहावा ! तुझ्या या व्याख्येनं बरींच नाटकं नायक-नायिके-शिवायच अखेरपर्यंत रहाणार तर !—

**उषा**—ऐक ऐक-तें पहा, तिकडे कुणी गात आहे पुनः—

[ पूर्वीप्रमाणेंच पुनः गात गात व बांसरी वाजवित मनोरमा एका कुंजांतून दुसऱ्या कुंजाकडे जाते. ]

**मनोरमा**—

“ प्रेम-याचकासि या न विमुख करीं.
जीवन मम मानिनी ! तुझ्याच करीं !
चिंतानिं तव सलिल जें लोचन वमती सुंदरि !
सेवुनि तें आजवरी प्राण धरीं !
पाषाणचि राहसी अवमानुनि मजसि तरी,
शिरमोक्षा करुं दे तव हृदयावरि !
प्रेम-याचकासि या न विमुख करीं.
जीवन मम मानिनी ! तुझ्याच करीं ! ”

[ जाते.

**उषा**—( दीर्घ निःश्वास टाकून ) नाहीं गडे, मी आतां वांचत नाहीं ! अन् वांचून तरी काय करायचं आहे ? या शुष्क जीवनांत आतां काय अर्थ राहिला आहे ? या विफल जन्माचा जड भार वाहून भयंकर यातनाच भोगायच्या कीं नाहींत ? माता पृथिवी दुभंग होऊन या प्रसंगीं जर मला आपल्या पोटांत स्थान देईल तर माझ्या सर्व मनोव्यथा तरी शांत होतील ! खरंच गडे सु ! या मृत्युलोकचा मला कसा अगदीं वीट येऊन गेला आहे. ( जरा थांबून ) ते गेले काय ? थांबा, थांबा. एक क्षणभर तरी थांबा. आपण गायनकलेचे मूर्तिमान् अधिदेव मला अभागिनीला या romance पूर्ण उपवनांत दर्शन द्यायला आलां काय ? माझ्या मनाला क्षणमात्रांत पक्कं वेड लावणारे असे आपण आहां तरी कोण ? आपण कोणीहि असा—देव, यक्ष, गंधर्व, किन्नर—‘ कॉमेडी ’ चे धीरोदात्त अधिनायक—

**सुशीला**—‘ ऑपेरा ’ चे नायक—

**उषा**—‘पँटोमाइम’ चे ‘ डंब-शो ’—

**सुशीला**—किंवा ‘ मेलो-ड्रामांचे, ‘ हीरो ’—

**उषा**—आपण कुणीहि असा, कृपा करून या उषेचा स्वीकार करा—(स्फुंदत) सु-सु ! किती अभागी मी ! माझी पुढं गति तरी काय होणार गडे ?

**सुशीला**—तर मग खुळे पोरी ! जोंपर्यंत ते आपल्या दृष्टीसमोर उभे राहून बांसरी वाजवित गात होते, तोंपर्यंत त्यांच्याशीं दोन शब्द बोलायला तुला काय झालं होतं ?

**उषा**—अग वेडे, त्यांचं गायन चाललं असतां मी का आपल्या भानावर होत्यें ? त्या वेळीं माझ्यांतला सारा मीपणा गळून जाऊन मी केवळ तन्मय होऊन गेल्यें होत्यें. तृषातुर चकोरीप्रमाणं मी त्यांच्या मुखचंद्राकडे अनिमिष दृष्टि लावून पहाण्यांत अन् त्या मधुर गीतसुधेचं पान करण्यांत अगदीं दंग झाल्यें होत्यें. माझं मन, प्राण, यौवन, जीवन हीं सारीं त्या गंधर्वकुमाराच्या गायनमंत्रानं भारून गेल्याप्रमाणं पूर्णपणं परवश होऊन गेलीं होतीं. त्यांनीं आपली मोहिनी माझ्यावरून काढून घेतल्यानंतर कांहीं पळांनीं मी शुद्धीवर आल्यें अन् त्यानंतर या सभोंवतालच्या निष्ठुर जगाचं अस्तित्व मला भासूं लागलं !

**सुशीला**—( उषेकडे सकरुण दृष्टीनें पहात ) गेली वरं, सगळी आशा गेली ! तुझ्या मस्तकाबरोबर तुझं हृदयदिखील नाहींसं झालं ! एका क्षणार्धांत त्या

मुरलीधरानं तुझं सर्वस्व कसं काबीज करून घेतलं पहा! गडे उ! तुझं तें गंभीर हृदय पुनः नीट शोधून पहा-त्यांत तुला काय दिसतं बरं ?

**उषा**—शून्यता! निःसीम शून्यता!

**सुशीला**—ऐक-ऐक. तें तिकडे पहा कुणी येत आहे.

[ मनोरमेप्रमाणेंच हुबेहुब नायकाचा वेष करून व खांद्यांवर केश मोकळे सोडून, हातांत बांसरी घेऊन मनोहर एका कुंजांतून दुसऱ्या कुंजाकडे जाऊं लागतो. ]

**सुशीला**—हा पहा तुझा हृदयवल्लभ आला पुनः-उ-उ! बोल बोल त्याच्याशीं. आलेली ही नामी संधि लज्जेमुळं दवडूं नकोस-नाहीं तर कदाचित् सारा जन्म पश्चात्तापांत कंठावा लागेल!

**उषा**—( पुढें जाऊन ) महाराज! थांबा, कृपा करून क्षणभर थांबा. वातावरणांत भ्रमण करणाऱ्या स्वरलहरींप्रमाणं इथं मघांपासून येरझारा घालणारे गंधर्वकुमार आपणच का ?

**मनोहर**—( आश्चर्यभावानें ) अरे, कोण ही ? कुणी वेडी तर नाहीं ?

**सुशीला**—नाहीं नाहीं महाराज! माझी सखी कांहीं वेडी नाहीं. परंतु मांत्रिकानं आपला मोहिनीमंत्र टाकून एखाद्याला मुद्दाम वेड लावल्यावर तें मनुष्य वेडं कां होणार नाहीं ? माझी ही प्रिय सखी एका मुरलीधराच्या मुरलीनं अन् गंधर्वतुल्य गायनानं अगदीं मोहून गेल्यामुळं तिची अशी भ्रान्तिष्टासारखी स्थिति झाली आहे. मघांपासून मधून मधून मुरली वाजवित अन् गात या कुंजापासून त्या कुंजाकडे येरझारा करणारे आपणच का ?

**मनोहर**—होय, मीच तो.

**उषा**—( उत्कंठेनें ) काय आपणच ते ? अहाहा! तर मग आपली ही मोहन-बांसरी वाजवून अन् आपलीं तीं रम्य गीतं गाऊन आम्हांला धन्य करा. महाराज!-पदर पसरत्यें-हात जोडत्यें-माझी ही विनंति अमान्य करूं नका—

**मनोहर**—अरे, ही खरीच वेडी आहे! (स्वगत)गातां कसले? गायनकलेंत आम्ही काकपंडितांच्याच योग्यतेचे!

[ जातो.

**उषा**—( मनोहर गेलेल्या कुंजाकडे खिन्नतेनें पहात ) गेले-निघून गेले! माझी विनंति अमान्य करून एखाद्या निष्ठुराप्रमाणं निघून गेले अं ? तिळभरसुद्धां

माझी दया आली नाहीं! दगडाप्रमाणं मन घट्ट करून चालतें झालें! एकदासुद्धां मागं फिरून मजकडे बघितलं नाहीं, इकडेतिकडे कशी ती दृष्टि फेंकली नाहीं; गडे सु! माझ्याकडे मुळींसुद्धां डोळा न फिरवितां स्वारी निघून गेली, त्याचं मला मरणप्राय दुःख होतं ग! ( निःश्वास टाकून स्फुंदत ) मी आतां क्षणभर दिखील जिवंत रहायची नाहीं अन् जिवंत राहून तरी काय करायचं आहे? मजकडे नुसतं पाहिलंसुद्धां नाहीं! मी या पुष्करणींत उडी घेणार—त्यांनीं माझा आदर केला नाहीं तरी ही शीतल जलपूर्ण पुष्करणी आपल्या पोटांत मला खास जागा देईल. कोमल पुष्पगुच्छाप्रमाणं माझा हा देह या पाण्यांत देखें मी फेंकून—माझ्या देहाचा भार सहन करायला तें कांकूं करणार नाहीं—

**सुशीला**—वा वा! म्हणजे झालाच सारा सत्यानाश! उ उ! म्हणत्येस तरी काय तूं गडे हें? अशी गोष्टदिखील तोंडावाटे नको काढूं. भारी भय वाटतं मला. बंगल्याच्या सुंदर दिवाणखान्यांत हार्मोनियमशेजारच्या मखमाली कोचावर लोळत असतां प्रेमाच्या अवहेलनेमुळं पाण्यांत जीव द्यायच्या गोष्टी बोलण्यांत रम्यता अन् कवित्व आहे! जितक्या जितक्या तूं त्या गोष्टी बोलशील, तितकी तितकी करुणरसाची तार चढतच जाईल; कारण, कोचावरच्या गोष्टींनीं नेसलेली रेशमी साडीहि भिजत नाहीं, अन् त्यांत खऱ्याखुऱ्या भयाचा थांगपत्ताहि नसतो! कोचावरनं फार तर तूं खालच्या मऊ गालिच्यावर उडी घेशील; परंतु इथं थंड पाण्यानं भरलेल्या खोल पुष्करणीच्या कांठावर बसून अशा प्राण देण्याच्या गोष्टी बोलूं नकोस उ! इथल्या गोष्टींनीं हृदयाचा नुसता थरकांप उडतो. या शिलाखंडावरून टाकलेली उडी खरोखरच या थंड पाण्यांत पडायची. इथल्या पुष्करणींत उडी घ्यायचीच असली तर पांचदहा पाणबुडे त्यांच्या सरंजामानिशीं जय्यत तयार ठेवून अन् साड्या वगैरे कोरडीं वस्त्रं आणवून मग घेतलेली बरी नव्हे का?

**उषा**—( विमनस्कतेनें ) तर मग मी करूं तरी काय? हें कोमल प्राणपुष्प पददलित करूं?—जाऊं दे त्याचा चुरा उडून!

[ मनोरमा स्त्रीवेषानें प्रवेश करिते. ]

**मनोरमा**—तुम्ही दोघीजणी इथं बसून काय बरं करतां आहां? तुमच्यावर कांहीं संकट आलं आहे का? या मुलीला बरं वाटत नाहीं वाटतं?

**सुशीला**—नाहीं बाई! हिला तसं कांहीं झालं नाहीं आहे.

**मनोरमा**—तर मग ही अशी विचकल्यासारखी कां बरं दिसते ? अन् असं भलभलतंच कां बरळते ही ? 'प्राणपुष्प' कसलं ? त्याचा चुरा कां करते ही ? असेच कांहीं हिचे विचुक शब्द माझ्या कानांवर आले ह्मणून विचारत्यें मी. तुमच्याबरोबर कुणी पुरुषमाणुस नाहीं वाटतं ? अन् ह्मणून तुह्माला इथं कसलं भयबीय वाटतं कीं काय ?

**सुशीला**—नाहीं नाहीं, तसं कांहीं नाहीं. आमच्याबरोबर पुरुषमंडळी आहे.

**मनोरमा**—तर मग हिची अशी चमत्कारिक स्थिति कां झाली आहे ?

**सुशीला**—तसं व्हायला कांहीं विशेष कारण झालं आहे असं नाहीं. माझी ही मैत्रीण अगदीं sentimental आहे. हिच्या आवडीचं असं गायन इथं हिला कुठून ऐकूं आलं, त्या गायनाच्या तानेबरोबर हिच्या मनाचीहि तन्मयता होऊन गेल्यासुळं हिची अशी भ्रान्तिष्टासारखी अवस्था होऊन गेली आहे, दुसरं कांहीं नाहीं.

**मनोरमा**—( हंसून उषेकडे पहात ) अस्सं अस्सं !

**उषा**—आः ! काय ह्मणत होतीस तूं सु ? ( मनोरमेकडे पाहून आश्चर्यानें ) अगबाई ! आपण कोण ? आपला हा चेहरा कुठं तरी पाहिल्यासारखा वाटतो —पण ओळख पटत नाहीं. पण जाऊं द्या तें. या बागेंत मघांपासून बांसरी वाजवित आणि मधुर कंठानं गात इकडून तिकडे कोण फिरत आहे तें आहे का आपणाला माहीत ?

**मनोरमा**—कुणी गात फिरत आहे ? ह्मणजे ?

**उषा**—तर मग त्या दिव्यगायनानं आपले कान पवित्र झाले नाहींत वाटतं ? अहाहा ! काय तें गायन ! काय त्याची गोडी ! त्याचं वर्णन कुणाला करतां येणार आहे ? अन् ती मुरली तरी किती मधुर ! सर्वच कांहीं स्वप्नमय —उदात्त—मनोहर—romantic ! अरेरे ! त्या गंधर्वराजानं आपली मोहन-बांसरी वाजविली, पण तिचे करुण अश्रुमय सूर माझ्या मर्मस्थलांतून—माझ्या हृदयांतून—उठले ! निष्ठुर सुंदरा ! मजकडे दृष्टिहि न फिरवितां गेलास ना निघून ? ( सुस्कारा टाकते. )

**मनोरमा**—अगबाई ! काय तरी बाई ही बडबड ! खचित खचित हिचं डोकं ठिकाणावर नाहीं. नाहीं तर ही असं भलतं न् सलतं कां बडबडली असती ? अरेरे ! इतक्या तरुण वयांत वेड लागून हिचा सारा जन्म मातीमोल व्हावा अं ?

**सुशीला**—नाहीं, हिचं डोकं अगदीं ठिकाणावर आहे. मघांशीं आपणाला मीं सांगितलेल्या गंधर्वराजाच्या गायनामुळं उत्पन्न झालेली ही sentimentality आहे, दुसरं कांहीं नाहीं. बरं, माझ्या या सखीच्या मनाला उद्भ्रान्त करणारी केवळ त्या गायनाची तानच होती असं नाहीं; त्या तानेबरोबर एक अत्यंत सुंदर अशी दिव्य मूर्तिहि होती !

**उषा**—पण हाय ! ती सुंदर मूर्ति चटकन् नाहींशी झाली ! क्षणभर दिखील तिनं मजकडे पाहिलं नाहीं. माझ्या विनंतीची अवहेलना करून ती निघून गेली ! पाषाणासारखं घट्ट हृदय करून एका निमिषार्धांत ती इथून अन्तर्धान पावली अन् त्या दिशेकडे मी अभागिनी शून्यदृष्टीनं नुसती बघत राहिल्यें ! हाय !—

**मनोरमा**—अस्सं अस्सं ! आतां आलं सारं माझ्या लक्ष्यांत ! तरी ह्मटलं, ह्मणतात काय या दोघीजणी ? त्या गायनाबद्दल ह्मणत असाल तुह्मी ? तें गायन होय ?–अंः ! गात असतो असाच कुणी तरी झालं ! त्याच्या त्या गाण्याला थांग ना पत्ता !—

**सुशीला**—पण कोण बरं तो ?

**मनोरमा**—प्रेमामुळं वेड लागलेला असा तो एक तरुण आहे. त्या वेडाच्या भरांत तो कांहीं तरी गात असतो.

**उषा**—प्रेमामुळं वेड ? अगबाई ! तें कां बरं लागलं त्याला ?

**मनोरमा**—त्या तरुणाचं एका तरुणीवर प्रेम जडलं होतं–इतकं, कीं, ती सुंदरी जणूंकाय त्याचा उच्छ्वासच होऊन बसली होती. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं सदासर्वदा ती तरुणी ! परंतु दुर्दैवानें त्या तरुणीला त्याची तिळभरसुद्धां दया आली नाहीं. त्या बिचाऱ्याकडे तिनं ढुंकूनहि पाहिलं नाहीं. आपण प्राणांपलीकडे प्रेम करित असूनसुद्धां आपली मनोहारिणी आपली उपेक्षा करते–नव्हे, आपलं दर्शनदिखील घेऊं इच्छित नाहीं असं पाहून त्या बिचाऱ्या तरुणाला अतोनात दुःख झालं अन् त्या दुःखाच्या मर्मान्तिक यातनांच्या भरांत त्याला वेड लागलं !

**उषा**—अरेरे ! ( निश्वास टाकते. )

**मनोरमा**—तेव्हांपासून तो तरुण वेडाच्या भरांत कुठं तरी हिंडत असतो अन् मन मानेल तसें गात असतो. परंतु हाय ! जिच्यासाठीं त्याला असं वेड लागलं ती पाषाणहृदयी तरुणी त्याच्याकडे ढुंकूनसुद्धां पहात नाहीं !

**उषा**—अशी पाषाणहृदयी तरुणी आहे एकूण ?

**मनोरमा**—वेडे अशा तरुण कुमारिका किती तरी आहेत जगांत ! खऱ्या प्रणयाची अवहेलना करण्यांत त्यांच्या मनाला कांहींसुद्धां वाटत नाहीं. तुझ्या मतें पुरुष तेवढेच पाषाणहृदयाचे असतात होय ? कोमल हृदयाच्या ह्मणून नांवाजलेल्या स्त्रीजातींतहि अशा पाषाणहृदयी स्त्रिया पुष्कळ सांपडतात हो !

**उषा**—हो, आपण ह्मणतां त्याप्रमाणें असणं संभवनीय दिसतं खरं ! पण आपण अशा उभ्या कां बरं ? जरा बसा ना इथं ?

**मनोरमा**—छे छे ! इथं आल्यावर मनुष्याला स्वस्थ कसं बाई बसवेल ? इथली ही अपूर्व शोभा पाहून एखादा 'बसलेला' मनुष्य दिखील चटकन् उठायचा ! चहूंबाजूंला कांहीं अवर्णनीय अशी शोभा आणि भक्ति-प्रीतीचा आनंद विराजमान झालीं आहेत ! अशा रमणीय स्थलीं का माझ्यानें स्वस्थ बसवेल ! इथं शांतिदेवीचें साम्राज्य स्थापित झालेलं दिसत आहे—

**सुशीला**—खरंच, खरंच ! इथली ही गाढ शांति पूर्वीच्या तपोवनांतील निर्मल शांतीप्रमाणंच मला भासत आहे !

**उषा**—काय ? शांति ? इथं शांति वास करित आहे, असं ह्मणतां तुह्मी ? कुठं आहे ती ? हाय ! इथं येण्यापूर्वीं मात्र मला शांति वाटत होती. इथं आल्यापासून माझ्या चित्ताची शांति नाहींशी होऊन त्याला अशांततेच्या भयंकर इंगळ्या मात्र लागून राहिल्या आहेत ! एका अपरिचित तरुणासाठीं माझं हृदय व्याकुळ होऊन गेलं आहे. गडे सु ! इथं आल्यापासून माझी अशी शोचनीय स्थिति कां व्हावी, तें तूं तरी सांग. हें कांहीं विजन वन नाहीं —हें उपवन आहे; इथं भग्न झालेलं असं एखादं देव-मंदिर नाहीं, या ठिकाणीं बिजली चमकत नाहीं, पाउसाची झड नाहीं, मेघांची घोर गर्जना नाहीं, कांहीं नाहीं ! हृदयांतील एक विशिष्ट भाव उत्पन्न व्हायला ज्या सर्व परिस्थितीची आवश्यकता आहे, तीपैकीं इथं कांहींसुद्धां नाहीं ! मग असं असतां माझ्या हृदयांत असा विलक्षण कल्लोळ कां ह्मणून उत्पन्न व्हावा ?

**मनोरमा**—कुणा भाग्यवानासाठीं तुझ्या चित्ताला अशी भयंकर तळमळ लागून राहिली आहे, तें मला सांग. मी तुझ्या वडील बहिणीच्या ठिकाणीं आहें-मजपाशीं कसलाहि संकोच बाळगूं नकोस. तुझ्या हृदयाची तळमळ शांत होईल, असा मला कांहीं उपाय सुचतो काय तो पहात्यें. इथं माझं जाणंयेणं

पुष्कळ आहे, त्यामुळं इथल्या साऱ्या गोष्टींची अन् माणसांची मला खडानूखडा माहिती आहे. कुणासाठीं तुला एवढी तळमळ लागून राहिली आहे ?

**उषा**—( निश्वास टाकून ) कुणासाठीं तळमळ ?–काय सांगूं आपणाला ! जो माझा हृदयेश्वर असतांहि ज्याला मीं ओळखिला नाहीं ! स्वप्नांत पाहिल्याप्रमाणं ज्याचं आज क्षणमात्रच मला दर्शन झालं, अन् स्वप्नांत ऐकावं त्याप्रमाणं ज्याचं मधुर गायन आणि मुरली मीं आज ऐकली, माझ्या विनंतीचा धिक्कार करून जो क्षणांत नाहींसा झाला—त्याच्यासाठीं–त्याच्यासाठीं !

**मनोरमा**—( हंसून ) अस्सं–अस्सं. त्याचा आपण इथं शोध करून पाहूं या तो आपणाला सांपडतो कीं नाहीं तो. आपल्यासाठीं तुझ्यासारखी एक तरुण सुंदर कुमारिका अगदीं वेडी होऊन गेली आहे, हें जर त्याला कळेल, तर त्या बिचाऱ्याला किती हर्ष होईल ह्मणून सांगूं !

**उषा**—कां बरं ?

**मनोरमा**—या विस्तीर्ण जगांत आपल्यासाठीं एक तरी अन्तःकरण तळमळत आहे, हें ऐकून त्याच्या मनाला समाधान झाल्यावांचून का रहाणार आहे ?

**उषा**—छे छे ! नांव दिखील नका घेऊं ! निष्ठुर ! पाषाण !

**मनोरमा**—परमेश्वर करो अन् तुझा हा समज लवकर दूर होवो ! बरं चल बघूं–तुझा तो पाषाण इथं कुठं शोधून सांपडतो काय तो पाहूं या.

**उषा**—( उत्सुकतेनें ) काय ? ते इथं दिसतील ह्मणतां ? आपल्या तोंडीं साखर पडो. चला, त्यांचं मला एकदा तरी दर्शन करवा—

**सुशीला**—अन् एकवार तरी त्याची मोहन-बांसरी आणि गोड गायन आह्मांला ऐकवा.

**मनोरमा**—चला या तर माझ्याबरोबर.

[ सर्व जातात.

[ मधुकर आणि भाऊसाहेब येतात. ]

**मधुकर**—या बागेंत आमच्या वहिनी येणार आहेत ह्मणून आपण उषाताईंनां कळविलें नव्हतें ना ?

**भाऊसाहेब**—छे छे ! बिलकूल नाहीं.

**मधुकर**—तेंच बरें केलेंत आपण.

**भाऊसाहेब**—हो, मीं असा विचार केला, कीं, या विक्षिप्त पोरीला मीं हें कळविलें अन् त्या पोरीनें जर हट्ट घेतलान्, कीं, कुणी येत असेल तर मी साफ येत नाहीं बागेंत फिरायला, तर करतां काय ? अहो, त्या हट्टी पोरीची कधीं काय लहर लागेल त्याचा नेम आहे ?

**मधुकर**—हो, असें तर खरेंच. चला या भाऊसाहेब ! आणखीहि थोडेसे फिरूं या आपण. घरीं जायची आपणाला कांहीं घाई नाहीं ना ?

**भाऊसाहेब**—छे-घाई कसली आली आहे ? हो पण, तुमची वहिनी अन् या दोघी पोरी इथें कुठें दिसत नाहींत त्या ? कुठें गेल्या या साऱ्या जणी ?

**मधुकर**—एके ठिकाणीं बसून कंटाळल्यामुळें कुठें तरी पलीकडे गेल्या असतील. वहिनी त्यांच्या बरोबर असल्यावर आपणाला कसली भीति नको. चला या भाऊसाहेब !

**भाऊसाहेब**—चला-तुमच्या वहिनी उषेबरोबर बराच वेळपर्यंत बोलत बसल्या होत्या नाहीं ? त्यांच्या युक्तिवादानें झाली असेल ह्मणतां त्या विक्षिप्त पोरीची समजूत ?

**मधुकर**—बऱ्याच दिवसांच्या हट्टी रोगावर केवळ एक वेळच औषध घेऊन का कुठें गुण येत असतो भाऊसाहेब ? तरी पण वहिनींच्या हाताला यश आल्यावांचून कधींहि रहाणार नाहीं, ही मात्र माझी खात्री आहे.

**भाऊसाहेब**—माझी ह्मातार्‍याची तेवढीच इच्छा, दुसरें काय ? पोरीचें वेड जावयाला दिवस कितीहि लागले तरी त्याची मला काळजी नाहीं. नानासाहेबांच्या चिरंजीवांशीं-मनोहरपंतांशीं-माझ्या पोरीचा विवाह व्हावा, ह्मणून तुमच्या वहिनी आणि तुह्मी इतकी खटपट करित आहां, हे तुह्मां उभयतांचे माझ्यावर किती उपकार आहेत ह्मणून सांगूं मधुसूदनराव !

**मधुकर**—( हंसून ) त्यांत उपकार कसचे आले आहेत ह्मणा-परंतु भाऊसाहेब ! माझें नांव मधुसूदन नाहीं—मधुकर !

**भाऊसाहेब**—हो हो-मधुकर-मधुकर ! ह्मातारपणीं कीं नाहीं मधुकरपंत ! कसलें स्मरण ह्मणून चांगलेंसें रहात नाहीं. त्यांतून तुमचीं हीं नवीन धर्तीचीं नांवें आमच्यासारख्या बुद्रुकांच्या नाहीं लक्ष्यांत रहात ! चटकन् आपलें चोवीस नामांपैकीं 'मधुसूदन' हें नांव तोंडावाटे येतें. मधुकर-मधुकर ! आतां अगदीं चांगलें ध्यानांत धरून ठेवलें पाहिजे. बरें तर चला मधुसू-मधुकरपंत !

**मधुकर**—चला. [ जातात.

[ मनोहर प्रवेश करितो. ]

**मनोहर**—( दीर्घ निःश्वास टाकून ) वहिनीनें जें जें मला करावयास सांगितलें, जसजसें बोलावयास सांगितलें तें तें मीं केलें अन् तसतसें बोललों. आजच्या प्रसंगीं वहिनी माझा गुरु आणि मी तिचा आज्ञाधारक शिष्य असें समजूनच मी ती सांगेल तें निमूटपणें करित होतों. वहिनींच्या मनांत काय आहे, अन् तिला यश कसें मिळणार हें तिचें तिलाच ठाऊक ! माझ्या प्रिय उषेचें चमत्कारिक वर्तन पाहून माझें हृदय फाटून जातें-तिच्याबद्दल करुणा उत्पन्न होऊन माझें अन्तःकरण तिळतिळ तुटतें ! शिव शिव ! या हेमन्तपुरांतील साऱ्या स्त्रीवृंदाचा शिरोमणि जी माझी प्रियतमा उषा, तिचेंच मस्तक कां फिरावें ? आज जिकडे तिकडे स्त्रीशिक्षणाचा फैलाव बराच झाला आहे, स्त्रिया सुविद्येनें मंडित असतांहि विनयादि सद्गुणांनीं लवल्या आहेत, मग माझ्याच प्रियतमेचें मस्तक खोट्या कल्पनांनीं कां भडकून जावें ? मस्तक भडकून जाणें हा उच्च स्त्रीशिक्षणाचा परिणाम खास नव्हे. तसें असतें तर प्रत्येक सुशिक्षित स्त्री आज वहकून गेलेली आढळून आली असती ! आपलेंच दुर्दैव ह्मणावें, दुसरें काय ? ( शिलाखंडाकडे पाहून ) जरा येथें बसून विचारांनीं क्षुब्ध झालेल्या मनाला थोडीशी विश्रांति तरी द्यावी. पण छेः ! उषेच्या प्राप्तीशिवाय आतां मनाला विश्रांति मिळण्याची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. ( जरा थांबून ) अहाहा ! माझी उषा याच शिलाखंडावर बसली होती नाहीं ? खरोखर या शिलास्पर्शानें आज माझ्या जन्माचें सार्थक झालें ! या शिलेचें चुंबन घेऊन तिच्या वरील धूलिकण मस्तकीं धारण करावे जसें मला झालें आहे ! श्रीरामाच्या चरणस्पर्शानें जड शिलेंतून ज्याप्रमाणें एक अत्यंत सुंदर स्त्री उत्पन्न झाली, त्याप्रमाणें माझ्या हृदयस्पर्शानें या शिलेंतून उषा सुंदरी निर्माण होईल काय ? कुठलें इतकें माझें पुण्य ! कुठलें इतकें माझें भाग्य ! माझी ही वेड्यासारखी स्थिति पाहून लोक कदाचित् माझी अवहेलना करून मला हंसत असतील; परंतु माझ्या हृदयांत केवढी प्रचंड खळबळ चालली आहे, याची त्या बिचाऱ्यांना कल्पना काय ? माझ्या अंतःकरणाला ज्या यातना होत आहेत त्या केवळ एका सर्वान्तर्यामी परमेश्वराला कळत असतील. आमच्या वहिनीलाहि उच्च शिक्षण मिळालें आहे, शिक्षणांत तिचा दर्जा उषेपेक्षां कोणत्याहि प्रकारानें कमी नाहीं. मग तिच्यांत आणि उषेंत हें

जमीनअस्मानाचें अंतर कां ? अहाहा ! वहिनीप्रमाणें उषेचेंहि मस्तक थंड असतें, तर माझ्या सुखाला पारावार नव्हता. अरेरे ! या अनंत यातना भोगावयालाच का उषेचें मला दर्शन झालें ? त्या मुखचंद्रापासून अमृत प्राप्त होण्याऐवजीं यातनारूपी हालाहल मात्र मला प्राप्त व्हावें काय ? ध्यानीं, मनीं, स्वप्नीं, खातां, बसतां, उठतां कशांतहि मला सुख नाहींसें झालें आहे. देवा ! या यातना आतां मला नाहीं सहन होत ! माझ्या प्रियतमेचा लाभ माझ्या नशिबांतच नसेल काय ? छेः, हा विचारच असह्य आहे ! उषेची प्राप्ति मला झाली नाहीं तर माझें सर्व जीवित मरुभूमीप्रमाणें रूक्ष व असार होऊन जाईल. माझ्या उषेच्या त्या विचित्र कल्पना नाहींशा होऊन तिचें मस्तक कधींच ठिकाणावर येणार नाहीं काय ? वहिनीसारख्या चतुर स्त्रीचेहि सर्व प्रयत्न व्यर्थ होतील ? आज उषेचें दर्शन झालें, तेव्हां तिला हृदयाशीं धरण्याकरतां मी किती उत्सुक झालों होतों ! उषे ! उषे ! केवळ तुझ्यासाठीं प्रेमानें वेडा बनून मी चहूंकडे वणवण फिरत आहें, हें तुला दिसत नाहीं का ग ? जर तुझी प्राप्ति मला झाली नाहीं तर माझ्या हत्येचें पातक तुझ्या भडकलेल्या मस्तकावर पडेल हें खास समज ! अरे, पण ही वहिनी आली.

[ मनोरमा प्रवेश करिते. ]

**मनोरमा**—काय भाऊजी ? काय करतां इथं बसून ? प्रियेविषयीं एखादी सुंदरशी soliloquy चालली आहे वाटतं ?

**मनोहर**—पुरे तुझी थट्टा वहिनी ! बरें, पण उषेची काय खबर ?

**मनोरमा**—ती अगदीं बेसुमार वेडी बनली आहे !

**मनोहर**—पण यश येण्याचा संभव आहे का ?

**मनोरमा**—प्रयत्न करणं आपल्या हातीं आहे.

**मनोहर**—त्या दोघीजणी कुठें बरें गेल्या ?

**मनोरमा**—त्यांनां घेऊन मी त्या मंदिरांत बसल्यें होतें. भाऊसाहेब नुकतेच तिथं गेले आहेत–ह्मणून मी इकडे आल्यें. बरं चला आतां घरीं जाऊंया भाऊजी !

**मनोहर**—काय इतक्यांतच ?

**मनोरमा**—ह्मणजे ? मृच्छकटिकांतल्या त्या शकारासारखा प्रियेची प्राप्ति झाल्याशिवाय आपलाहि इथून उठायचा विचार नाहीं वाटतं ? पण ह्मटलं, नायकाला नायिकेची प्राप्ति नाटकाच्या पहिल्या अंकांत कधींहि होत नसते !

**मनोहर**—तें सारें सूत्रधाराच्या हातीं आहे.

**मनोरमा**—उषेचा इतकीं वर्षं वृद्धिंगत होत आलेला रोग एका क्षणांत नाहींसा होईल, अशी आशा करणाऱ्या तुमचं मस्तकहि तिच्यासारखंच ठिकाणावर नाहीं असं ह्मटलं पाहिजे!

**मनोहर**—तर मग तूंच सांग तुला यश यायला वेळ तरी किती लागेल? काय एक वर्ष कीं पांच वर्षं?—

**मनोरमा**—अगबाई! अवघ्या दोन दिवसांत तुह्मी इतके अधीर झालां भाऊजी?

**मनोहर**—काय? दोन दिवस? माझी रोजनिशी तरी एकदा चाळून पहा, ह्मणजे तुला सर्व कांहीं कळून येईल.

**मनोरमा**—तर मग मला तुमच्या कामाला मुद्दाम उशीर करावा असं वाटूं लागलें आहे—

**मनोहर**—वहिनी! तूं ह्मणते आहेस तरी काय हें?

**मनोरमा**—मी असं ह्मणतें त्याचं कारण इतकंच, कीं, जोंपर्यंत तुमच्या प्रियेची तुह्माला प्राप्ति होणार नाहीं, तोंपर्यंत तुमची रोजनिशी जोरांत चालेल आणि अनेक सुंदर विरहकाव्यं तुमच्या हातून लिहिलीं जातील. त्यामुळं पुष्कळ मासिक पुस्तकांनां भरपूर सामग्री मिळेल अन् मराठी भाषेला मोठा लाभ झाल्यासारखं होईल!

**मनोहर**—( त्रासून ) पुरे वहिनी! तुझी थट्टा देखील मला या वेळीं सहन होईनाशी झाली आहे. तूं गाडींतून आतां एकटीच घरीं जा. माझें डोकें खरोखरच फार दुखूं लागलें आहे. मी कांहीं वेळ इथें बसून तें शांत झालें तर पहातों.

**मनोरमा**—बरोबर! बरोबर! ह्मणजे उषेच्या अंगावरून वहात येणारा वारा लागून मस्तक शांत होईल–अगदीं सकाळपर्यंत तुह्मी इथं बसून रहा भाऊजी! अगबाई! पण हें नव्हतं माझ्या लक्ष्यांत आलं–तुमची उषा याच शिलेवर बसली होती–आतां खासं जुळलं! तुह्मी कशाला उठतां आहां आतां त्या शिलेवरून? पण उठलां ह्मणून कांहीं हरकत नाहीं हो–पाहिजे तर मालकांच्या परवानगीनं ही शिला आपण आपल्या बागेंत घेऊन जा—

**मनोहर**—कर, तुला लागेल ती थट्टा कर वहिनी!

**मनोरमा**—काय थट्टा ? ज्याचं करावं बरं तो ह्मणतो माझंच खरं ! ही सगळी थट्टाच वाटतं ! इतक्यांत इतका कृतघ्नपणा भाऊजी ?

**मनोहर**—नाहीं वहिनी ! क्षमा कर. मजकडून मोठी चूक झाली. बरें वहिनी ! खरें सांग–थोडी तरी आशा वाटते का तुला ?

**मनोरमा**—आज रोगाचा निर्णय झाला आहे. यानंतर हळुहळू औषधाची योजना करायची. परंतु भाऊजी! तुह्मी इतकं मात्र नीट लक्ष्यांत ठेवा, कीं, डाक्टरच्या हातांत एकदां 'केस' दिली, कीं, तो सांगेल तसं अगदीं निमुटपणं वागावं लागतं.

**मनोहर**—जर तुला कांहीं आशा दिसली–जर खरोखरच उषेच्या लाभाची आशा यत्किंचित् तरी आहे, असं मला तूं आश्वासन दिलेंस, तर या जगांत मला असाध्य असें कांहीं नाहीं, ही तुझी खात्री असूंदे.

**मनोरमा**—काय ह्मणतां ? तुह्माला असाध्य कांहीं नाहीं ? मी सांगेन तें करायला अहां तुह्मी कबूल ?

**मनोहर**—कबूल ! कबूल ह्मणून काय विचारतेस ?

**मनोरमा**—तर मग माझ्या छातींत खुपसा पाहूं सुरी !

**मनोहर**—वहिनी ! तुझ्या थट्टेपुढें माझा अगदीं नाइलाज झाला ! कांहीं तरी तूं माझ्या मनाकडे लक्ष्य दे.

**मनोरमा**—थट्टा कसली त्यांत भाऊजी ? तुह्मीच ना ह्मणालां होतांत, कीं, मला कोणतंहि काम असाध्य नाहीं ह्मणून ?

**मनोहर**—तुझ्यापुढें मला कांहीं सुद्धां बोलतां येत नाहीं–येथून मी निघूनच जातों कसा—

[ जातो.

**मनोरमा**—थांबा, भाऊजी ! जरा थांबा, जाऊं नका–छेः गेलेच ते–अगदीं बेहद्द पागल ! तिकडे उषा त्या तऱ्हेची अन् इकडे हे भाऊजी या तऱ्हेचे ! दोघांची खाशी जोडी जमेल ह्मणायचं ! नाहीं बाई माझ्यानं आतां फिरवत—येतील भाऊजी आपोआपच इकडे. तोंपर्यंत थोडा वेळ इथंच बसावं. खरोखरच भारी रम्य आहे ही बाग ! उषेसारखी अगोदरच भ्रान्तिष्ट झालेली मुलगी इथल्या romantic देखाव्यानं अधिकच वेडी बनून गेली, तर त्यांत कांहीं मोठंसं नवल नाहीं ! ( बसते. ) परमेश्वरा ! काय माझी स्थिति ही ! अंतःकरणांत चिंतेचा प्रचंड अग्नि पेटत असतां वरून मला मूर्तिमंत शांति

बनावं लागत आहे! परमेश्वरी सूत्रानं घडून आलेला संयोग दैवाच्या कोपानं बिघडून वियोगाचा प्रचंड आघात व्हायचा मजवर प्रसंग आला असतां, या दोन प्रणयिजनांचा वियोग मोडून त्यांचा संयोग करण्यासाठीं माझी सर्व चिंता विसरून मला सूत्रं चाळवावीं लागत आहेत! शोकानं रडण्याची पाळी आली असतां भाऊजीसाठीं प्रणयाचीं गीतं मला गावीं लागत आहेत! नाहीं, इथं बसून हृदयाचा बांध फोडून आंतल्या यातनांना विचारांच्या प्रवाहानं मोकळं करायलाहि मला वेळ नाहीं. मला लवकर घरीं गेलं पाहिजे. जेऊन बाहेर जायच्या पूर्वी गांठून आज पुनः तिकडे दोन गोष्टी सांगितल्या पाहिजेत. मजवर रागवायला होईल, त्रासायला होईल, परंतु तें सारं मुकाट्यानं सोसून घेतलं पाहिजे. माझ्या कटकटींनं कालपासून तिकडच्या मनांत थोडी तरी चलबिचल झाल्यासारखी दिसत आहे. काल काय झालं असेल तें असो, मनाला थोडीशी तरी लज्जा वाटल्यासारखी वाटत आहे. किल्ल्याला हें खिंडार पडल्यावर त्यावर अधिक जोराचा हल्ला करून तो सर करण्याची आजचीच वेळ आहे. तिकडचं मन खरोखरच भारी सरळ—भोंवतालच्या मंडळीच्या कुसंगतीनं तें सुमार्गापासून ढळलं आहे. तें परत फिरवायचे माझे सर्व प्रयत्न व्यर्थ होतील काय? माझ्या हृदयांत काय व्यथा होत आहेत त्या, हे अंतर्यामी जगदीश्वरा! तुलाच दिसत असतील! कुमार्गापासून तिकडचं मन परत फिरविणं हेंच माझ्या जीवनाचं व्रत! तें तूं सफल कर—सत्यभामेप्रमाणं मीहि तुझी प्रार्थना करत्यें, कीं—

सदया! कान्त मला देईं फिरुनी।
कां क्रूर बळें होसी स्वमनीं?

इंदु–ज्योत्स्ना, घन–चपलादिक युगुलें निर्मुनि सारीं,
युक्त ठेविसी; वियुक्त करिसी आम्हां कां संसारीं?
कान्ताविरहीं पळ न सहे तुज, निकटिं सदा तव तीही,
विरहदानिं इतरां मग न शिवे खेद तव मना कांहीं?

सदया कान्त मला देईं फिरुनी।
कां क्रूर बळें होसी स्वमनीं?

[ जाते.

---

## प्रवेश तिसरा.

[ **स्थलः**—भाऊसाहेबांच्या बंगल्याची गच्ची. बाजूनें रस्ता; गच्चीवर उषा व सुशीला बसल्या आहेत. आकाशांत चंद्रोदय. ]

**सुशीला**—गडे उ! तुझं तें गाणं किती वेळ जरी ऐकलं तरी तें पुनःपुनः ऐकावंसंच वाटतं. परमेश्वरानं तुला अप्सरेसारखा गोड गळा दिला आहे! नाहीं तर आह्मी! ह्मणेनास आणखीं एकदां तुझं तें गाणं. तुझ्या मधुर गळ्यांतून असलीं मधुर romantic गाणीं किती वेळ जरी ऐकिलीं तरी मेली मनाची तृप्ति ह्मणून होतच नाहीं!

**उषा**—तुझं मन मोडायचं नाहीं ह्मणून अन् तें गाणं मलाहि भारी आवडतं ह्मणून पुनः एकदां मी ह्मणल्यें पण एकदाच हो. आज मघांपासून हें गाणं तूं माझ्याकडून कितीदा बरं ह्मणवून घेतलंस?

**सुशीला**—आतां फिरून नाहीं मी तुला आग्रह करीत-आणखी एकदाच.

**उषा**—( गाते. )

"शृंगारा नव करुनि, भूषवुनि तनुसि विविध भूषणीं,
येतसे धरणी-तलिं यामिनी ॥ ध्रु० ॥
चंद्रकला रमणीय वांकडी शिरिं खोंचुनि साजिरी,
मिरवि निजरूपमधुरमाधुरी!
रक्त-नील-रुचि अमूल्य तारा-हीरक-माला गळां!
सेविल्या तिनें किती सोज्ज्वला!
प्रणय-कलह, अनुराग, गुंजनें, अनुनय, मानादिकां-
सर्वे ये घेउनि अभिसारिका!
अनुकरीं वेष तिचा मी भला,
गळां सुमदाम रुचिर घातला!
बकुलावलि करिं घेउनि सजलें मम दयिताराधनीं.
येतसे धरणी-तलिं यामिनी.
कान्तसमागममधुराशेनें हृदय फुल्ल जाहलें.
स्वर्गीच्या सुधारसें तर्पिलें,

हाय ! परी दुर्दैवें अवचित डाव पुरा साधिला,
सजणी ! काय कथूं तो तुला ?
जरी मज हृदय-नाथ भेटला,
ओळखी लव नच परि तो मला !
स्मशान वाटे अवनी ! आतां अर्थ काय जीवनीं ?
येतसे धरणी-तलिं यामिनी."

**सुशीला**—वा ! वा ! फारच गोड ! फारच रम्य ! गाण्याच्या शेवटीं शेवटीं तर मोठी बहार झाली आहे !

**उषा**—म्हणजे कुठं ? '**स्मशान वाटे अवनी !**' इथं ?

**सुशीला**—तो तर climax आहे गाण्याचा ! पण romance ला खरा प्रारंभ होतो आहे, नायिका अभिसारिका होऊन संकेतस्थलीं आपल्या प्रियकराला भेटायला जाते; तो तिथं तिला भेटतो, परंतु दुष्यन्तानं शकुन्तलेला जशी ओळखली नाहीं, तशी तोहि तिला ओळखीत नाहीं इथं ! काय dramatic आहे गाणं !

**उषा**—( सुस्कारा सोडून ) धन्य धन्य अशा dramatic romance गाणाऱ्या नायिका !

**सुशीला**—( हंसून ) म्हणजे तूंच कीं नाहीं ? बरं पण उ ! चल आतां आपण खालीं जाऊंया.

**उषा**—नाहीं, नाहीं ! हा रमणीय स्वर्ग सोडून त्या नरकपुरींत का जायचं ? या सुंदर मोकळ्या आकाशाच्या तारादीप लावलेल्या निळ्या मंडपाखालीं बसून आपल्या हृदयांतील वेदना स्वर-लहरींनीं हवेंत मोकळ्या सोडण्यांत मनाला काय अनुपमेय आनंद अन् समाधान वाटत आहे, तें तुला कसं कळणार ? खरंच सु ! तुझ्यासारखी अरसिक सखी कुठल्याहि नाटकांतल्या नायिकेला मिळाली नसेल ! शकुंतलेच्या सख्या–प्रियंवदा अन् अनसूया पहा ! आपल्या रसिक अन् मधुर भाषणांनीं त्या शकुंतलेच्या विरहयातना नाहींशा करण्याचा प्रयत्न करतात अन् तूं असल्या अरसिकपणानं माझ्या वेदना शतपट वाढवितेस मात्र !

**सुशीला**—नाहीं ग-खरंच नाहीं उ ! तुला सुख व्हावं म्हणून मी मनापासून म्हणत असत्यें हो ! मला का तुझं romance समजत नाहीं म्हणत्येस ?

**उषा**—तर मग अशा या सुंदरकालीं खालीं चल म्हणून अरसिकपणानं कां बरं सांगत्ये आहेस ? गडे सु ! आजहि माझ्या हृदयेश्वराचं दर्शन झालं

नाहीं ! इतक्या हौशीनं अन् मोठ्या आशेनं ही पुष्प-माला मीं गुंफली पण मेल्या दुर्दैवानं माझी हौस पुरी नाहीं झाली ! ( हातांतील माला फिरवित ) गडे सु ! आतां मी हिचं काय बरं करूं ?

**सुशीला**—या पुष्पमालेच्या दुर्दैवानं तिचा हेतु साध्य झाला नाहीं, म्हणून का ती चुरा करून फेंकून द्यायची आहे ? अग, " **नैसर्गिकी सुरभिणः कुसुमस्य सिद्धा मूर्ध्नि स्थितिर्न चरणैरवताडनानि,** " असं भवभूतीनं आपल्या उत्तररामचरित नाटकांत म्हटलं आहे तें का उगीच ? ती माला तशीच राहूं दे–आपल्या बिछान्याच्या बाजूला ती ठेव; म्हणजे तिच्या रम्य मधुर गंधानं तुझं संतप्त हृदय कांहीं तरी शान्त होईल !

**उषा**—( निःश्वास टाकून ) काय ? या फुलांच्या वासानं माझं हृदय शांत होईल म्हणत्येस ? छे छे ! हें धडधडणारं हृदय आतां कधींहि शान्त व्हायचं नाहीं, सु ! **'लाविली थंड उटी वाळयाची'** अशी शकुंतला पद्मपत्रांच्या व मृणालांच्या शीतल शय्येवर पडली असून तिच्या दोन सख्या पद्मपत्रांच्या पंख्यांनीं तिला थंड वारा घालित असतांहि तिचं विरहतप्त हृदय शांत होत नाहीं; शीतल चंदनाच्या लेपानेंहि तिचा दाह कमी होत नाहीं–अन् या फुलांच्या वासानं माझं मात्र विरहतप्त हृदय शान्त व्हावं हा कुठला न्याय ? कां बरं सु ? मी काय त्या कण्वाच्या पोरीपेक्षां कमी दर्जाची नायिका आहें होय ? माझ्या हृदयांतील प्रगाढ प्रणय तिच्या प्रणयापेक्षां कमी आहे वाटतं ? नाहीं–नाहीं. कालिदासाच्या वन्य शकुंतलेला ही नगरवासी शकुंतला कोणत्याहि बाबतींत तिळमात्र हार जाणार नाहीं, समजलीस सु ? त्या शकुन्तलेच्या हृदयांत त्या romantic तपोवनांत प्रेमसंचार झाला, तसा त्या romantic उपवनांत सुंदर पुष्करणीच्या तीरावरील शुभ्र संगमरवरी शिलाखंडावर प्रणय–रागिणीचा झंकार सुरू असतां माझ्याहि हृदयांत प्रेमाचा उदय झाला आहे–मग मी त्या शकुन्तलेला कां म्हणून हार जाईन ? नाहीं सु ! ही माला तूं गडे, माझ्या या व्याकुल केशपाशांतच बांध कशी !

**सुशीला**—ठीक ठीक ! तुझीहि योजना कांहीं वाईट नाहीं. ( उषेच्या केशांत माला बांधते. )

**उषा**—आतां एकवार माझ्या चिरवांछित प्रिय हृदयेश्वराचं ध्यान करत्यें. सौभद्रांत अर्जुनानं सुभद्रेचं अन् शापसंभ्रमांत पुंडरीकानं महाश्वेतेचं मानसिक

ध्यान केल्याचीं जर धडधडीत उदाहरणं आहेत, तर मी तरी आपल्या हृदयेश्वराचं ध्यान कां ह्मणून करूं नये ? ( बराच वेळ डोळे मिटून स्तब्ध बसल्यावर ) झाली माझी मानसपूजा ! अहाहा, माझ्या देवतेची मूर्ति किती सुंदर आहे ? कंठस्वर तरी गोड ? नांव किती मनोहर ! म–म–मनोहर ! ती मनोहर मूर्ति मनांत येतांच माझी कांहीं विलक्षण स्थिति होऊन जाते ! माझ्या सर्व शरीरांत विजेच्या लहरी खेळूं लागतात ! मनोहर–मनोहर ! खरोखरच मनोहर ! आईबापांनीं पुढचं भविष्य ओळखूनच हें नांव ठेवलं कीं काय असं वाटतं !

**सुशीला**—अन् मुख तरी किती कोमल ! खरोखरच कमलाची उपमा शोभण्यासारखें ! दाढीमिशीच्या केशांनीं अजूनहि तें तिळमात्र खडबडीत झालं नाहीं !

**उषा**—स्वारीचं गायन तर गंधर्वतुल्य ! पण आज कुणाचं दर्शनहि झालं नाहीं ! गडे सु ! प्रणयिजनानां अत्यन्त प्रिय असा ह्या वसंतऋतु चालला आहे बरं ! या मधुर वसंतांत सुंदर कौमुदीनं युक्त अशा या रात्रीं त्या गंधर्वकुमाराचं गोड गाणं अन् बांसरी ऐकणं नाहीं ना माझ्या नशिबीं ? गडे ! ह्या रम्य वसन्तकाल त्या गायनावांचून कंठावा तरी कसा ग ?

**सुशीला**—करणार काय उ ? दैवाच्या पुढं का कुणाला जातां येणार आहे ?

**उषा**—माझं एक मेलं असो–पण तुझी काय स्थिति आहे ?

**सुशीला**—तें कांहीं विचारूं नकोस उ ! ( सुस्कारा टाकून ) माझाहि चित्तचकोर मधून मधून अतिशय चंचल होऊन जातो–माझ्या त्या सुधाकराचं दर्शन घेण्यासाठीं मला अत्यंत उत्कंठा लागून रहाते–पण गडे उ !

**उषा**—काय सु ?

**सुशीला**—परंतु माझ्या हृदयनाथाचं निवासस्थान ह्मणजे कांहीं प्रमोद-वन नाहीं–कीं एखादा रमणीय, दृष्टिमनोहर असा लतानिकुंजहि नाहीं ! तें ह्मणजे गांवढळ, अरसिक, काव्यनाटकादिकांचा गंधहि नसणाऱ्या अशा अर्ध्याकच्या लोकांच्या वसतींतलं, भ्रमरांच्या गुंजारवाऐवजीं चिलटांच्या अन् माशांच्या गोंगावण्यानं भरून गेलेलं असं एक लहानसं सामान्य घर आहे ! त्यांत कुठं एखादी सुंदर तसबीर दिसायची नाहीं–गायन नाहीं, फोनोग्राफ नाहीं, हार्मोनियम नाहीं, काव्य नाहीं, lyric नाहीं, मलयवायु नाहीं, पुष्पं नाहींत, नदी-सरोवर-पुष्करणी नाहींत, चंद्राचा रम्य प्रकाश नाहीं—

**उषा**—( मध्येंच ) मग आहे तरी काय बाई ?

**सुशीला**—आहे काय विचारशील तर एक धुरानं काळंकुट्ट झालेलं स्वैंपाकघर अन् हिमालयपर्वताएवढा भांडीं घांसण्याच्या अन् केरपोतेऱ्याच्या कामाचा ढीग !

**उषा**—अगबाई ! ह्मणतेस तरी काय सु ?

**सुशीला**—ह्मणून तर उ ! मनाच्या वेदनांनीं जीव अगदीं नकोसा होऊन जातो ! वेड्या मनाची तर अगदीं हौस, कीं, चंद्रप्रकाशानं रमणीय दिसणाऱ्या रात्रीं खिडकींत तिकडची वाट पहात बसावं—

**उषा**—अन् हातांत असावी दुपारीं गुंफलेली, डोळ्यांतील विरहाश्रूंनीं भिजलेली—

**सुशीला**—सुंदर फुलांची माला ! नेसलेली असावी बसन्ती रंगाची रेशमी, जरीच्या कांठाची सुंदर साडी; मुखकमलाच्या भोंवतीं केशरूप काळे भुंगे उडत असावे; जवळच एका बैठकीवर तीन दौती असलेलं कांचेचं सुंदर कलमदान, रुप्याची लेखणी अन् अर्धवट पुऱ्या झालेल्या प्रेमकाव्याचा किंवा सॉनेटचा कागद, इतकं सामान इकडे तिकडे पडलेलं असावं–इतक्यांत वाट पहातां पहातां आपणाला झोंपेची थोडीशी गुंगी यावी; तों तिकडची स्वारी हळूच जवळ येऊन तिनं प्रेमभरानं चुंबन घेऊन आपणाला जागं करावं अन् नम्र-मधुर मृदु स्वरानं–सु-सु-अशी गोड हांक मारावी; त्यावरोबर प्रेमाच्या दिव्य विद्युल्लहरी माझ्या सर्वांगांतून खेळूं लागाव्या ! अशी या वेड्या मनाची हौस ! परंतु दुर्दैवानं यांपैकीं एक तरी गोष्ट प्रत्ययाला येते का ? चंद्रोदयाची वाट न पहातां भणभणित दिवसासच घरीं यायचं अन् romantic प्रेमालापां-ऐवजीं ‘रुमाल, कोट ठेव;’ ‘भूक लागली,’ ‘फराळाचं कुठं दिसत नाहीं तें ?’ ‘पाय धुवायला पाणी आण बघूं;’ ‘थोडा वारा तरी घाल–दमून आलों आहें,’–‘टॉवेल कुठं आहे,’ अशा तऱ्हेचीं भाषणं सुरू व्हायचीं ! गडे ऊ ? हें चमत्कारिक lyric होईल का ग माझ्या मनाला सहन ?

**उषा**—अहा ! बोलूं नकोस सु ! बोलूं नकोस. ऐकवत दिखील नाहीं ! असा हा निष्ठुर पाषाण तरी कोण बाई ?

**सुशीला**—माझे पति–कॉलेजचे प्रोफेसर ! शेले–टेनिसन्–बायरन्–शेक्सपियर–भवभूति–कालिदास इत्यादि कवींचीं काव्यं पालथीं घालूनसुद्धां जे अजून निवळ गद्यमयच राहिले आहेत ते–इतक्यांतच कुठं संपतं आहे ?—

**उषा**—आणखी काय सु ?

**सुशीला**—उ ! ती गोष्ट मनांत आली, कीं, मनाची कांहीं चमत्कारिक स्थिति होऊन क्षणोक्षणीं मूर्च्छा येते कीं काय असं वाटूं लागतं ! मला ह्मणायला होतं " उठ–बसलीस काय ? स्वैंपाक नाहीं वाटतं करायचा आज ?" मी हताश-भावानं शून्य आकाशाकडे बघत रहाल्यें, गळा दाटून येतो; डोळ्यांतून अश्रूंचा पूर सुटून गालावरून त्यांच्या धारा दरदरा वाहूं लागतात ! तरीहि तिकडच्या निष्ठुर मनाला माझी कांहीं दया येत नाहीं ! मी असं विचारल्यें तुला, कीं, भयंकर ताप देणाऱ्या त्या चुलीजवळ बसून भातभाजी करण्यासाठीं का ईश्वरानं आह्मांला हा कोमल रमणीदेह दिला आहे ? चुलीजवळ फू फू करायला अन् भांडीं घांसायला का आह्मी कॉलेजचं शिक्षण संपादन केलं ? अरेरे !

**उषा**—अरेरे ! काय आमची ही दैना ? पुरे पुरे ! सु—

**सुशीला**—अगबाई–उ-उ-

**उषा**—काय सु ? अशी एकाएकीं घाबरल्यासारखी कां दिसतेस तूं ?

**सुशीला**—एक गोष्ट एकाएकींच आतां माझ्या लक्ष्यांत आली. चल, आपण खालीं जाऊं या—

**उषा**—कां बरं सु ? अशा या विमल चंद्रप्रकाशाच्या गोड वेळीं—

**सुशीला**—छे गडे ! संध्याकाळ झाल्यानंतर गच्चीवर किंवा घराच्याबाहेर बसायला भारी भय वाटतं–परवांच्या रात्रींच नाहीं का त्या पलीकडल्या घरांत तो मुलगा मेला ? याच वेळीं त्या घरांतून शोकाच्या आरोळ्या कशा येत होत्या ? छे; माझ्या तर उरांत भयानं धडकीच भरली ! चल गडे ! खालींच जाऊं या आतां आपण.

**उषा**—अरेरे ! दैवाची काय ही क्रूर करणी ! दीर्घ निःश्वास सोडित कांहीं विरहाचीं गाणीं ह्मणेन, किंवा या विमल चंद्रप्रकाशांत बसून एखादी सुंदरशी soliloquy करीन, अथवा एखादं प्रणयकाव्य किंवा सॉनेट रचीन, तर तेंहि निर्दय विधात्याला सहन झालं नाहीं ! भूतांचा अन् पिशाचांचा उपद्रव हेमन्तपुरासारख्या भरवस्तीच्या शहरांतहि त्यानं ठेवलाच आहे ! शहरांत देखील त्यानं भुताचं भय ठेवावं ? मला धर गडे ! ही भयंकर गोष्ट सांगितल्याशिवाय मला तूं खालीं कां बाई घेऊन गेली नाहींस ?

**सुशीला**—चल-आपण एकमेकांचे हात धरून आपण खालीं जाऊं-मग भुतं काय करतात ?

**उषा**—अगबाई ग ! अशी ही चांदणी रात्र—

**सुशीला**—इतक्या हौशीनं गुंफलेली ही फुलांची माला—

**उषा**—सर्व व्यर्थ ग व्यर्थ ! अरेरे !

**सुशीला**—अरेरे-

[ जातात.

[ खालच्या रस्त्यानें मधुकर व गच्चीकडे पहात पहात मनोहर प्रवेश करितात. ]

**मनोहर**—अरेरे ! उषा गच्चीवरून खालीं उतरली, पण तिनें मला स्वर्गांतून पाताळांत ढकलून दिलें ! उषा व तिची सखी गच्चीवर बसल्या आहेत असें आमच्या गच्चीवरून मला दिसलें. या चंद्रप्रकाशांत त्या मुखचंद्राचें डोळे भरून दर्शन घ्यावें ह्मणून लगबगीनें मी येथें आलों. परंतु काय ? मला येऊन थोडा वेळ होतो न होतो तों उषा खालीं उतरली—ह्मटलें माझ्या जूलिएटचें दर्शन आज मला घंटा दोन घंटे तरी होईल !

**मधुकर**—मनोहर ! या उषेमुळें तूं अगदीं बेहद्द पागल झाल्यासारखा दिसतोस ! तुला वेळ अवेळ, स्थान अस्थान कांहीं देखील समजेनासें झालें आहे. अरे हो-हो-होईल तुझें लग्न ! त्यासाठीं इतकें अधीर व्हायला नको कांहीं !

**मनोहर**—नाहीं मधु ! तुला ठाऊक नाहीं. माझ्या मनाला ज्या कांहीं यातना होत आहेत ह्मणतोस—

**मधुकर**—त्या तुझ्यापेक्षांहि मला चांगल्या ठाऊक आहेत. त्या दिवशीं तुझ्याबरोबर मी त्या नूतन उपाहारगृहांत गेलों होतों, तेव्हांच तुझ्या मनाची स्थिति मला चांगली कळून आली. त्या दिवशीं तूं निव्वळ पाण्यांत पैसे टाकल्यासारखें केलेंस. मागवलेले सर्व उंची उंची पदार्थ तूं बहुतेक जशाचे तसेच घशांत टांकलेस ! त्या दिवशीं आईसक्रीम तर फारच सुंदर झालें होतें. पण प्रेमरसाच्या उच्छ्वासांपुढें त्याचा रस तुझ्या गळ्यानें कसचा उतरणार ?

**मनोहर**—( गच्चीकडे पहात ) छेः ! आतां उषा पुनः गच्चीवर येईल असं वाटत नाहीं. आज तिचें दर्शन मला मुळींच झालें नाहीं. मी आतां इथें यायला अन् ती खालीं उतरायला एकच गांठ पडली आज सकाळपासून—

**मधुकर**—मनोहर! उगीच वेड्यासारखें कांहीं तरी इथें बडबडूं नकोस. रस्त्यांतून येणाऱ्याजाणाऱ्या एखाद्यानें जर तुझें भाषण ऐकलें तर तो काय ह्मणेल सांग पाहूं?

**मनोहर**—मधु! नाहीं तर तूं असें कर—तूं जा आतां आपल्या घरीं—मी आणखी कांहीं वेळ इथेंच येरझारा करित रहातों. तुला काय होतें माझ्या वेडाबद्दल नुसत्या गप्पा मारायला! तिचें दर्शन जर झालें नाहीं तर माझ्या मनाला काय यातना होतात त्या माझ्या मला ठाऊक! आज एकवारहि उषा माझ्या दृष्टीस पडली नाहीं. तीनप्रहरीं मी आमच्या गच्चीवर येऊन बसलों—पण दर्शन घडलें नाहीं. आज सकाळपासूनच ते पंडितंमन्य नाटककर्ते माझ्याकडे धरणें धरून बसले होते. त्यांनीं ह्मणे सुधारकांच्या विरुद्ध एक संगीत नाटक केलें आहे. सकाळीं आठ वाजल्यापासून त्यांनीं आपलें तें वाड वाचायला जी सुरुवात केली, ती जेवणाचा वेळ होईपर्यंत त्यांचें भसाड्या आवाजाचें रडगाणें चालू होतें. माझें लक्ष्य देखील त्याच्याकडे नव्हतें. कुठून एकेक या पीडा येतात कोण जाणे! त्याच्यामुळें आज सकाळीं उषेच्या दर्शनाचें महत्पुण्य माझ्या पदरीं पडलें नाहीं. नाहीं तर नऊ वाजायच्या सुमारास केश वाळविण्यासाठीं उषा रोज आपल्या गच्चीवर येत असते, तेव्हां तिचें दर्शन मला हटकून होतें.

**मधुकर**—तूं हें बोलतो आहेस कुठें मनोहर! आहे तुझ्या लक्ष्यांत? ते पहा तिकडे—ते दोघेजण उभे राहून आमच्याकडे निरखून पहात आहेत. आतां लोकांनां धोंडे मारायचें मात्र तुझ्या वेडांत बाकी राहिलें आहे. तेवढें एकदा सुरू कर ह्मणजे झालें.

**मनोहर**—ठीक आहे. वेळ येईल तेव्हां प्रथम तुझ्यापासूनच सुरुवात करीन ह्मणजे झालें! कारण, मोठा वृद्धाचार्य बनून असा संभावितपणाचा उपदेश मला करण्याबद्दल तुला चांगलें बक्षीस पाहिजेच आहे. पण कायरे मधु! आह्मां उभयतांचें मीलन होईल असें खात्रीनें वाटतें तुला?

**मधुकर**—त्याबद्दल कांहीं मला खात्रीनें नाहीं सांगतां येत; परंतु तूं मात्र पुरा पागल बनलास, एवढें मात्र मी खात्रीनें सांगतों. मनोहर! हें का तुझें प्रेमानें वेडापीर बनण्याचें वय? तें तर कधींच निघून गेलें!

**मनोहर**—( हंसून ) ह्मणजे? मी अगदीं बुड्ढा होऊन गेलों आहे होय? माझीं अशीं चारपांच लग्नें झालीं आहेत, का पोरांच्या थडीच्या थडी मीं रचून ठेवल्या आहेत? असें झालें आहे तरी काय?

**मधुकर**—तसें नव्हे रे! आह्मी हिंदूंनीं–नव्हे, आर्यांनीं–सोळाव्या वर्षी प्रेमानें बेहोष होऊन गेलें पाहिजे! संगीत नाटकें वाचून शृंगाराचे चाळे सुचण्याचे हेच आमचे दिवस! महाभारत रामायणादि महाकाव्यांचीं नुसतीं नांवेंहि आह्मोला ठाऊक नसलीं तरी चालतील, परंतु 'मी हिचा पती या जगीं असें' अशीं पदें या वयांत आह्मांला पाठ असलींच पाहिजेत. प्रेमकाव्यें रचूं लागण्याचें हेंच आमचें वय! शाळाबिळा सोडून घरांतून पळून जायची आमची हीच वेळा. चहूंकडे हें तूं पहात नाहींस? अन् टारग्या कादंबऱ्यांतून किंवा नाटकांतून अशा गोष्टी तूं वाचल्या नाहींस? मग या मानानें प्रेमानें वेडावून जाण्याचें तुझें वय होऊन गेलें नाहीं का? काय तरी चमत्कार! कादंबऱ्या-नाटकांतल्या नायकाप्रमाणें प्रेमांत तर पडायचें, पण त्यांत उल्लेख केलेल्या वयाकडे मात्र दुर्लक्ष्य करायचें! अरे, पण माझें हें सारें बोलणें फोल झालें ह्मणायचें! मनोहर! बारीक नजरेनें तूं वर काय पहातो आहेस?

**मनोहर**—तो पहा त्या खोलींत उजेड दिसतो–उषा पुनः गच्चीवर येईल का?

**मधुकर**—( मनोहराला जोरानें ओढून ) हें पहा मनोहर! मी तुला शपथपूर्वक सांगतों, कीं, तूं जर आपलें हें वेड मुद्दाम आपल्या अंगाभोंवतीं लपेटून घेशील, तर तुह्मां उभयतांच्या संयोगाच्या कामांत मी व्यत्यय आणल्याखेरीज कधींहि रहाणार नाहीं! भाऊसाहेबांचे कान मी असे कांहीं फुंकून टाकीन ह्मणतोस, कीं, कांहीं झालें तरी ते आपली मुलगी तुला देणार नाहींत!

**मनोहर**—नाहीं, नाहीं! तूं सांगशील तसें करतों. मग तर झालें? बरें, तूं काय ह्मणत होतास?

**मधुकर**—माझ्या प्रश्नाला नीट सरळ जबाब दे. इतक्या थोड्या अवकाशांत इतकी development झाली तरी कशी? ताईची प्रकृति फार बिघडली होती ह्मणून मी इतके दिवस पुण्याला गेलों होतों. मी कांहीं तेथें फार दिवस होतों असें नाहीं. परंतु आज इथें येऊन पहातों, तों, प्रकरण या स्थितीला पोंचलेलें! तुझा माझा इतक्या दिवसांचा गाढ स्नेह—परंतु प्रेमानें इतका अगदीं बेहोष होऊन गेलेला मीं तुला कधींहि पाहिला नाहीं! शारदेंतल्या भुजंगनाथ ह्माताऱ्याप्रमाणें तुझा प्रश्नहि उषा अन् उत्तरहि उषाच! तुझ्या आचरणावरून तूं उषेच्या प्रेमानें बेहोष होऊन गेलेला दिसतोस—परंतु बोकेसंन्याशा! हे केश पोमॅटम लावून नीट टापटिपीनें विचरण्यांत तुझी कुठें चूक नाहीं रे ती झाली? ही का तुझी प्रेमविव्हलता? nonsense! बरें तें असो.

राजेबहादुरांच्या नजरबागेंतल्या interview नंतर कोठपर्यंत आलें आहे प्रकरण ?

**मनोहर**—राजेबहादुरांच्या नजरबागेंत आपल्या मधुर गायनानें व मुरलीनें उषेचें मन हरण करून वहिनीनें तिला जवळ जवळ वेड लावलें व विजार, अंगरखा, पटका, चढाव वगैरे पोषाखाच्या जोरावर आपण 'मनोहर'च आहों, असा तिचा समज करून दिला, हें तुला ठाऊक आहेच! आमच्या 'प्लॉट'च्या पायाचे दगड हेच आहेत.

**मधुकर**—येथपर्यंत इत्थंभूत हकीगत मला ठाऊक आहे. त्यानंतर वहिनीची अन् उषेची भेट झाली होती का ?

**मनोहर**—होय, नजरबागेंत ज्या वेषानें वहिनी उषेच्या दृष्टीस पडली, तोच ऑपेराच्या नायकाचा वेष परिधान करून वहिनी दररोज दुपारीं गाडींतून येथें येत असते. या वेळीं भाऊसाहेबांनीं घरीं असूं नये, असें तुझ्यामार्फतच ठरलें आहे, त्याप्रमाणें ते कुठें बाहेर जातात. भोळी बिचारी उषा वहिनीचें रूप, वेष अन् गोड गोड प्रेमालाप यांनीं इतकी उद्भ्रान्त होऊन गेली आहे, कीं, ती वहिनीच्या कपटजालांत अधिकाधिक सांपडत चालली आहे. वहिनीच मनोहर आहे अशी तिच्या मनाची पूर्ण समजूत झाली आहे.

**मधुकर**—(हंसून) वा वा! ठीक चाललें आहे. परंतु खऱ्या unmasked मनोहराचें पात्र या नाटकांत रंगभूमीवर कधीं येणार ?

**मनोहर**—या नाटकाचा सूत्रधार आहे वहिनी! कोठल्या पात्रानें काय करावें, कसें बोलावे, रंगभूमीवर कधीं प्रवेश करावा, वगैरे सर्व गोष्टी ती ठरवील तशाच झाल्या पाहिजेत. यासंबंधानें मीं वहिनीला प्रश्न केला तेव्हां ती ह्मणाली "एके दिवशीं चांगलीशी संधि पाहून उषेला पुनः नजरबागेंत घेऊन जाऊन तेथें dramatic तऱ्हेनें नाटकाचा शेवटचा प्रवेश रंगभूमीवर आणूं. उषेचा सारा भ्रम दूर व्हायला आतां वेळ नाहीं."

**मधुकर**—पण या साऱ्या गोष्टी भाऊसाहेबांनां कळल्या आहेत का ?

**मनोहर**—विजार, चढाव, पटका, अंगरखा-तसेंच मनोहराचा mask, वगैरे गोष्टी त्यांनां कांहींसुद्धां ठाऊक नाहींत. आमच्या वहिनी रोज आपल्या घरीं उषेचा भ्रम दूर करण्यासाठीं येत असतात, एवढेंच काय तें त्यांनां माहीतं आहे.

**मधुकर**—अस्सें अस्सें ! बरीच मजल मारली आहे तर वहिनींनीं ! सर्व प्रकार अगदीं एखाद्या Novel प्रमाणें चालला आहे बुवा ! वहिनींचा सर्व घाट जर अगदीं पक्का होत आला आहे, तर मग तुला अगदीं इतकें अधीर व्हायचें कारण काय ?

**मनोहर**—अमृताचा पेला अगदीं ओंठाशीं आला आहे, ह्मणून तर त्यांतलें अमृत पोटांत जाण्याबद्दल मी इतका आतुर होऊन गेलों आहें ! There's many a slip between the cup and the lip !

**मधुकर**—तें तर खरेंच आहे ह्मणा ! हा एकंदर प्रकार मला तर फारच अद्भुत आणि रम्य वाटतो बुवा ! वहिनीच्या हाताला यश येऊन तुझें एकदा शुभमंगल होऊं दे मात्र, कीं, हें सर्व संविधानक गोंऊन मी एक गोष्ट लिहून ती एखाद्या मासिकपुस्तकाकडे पाठवून देतों. गोष्टींतल्या romance नें एडिटर-साहेब अगदीं खुष होऊन जातील, अशी माझी बालंबाल खात्री आहे. माझी ही गोष्ट refuse करायला त्यांना छातीच नाहीं व्हायची !

**मनोहर**—ही idea मला strike झाली नाहीं असें का वाटतें तुला ? हा प्लॉट घेऊन मी एक सुंदर opera लिहिण्याचा निश्चय केला आहे.

**मधुकर**—तरी कांहीं हरकत नाहीं. मी आपली गोष्ट तशीच गुलदस्तांत ठेवतों. कारण, माझ्यापेक्षां या कामाला तूंच अधिक लायक आहेस. अन् या नाटकांतला नायक-निदान उपनायक-तरी तूं असल्यामुळें तुझ्या हातून तें काम फारच उत्तम वठेल यांत शंका नाहीं. परंतु खरी गोष्ट अशी आहे, कीं, या प्रकारचा कार्यक्षम-कार्यसाधु-watchful, प्रणयी नायक नाटकांत कोठेंहि आढळून येत नाहीं. नाटककादंबऱ्यांतला प्रेमी नायक आणि जगांतला खरोखरचा प्रणयी पुरुष यांत खरोखर फारच मोठा भेद आढळून येतो. नाटकांतला नायक फुकटचे दीर्घ निश्वास सोडतो, "**काननीं वनिं संचरूं? का जलीं तटिनी-तलीं मरूं ? मस्तकामधिं या चिरूं ?**" असें कांहीं तरी बहकत आत्महत्या करूं पहातो; practical दिशेकडे त्याचें शून्य मस्तक कधींहि झुकत नाहीं ! जणुं काय त्याच्या मस्तकांत मेंदूऐवजीं कवि शेण किंवा खड्डूच भरीत असतो ! इकडे खरोखरचा प्रणयी पुरुष पुऱ्या ऐषारामांत असतो, काव्यें करतो, व्याख्यानें झोडतो, खातो, पितो, मजा करतो; ( हंसून ) पोमेंटम माखून नीटनेटके केंस विंचरतो, अन् आयत्या वेळीं वधू उपटून पुढें आपल्याच प्लॉटवर नाटकें लिहितो !

[ दोन गृहस्थ वाटेनें येतात. ]

**पहिला गृहस्थ**—दैवाचा किती विचित्र प्रभाव पहा—बापाचा नांवलौकिक काय आणि त्याच्या मुलाची ही दशा काय ?

**दुसरा गृहस्थ**—छे छे ! अगदीं वाईट ! बडे लोक झाले ह्मणून त्यांनीं अगदींच लाज सोडावी ? आपलें कुल अन् लौकिक यांवर तिलांजलि द्यावी ?

[ आणखी एक गृहस्थ प्रवेश करितो. ]

**तिसरा गृहस्थ**—कोण हो तो ? कुणाची गोष्ट तुह्मी बोलत आहां ?

**पहिला गृहस्थ**—तो माधव राजहंस.

**तिसरा गृहस्थ**—कोण माधव राजहंस ? अन् त्याचें काय झालें ?

**पहिला गृहस्थ**—पलीकडल्या मंगळपुऱ्यांतले सावकार—मोठे घरवाले—आहेत कीं नाहीं ठाऊक ? नानासाहेबांचे थोरले चिरंजीव—

**मधुकर**—अरे, हा तर तुझ्या दादाबद्दल बोलतो आहे मनोहर !

**मनोहर**—ऐक—ऐक—दादांबद्दल हा काय बोलतो तें ऐकूंया.

**तिसरा गृहस्थ**—त्या माधवाचें काय झालें ह्मणतां ?

**पहिला गृहस्थ**—व्हायचें काय ? जसें कर्म तसें फळ !

**तिसरा गृहस्थ**—ह्मणजे ? यांत समजणारानें काय समजायचें बुवा ?

**दुसरा गृहस्थ**—तें मी सांगतों तुह्माला. त्या सुंदरलाल भाव्याच्या बागेंत एका वेश्येच्या संबंधानें माधव राजहंसाची अन् त्या प्रसिद्ध केसरीनाथाची जंगी मारामारी नुकतीच झाली ह्मणे. तो केसरीनाथ ह्मणजे कसला पहिल्या प्रतीचा गुंड ! या हेमन्तपुरांत त्याच्यासारखा डांबीस मनुष्य सगळ्या गुंडांतहि नाहीं सांपडायचा ! त्याचा धंदाच हा ! श्रीमंत तरुण मनुष्यांनां गांठून त्यांनां वेश्यांच्या वगैरे नादीं लावायचे अन् नानातऱ्हेच्या व्यसनांत गुंतवून त्यांनां लुबाडायचें ! माधवाच्या प्रियपात्रावर त्या श्रीमंत सुलेमान मियाचें कोठें लक्ष्य गेलें. त्यानें या केसरीनाथाकडून माधवाला चोप दिला ह्मणे. त्याच्या सैसाला अन् कोचमनाला जखमा देखील झाल्या आहेत. मोठी भयंकरच मारामारी झाली. खुद्द माधवालाहि थोडेंबहुत बक्षीस मिळालें आहे ह्मणे. त्या बागेच्या कोंपऱ्यावरच्या रस्त्यावर एका दिव्याच्या खांबाशीं टेंकून धांपा टाकीत माधवाची स्वारी उभी असलेली नुकतीच आह्मीं पाहिली. स्वारीचा सर्व ऐटदार जामानिमा पार फाटून चिंध्या झाल्या होत्या. डोकीला

कांहीं देखील नव्हतें. एका पायांत मात्र चढाव दिसत होता. काय बिचाऱ्याची स्थिति! अरेरे!

**मनोहर**—(उत्कंठेनें) माधव राजहंस तेथें उभा आहे, ह्मणालांत आपण?

**मधुकर**—त्यांनां कोणीं मारलें?

**दुसरा गृहस्थ**—केसरीनाथ गुंड अन् सुलेमान मियां यांच्या लोकांनीं!

**मधुकर**—खुद्द माधवरावांवर देखील त्यांनीं हात चालविला ह्मणतां?

**दुसरा गृहस्थ**—कां नाहीं चालविणार? माधवराव मोठे सावकार असले, ह्मणून ते गुंड का त्याची पर्वा करतात? त्यांतून माधवरावांच्या प्रिय पात्राचीच त्या केसरीनाथाला फूस होती ह्मणे. त्यांची ही वसन्तसेना माधवराव अन् तो सुलेमान मिया या दोन डगरींवर हात ठेवायला पहात होती. आज बरेच दिवस त्यांचा हा गोंधळ एकमेकांना नकळत चालू होता असें ऐकतों. सुंदरदासाच्या बागेंत आज संध्याकाळीं एक grand party होती. त्यांत माधवरावांच्या प्रिय पात्राचें–राधाजींचें गाणें चाललें असतां सुलेमानसाहेबांनीं तिची कांहीं चेष्टा केली, तों जमदग्नीचा अवतार घेऊन माधवरावांनीं घोड्याच्या चाबकानें त्याच्यावर पहिल्यानें हात केला. मग काय विचारतां? अगोदर ठरल्याप्रमाणें केसरीनाथाची तयारी होतीच. झाली जंगी मारामारी!

**तिसरा गृहस्थ**—एकूण सुंदरदासाच्या बागेंतल्या पार्टींत अशा तऱ्हेनें रंगाचा भंग झाला ह्मणतां? केसरीनाथ ह्मणजे डांबीस गुंड! त्यानें माधवाला खूब बक्षीस दिलें असेल?

**मनोहर**—माधवरावांनां आपण कुठें पाहिलें?

**दुसरा गृहस्थ**—सुंदरदासाच्या बागेच्या जरा पुढें रस्त्यावर त्यांनां उभे असलेले आह्मीं पाहिले बुवा आतांच.

**मधुकर**—मनोहर! चल, धांव धांव—

**मनोहर**—चल–हें काय नवेंच संकट?—

[ दोघे वेगानें जातात.

**पहिला गृहस्थ**—हे दोघे कोणी त्या माधवाचे मित्र दिसतात.

**दुसरा गृहस्थ**—होय–असें दिसतें खरें.

**तिसरा गृहस्थ**—हे पाहिलेत आमचे मोठे लोक–आमचे पुढारी? एका क्षुद्र वेश्येसाठीं भर शहरांत मारामारी करतात. या बडे लोकांचे डोळे असें कांहीं झालें तरच कदाचित् उघडण्याचा संभव! [ जातात.

**[ पडदा पडतो. ]**

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

[ **स्थल**—माधवाच्या वाड्यांतील एक दिवाणखाना. मधील राउंड टेबलाजवळील एका खुर्चीवर बसून मनोरमा पोथी वाचित आहे, असा प्रवेश. ]

**मनोरमा**—छेः बाई! आज पोथीकडेहि नाहीं लक्ष्य लागत. नाहीं तर या महासती सावित्रीच्या कथेपुढें नेहमीं तहानभूकहि विसरायला होते! माते सावित्री! या दीन कन्यकेला क्षमा कर. स्वतः यमराजाशीं झगडून आपल्या प्रियपतीला तूं त्याच्यापासून परत मिळविलंस! केवढं तुझं पतिप्रेम! केवढं तुझं पातिव्रत्य! माते! माझेहि प्राणनाथ मला परत मिळोत, असा तुझा मला आशीर्वाद असूंदे. ( पोथी बांधून ठेवून ) आज सकाळपासून माझ्या मनाला कसली तरी रुखरुख लागून राहिली आहे. कांहीं सुचत नाहीं—कशावरहि मन लागत नाहीं. आज नेहमींप्रमाणं उषेच्या घरींहि मला जातां आलं नाहीं. ( घड्याळाकडे पाहून ) काय? नऊ वाजून गेले? भारी रात्र झाली. अजून दोघांपैकीं कुणीहि कसं आलं नाहीं? निदान भाऊजी तरी केव्हांच यायचे—त्यांनां फिरून यायला इतका उशीर कधींहि लागत नाहीं. काय घोंटाळा आहे कांहीं कळत नाहीं. ही आणखी एक नवीन काळजी! आज सकाळीं सांगून जायचं झालं, कीं, दोनप्रहरीं त्या वकीलसाहेबांकडे पार्टी आहे—संध्याकाळीं मी यायचा नाहीं. पार्टी वकीलसाहेबांकडे आहे का दुसरीकडे कुठं आहे, हें का मला समजलं नाहीं? मांजर डोळे मिटून दूध पितं—त्याला वाटतं, कीं, आपल्याप्रमाणं जगाचेहि डोळे मिटलेच आहेत! करायचं काय? होईल तो अपमान, येईल तें दुःख मुकाट्यानं सहन करून प्राणनाथांनां कुमार्गापासून परत वळवायचा प्रयत्न करणं हें आपलं कर्तव्य आहे, तें कांहीं झालं तरी केलंच पाहिजे. तिकडचं हितलव साधण्यांत माझे प्राण जरी खर्च झाले तरी त्यांत मला अतिशय सुख आहे. देवा! नाहीं कारे तुला या अभागिनीची करुणा येत? ( जरा वेळ थांबून ) खरं ह्मटलं, तर पार्टी होऊन घरीं परत फिरायची वेळ केव्हांच होऊन गेली—अजून कां नाहीं येणं होत? भाऊजींचाहि अजून कुठं पत्ता नाहीं. मेल्या मनांत नाहीं नाहीं त्या कल्पना येतात. कांहीं सुचत नाहीं. सारखी हुरहूर लागून राहिली आहे. आई कुलस्वामिनी! तिकडची स्वारी घरीं सुखरूप आलेली माझ्या डोळ्यांनां दिसूंदे—

तुझ्या नांवानं अनाथ बालिकाश्रमांत मी सतत पांच अनाथ मुलींचा खर्च सोशीन. अगबाई! माझा डावा डोळा किंचित् स्फुरल्यासारखा कां वाटतो बरं? मनाला तर इकडे विलक्षण हुरहूर लागली आहे, अन् इकडे हा असा शकुन—छेः कांहीं तरी उगीच मनाला भास झाला असेल–पण जाऊंद्या–उगीच चिंता कशाला करूं? मी कधीं स्वप्नांतहि कुणाचं वाईट चिंतिलं नाहीं, मग तो दीनदयाघन जगदीश्वर माझा उगीच कां छळ करील? सीता, दमयंती इत्यादि स्त्रियांवर माझ्यापेक्षां हजारों पटीनं भयंकर संकटं आलीं असतांहि त्यांतून त्यानंच त्यांची सुटका केली? त्यांच्यापुढं मी कोणत्या झाडाचा पाला?

" व्हा सदय, नाथ! कां कोप हा! मजवरी?
नच करा दूरि चरणानुरत किंकरी ॥ ध्रु० ॥
भवदीय पदकमल, त्रिभुवनीं मज सकल!
तद्विरहि एक पल, मरणसम विकल करि?
अर्पुनी तनुसुमन, तरुसि जी सेवि वन,
ती लता त्यजि कठिन—विटप, मृति तिजसि तरि! २
व्हा सदय नाथ! कां कोप हा! मजवरी?
नच करा दूरि चरणानुरत किंकरी!

नाहीं, आज नेहमींचं माझं हें आवडतं गाणं दिखील बरं लागत नाहीं. काय करूं? काय करूं? ( दचकून ) अगबाई! पण हें काय?

[ पडद्यांतून 'सोडा, सोडा मला. त्या दोघांच्या नरडीचा घोंट मी घेईन तरच नांवाचा माधव!" असा शब्द ऐकू येतो. ]

**मनोरमा**—अगबाई! स्वारी आली वाटतं? पण हें काय?

[ अंगावरील झोंकदार पोषाक छिन्नविछिन्न झालेल्या, क्रोधानें बेफाम होऊन गेलेल्या माधवाला धरून मनोहर व पद्मा प्रवेश करतात. ]

**मनोरमा**—( कांपत कांपत ) भाऊजी! आहे काय सारा हा प्रकार?

**माधव**—( ओरडून ) पद्मा, मनु, सोडा–सोडा मला. सोडतां कीं नाहीं? माझा revolver! revolver कुठें आहे? आणून द्या माझा revolver! निमकहराम, पाजी केसऱ्या—

**मनोरमा**—काय आहे हें भाऊजी?

**मनोहर**—कांहीं काळजी करण्यासारखें नाहीं यांत वहिनी! भिऊं नको

मुळींच. दादांची अन् दोघां बदमाषांची एके ठिकाणीं थोडीशी मारामारी झाली, इतकेंच—

**माधव**—या माधवावर–नानासाहेबांच्या या माधवावर—एकदम वेलाशक हात चालवितात काय ते? मनु–पद्या! सोडतां कीं नाहीं मला? अपमानाचा मी सूड उगवीन तेव्हांच राहीन! माझें तें सहाबारी पिस्तुल आणून दे पद्या—तो केसऱ्या अन् तो सुल्या! दोघांचींहि डोकीं धडाधड देतों उडवून! पाजी, बदमाष–हराम—

**मनोहर**—दादा! दादा! जरा शांत व्हा.

**माधव**—काय? मी शांत होऊं? त्या दोघांच्या नरडीचा घोंट घेतल्याशिवाय?

**मनोहर**—वहिनी! चल आपण यांना आंत घेऊन जाऊं या.

**माधव**—मी अगोदर कुठेंहि नाहीं येणार! माझा अगोदर revolver द्या–revolver! त्या दोघां हरामखोरांचा अगोदर मेंदू उडवून येतों—

**मनोहर**—वहिनी, तिकडे कांहीं लक्ष्य देऊं नकोस–चल आंत—

**मनोरमा**—( माधवाचा हात धरून ) असं काय बरं हें करायचं? जरा आंत येऊन झोंप घ्यावी म्हणजे बरं वाटेल आपणाला. तोंपर्यंत आपलं पिस्तुल मी तयार करून ठेवलें.

**माधव**—( मनोरमेच्या तोंडाकडे टक लावून पहातो व अश्रु ढाळतो. )

**मनोहर**—दादा! वहिनी म्हणते तेंच ठीक आहे. जरा झोंप घ्या. ( पड्याकडे पाहून ) आलास मधु? जरा थांब, मी हा आलोंच.

**माधव**—नाहीं सोडीत तुम्ही मला? नाहीं सोडीत? मनु-मनु–हें ठीक नाहीं बरें! अरेरे! काय माझी ही दशा!

[ माधवाला धरून मनोरमा व मनोहर जातात.

[ मधुकर प्रवेश करतो. ]

**पद्या**—आलांत अण्णासाहेब?

**मधुकर**—बोलण्यांत वेळ घालवूं नकोस पद्या. झटकन् गाडी जोडायला सांग पाहूं त्या दुसऱ्या कोचमनला—

**पद्या**—हा निघालों–पण यांत कांहीं भीति तर नाहींना अण्णासाहेब?

**मधुकर**—वेड्या–यांत कसली घेऊन बसला आहेस भीति? दादासाहेब थोडेसे अधिक रागावले आहेत, यापेक्षां कांहीं देखील नाहीं. पण उगीच

वेळ दवडूं नको बोलण्यांत. गाडी जोडायला सांग झटकन्-अन् इकडे पद्या—उगीच वहिनींनां घाबरवूं नकोस कांहीं तरी विचारून-समजलास ?

**पद्या**--नाहीं—मी का तसा वेडा आहें अण्णासाहेब ?

**मधुकर**—हं, जा तर लवकर—

[ पद्या जातो.

**मधुकर**—( सुस्कारा टाकून ) नशीब ! नशीब ह्मणायचें, दुसरें काय ? नाहीं तर आमच्या दादासाहेबांनां अशी शोचनीय स्थिति प्राप्त व्हावी काय ? कोठें नानासाहेबांचा लौकिक अन् कोठें दादासाहेबांनीं पाघळलेली आजची ही कीर्ति ! परंतु नानासाहेबांशीं त्यांची तुलना कशाला पाहिजे ? थोड्या दिवसांपूर्वींच्या दादासाहेबांशीं तरी हल्लींच्या दादासाहेबांची तुलना होणें शक्य आहे काय ? आजच्या या प्रकारानें तरी दादासाहेबांचे डोळे उघडतील काय ? वहिनींच्या आजपर्यंतच्या कानउघाडणीनें आणि आजच्या या विलक्षण अपमानाच्या प्रसंगानें त्यांच्या मनावर कांहींच इष्ट परिणाम होणार नाहीं ? पहावें वहिनींच्या अदृष्टांत काय असेल तें ! कुसंगतीचा दारुण परिणाम अन् बाजारच्या प्रेमाची खरी किंमत हीं दादासाहेबांच्या केव्हांच लक्ष्यांत यावयास पाहिजे होतीं ! पण येणार कशीं ? भ्रान्तीनें त्यांचे डोळे अंध होऊन गेले होते ! पापाचरणांत सुखाचा आभास दिसत असला, तरी त्यांत खऱ्या सुखाचा लेश नाहीं—तो आभासच ! पापांत शांतिसुख मिळेल तर पोळलेल्या अंगाचा दाह अग्नीच्या प्रलेपानेंहि शांत होईल ! पापमार्गांत कधीं शांति नाहीं ! सौख्याचें नांव नाहीं त्या मार्गांत हृदयाला भयंकर तळमळ आणि मनाला लज्जा हीं मात्र प्राप्त होतात ! यांशिवाय सर्व जगाचा उपहास तिरस्कार यांचा लाभ होतो तो निराळाच ! अरे पण हा मनोहर आला—

[ मनोहर प्रवेश करतो. ]

**मधुकर**—काय बुवा ? तिकडची काय हकीगत ?

**मनोहर**—हकीगत बरीच समाधानकारक आहे. वहिनीचा हस्तस्पर्श झाल्याबरोबर पाण्याच्या स्पर्शानें आगीचा भडका शांत होतो, त्याप्रमाणें दादांचा आवेश, क्रोध, संताप सारीं शांत झालीं ! तिनें हातीं धरून नेतांच एखाद्या गरीब कोंकराप्रमाणें दादा तिच्या मागोमाग गेले. वहिनीनें दिलेलें थोडेंसें दूध पिऊन ते आतां स्वस्थ पडले आहेत. वहिनी जवळ उभी राहून त्यांनां

वारा घालीत आहे. काका मावशी वगैरे मंडळी तिकडे गेली आहे. इतक्यांत मीहि चटकन् डाक्टरला घेऊन येतों.

**मधुकर**—ही गोष्ट माझ्या केव्हांच लक्ष्यांत आली होती अन् ह्मणूनच मी गाडी जोडून तयार ठेवायला सांगितलें आहे. डॉक्टरकडे मी जातों. या वेळीं तूं घरीं असशील तर बरा. अरे, त्यांचा काय नेम ? पुनः बेफामपणाची लहर येऊन revolver, revolver ह्मणून ओरडूं लागले तर काय करतोस ?

**मनोहर**—नाहीं–त्याबद्दल आतां कांहीं भय नाहीं. वहिनीचा हात धरून दादा सारखे अश्रुवर्षाव करीत आहेत.

**मधुकर**—तर मग हें लक्षण चांगल्याचें आहे. दादांच्या या अश्रूंनीं त्यांचा चारित्र्यदोष धुऊन निघेल असें मानायला पुष्कळ जागा आहे.

**मनोहर**—आपण अगदीं ऐन वेळीं तेथें पोंचलों ह्मणून बरें झालें—नाहीं तर प्रकरण आणखी कोठपर्यंत गेलें असतें कोण जाणे ! त्या सज्जन पोलिस कॉन्स्टेबलच्या मदतीनें लवकरच जिकडे तिकडे स्थिरस्थावर झालें. नाहीं तर ते साक्षीन् पुरावे—

**मधुकर**— तें कांहीं विचारूं नकोस ! आतां तरी दादासाहेबांचें वर्तन या गोष्टीमुळें सुधारो अन् पुनः असे कधीं प्रसंग त्यांच्यावर आणि आमच्यावर न येवोत ह्मणजे झालें.

**मनोहर**—वहिनीच्या अदृष्टांत काय असेल तें खरें !

**मधुकर**—त्या साध्वीच्या अदृष्टाचीच आतां आशा !

[ पद्या येतो. ]

**पद्या**—हुकुमाप्रमाणें गाडी जोडून तयार आहे. पोलिसजमादार खालीं बसले आहेत—त्यांनीं आपणाला भेटून जायला सांगितलें आहे.

**मधुकर**—या जमादारांचीहि आपणाला फार मदत झाली. नाहीं तर आपणाला फार त्रास झाला असता. या जमादारसाहेबांचें मत हें प्रकरण आह्मीं पोलिसांत द्यावें असें आहे. साक्षीपुरावा वगैरे बाबतींत त्यांची आह्मांला फार मदत होईल हें खरें; परंतु त्या बदमाष मंडळीवर काम चालवून त्यांच्याबरोबर आपलेहि धिंडवडे काढण्यांत काय अर्थ आहे ? या बाबतींत दादासाहेबांनां आतां मुळीं कांहीं विचारूंच नये.

**मनोहर**—होय, माझेंहि मत असेंच आहे.

**मधुकर**—बरें तर, खालीं जाऊन जमादारांची मी समजूत घालतों आणि तसाच डाक्टरकडेहि जातों. दादासाहेबांनां डोकीवर दोनचार ठिकाणीं बरेंच लागलें आहे. एके ठिकाणीं तर मोठीच खोंक पडली आहे—यामुळें तापवीप सपाटून आल्याशिवाय राहणार नाहीं. त्याच्या अगोदर डॉक्टरला आणावा तें बरें. आतां दादासाहेब चांगले शुद्धीवर आहेत ना ?

**मनोहर**—चांगले शुद्धीवर आहेत. अरेरे ! यापूर्वींच जर ते शुद्धीवर आले असते !

**मधुकर**—गतं न शोचयेत् !

[ सर्व जातात.

---

## प्रवेश दुसरा.

[ **स्थल**—मनोरमेचें शय्यागृह. एका कोचावर माधव बसला असून शेजारीं मनोरमा उभी आहे, असा प्रवेश. ]

**माधव**—[ मनोरमेचा हात धरून तिजकडे प्रेमपूर्ण दृष्टीनें पहात ] मनोरमे—मनोरमे ! सांग—केलीस ना तूं या अधमाला पूर्ण क्षमा ?

**मनोरमा**—[ स्वगत ] देवा ! नारायणा ! हें सारं स्वप्न तर नव्हे ना ? हें स्वप्न असेल, तर या स्वप्नांतच मला मरण येऊंदे—दयाघना ! शेवटीं या दीन कन्येच्या आक्रोशानं तुझ्या हृदयाला पाझर फुटला ! काय सुखाचा हा प्रसंग ! किती मी भाग्याची !

**माधव**—मनोरमे ! अशी स्तब्ध कां बरें रहातेस ? मीं अधमानें तुझे सहस्रशः अक्षम्य अपराध केले आहेत. तुझी क्षमा मी आतां कोणत्या तोंडानें मागूं ? परंतु या वेळीं माझें हृदय विदारण करून जर तें तुला मला दाखवितां आलें असतें, तर प्रखर अनुतापाग्नीनें तें धडधड जळत आहे, असें तुला दिसून आलें असतें ! मनोरमे ! या जगतांत जें जें ह्मणून अत्यंत पवित्र व पूज्य आहे, त्याची शपथ घेऊन मी तुला सांगतों, कीं, माझ्या हृदयाला पूर्व दुष्कृतींनीं जडलेला सर्व मल या अनुतापानें पार जळून जाऊन तें आतां पूर्ण शुष्क आणि प्रेममय बनलें आहे—मनोरमे ! माझी तुला नाहीं ना करुणा येत ?

**मनोरमा**—( गद्गद कंठानें ) असं हें काय बरं भलतंच ह्मणायचं ?—

**माधव**—छे छे–तें कांहीं चालायचें नाहीं, समजलीस मनोरमे ? दुसरीच

कांहीं तरी गोष्ट काढून मूळची गोष्टच उडवून द्यायची तुझी ही युक्ति माझ्या ध्यानांत आली नाहीं, असें वाटतें होय तुला ? मला अगदीं साध्या, सरळ, स्पष्ट शब्दांनीं सांग—माझ्या सर्व अपराधांची तूं पूर्ण क्षमा केलीसना ?

**मनोरमा**—असं कांहीं तरी भलतंच बोलून मला लाजवूं नये गडे ! आपण क्षमा तरी कसली मागायची अन् मीं आपणाला क्षमा तरी कशाबद्दल करायची, तेंच मला कळत नाहीं ! मनुष्याच्या हातून त्याला नकळत, किंवा इतरांच्या दुष्ट संगतीमुळं एखाददुसरी चूक होतेच आहे ! त्याचं एवढं तें काय मेलं मनाला लावून घ्यायचं ? दयाघन प्रभूच्या कृपेनं, कांहीं विशेष भयंकर परिणाम न होतां आपली चूक आपणाला लवकरच कळून आली, आपल्या उच्च कुलाचा नष्ट होऊं पहाणारा अभिमान अन् मामंजींचा लुप्तप्राय नांवलौकिक आपण नाहींसा होऊं दिला नाहीं, वेळींच—मी ह्मणत्यें, अगदीं ऐन प्रसंगीं सावध होऊन, विलक्षण मनोधैर्यानें अभेद्य शृंखला खाडकन् तोडून आपलं अन् आपल्या मनुष्यांचं भयंकर अधःपातापासून रक्षण केलं, याला कारण त्या दयासागर जगदीश्वराची कृपाच होय, असंच मी समजत्यें. त्याच्या या दयामृतानं माझी सारी व्यथा, चिंता, दुःखं, एका क्षणांत पार नाहींशीं झालीं !

**माधव**—( हंसून ) छेः ! मनोरमे ! तुझे हे सारे प्रयत्न व्यर्थ आहेत ! अशा या तुझ्या मधुर मोहक भाषणानें अन्य प्रसंगीं माझ्या मनाला भुरळ पडली असती—परंतु आज एका विशेष गोष्टीकडे मीं माझें सारें धोरण रोंखून ठेवलें असल्यामुळें तुझ्या भाषणाकडे माझें लक्ष्य बहुतेक नव्हतेंच ह्मणेनास ! अशानें कांहीं तुझी सुटका व्हायची नाहीं, हें मी साफ सांगतों. तूं काय वाटेल तें बोल, 'आपणाला मीं पूर्ण क्षमा केली' असे शब्द जोंपर्यंत तुझ्या तोंडांतून येणार नाहींत, तोंपर्यंत माझ्या हृदयाला कांहीं शांति मिळायची नाहीं हें खास समज !

**मनोरमा**—( हंसत ) अगबाई ! खरं कीं काय ? असल्या क्षुद्र उपायावर आपल्या मनाची शांति अवलंबून ठेवायची वाटतं ?

**माधव**—होय—मनोरमे ! सामान्य-नव्हे—अत्यंत क्षुद्र मनुष्य मी ! माझ्या क्षुद्र मनाची शांति असल्या क्षुद्र उपायावरच अवलंबून असणार ! परंतु त्या शांतीपासून तूं मला वंचित करूं नकोस अशी माझी तुला विनंति आहे.

**मनोरमा**—बरं तर—

**माधव**—नाहीं—नुसतें 'बरें तर' असें ह्मणून चालायचं नाहीं. 'आपल्या साऱ्या अपराधांची मीं आपणाला पूर्ण क्षमा केली, ' असें ह्मण.

**मनोरमा**—( हंसून ) बरं तर तसं—"आपल्या झाल्या अपराधांची मीं आपणाला पूर्ण क्षमा केली ! " झालं आतां अगदीं मनासारखं? काय तरी बाई ?

**माधव**—( मनोरमेचा हात घट्ट धरून ) मनोरमे !

**मनोरमा**—( माधवाकडे वांकड्या नजरेनें पहात ) काय गडे ?

**माधव**—तुला काय सांगूं मनोरमे ? जणूं काय आज माझा पुनर्जन्मच झाला, असें मला वाटतें. दररोज तुझी माझी भेट होत असतां कित्येक वर्षांनीं–नव्हे तपांनीं–माझ्या प्रिय अर्धांगीशीं आज माझें प्रेम–मीलन झालें, असा मला भास होतो आहे ! आह्मां उभयतांच्या प्रणय–जीवनांत मध्यंतरीं उपस्थित झालेलें कांहीं भयंकर संकट टळून आजच्या या प्रसन्न, सुंदर स्वर्गीय प्रेम–प्रकाशांत आह्मांला या मधुर नवजीवनाचा लाभ होत आहे ! असं नाहीं तुला वाटत मनोरमे ?

**मनोरमा**—( कृत्रिम कोपानें ) निष्ठुर ! पुरुषांची जातच निर्दय ! आपलं हेंच ना माझ्यावर प्रेम ? 'तुझ्यापासून मी कांहीं सुद्धां गुप्त ठेवित नाहीं' असं नेहमीं मला ह्मणायचं असतं—खरंना हें ? त्याचं हें चांगलंच प्रत्यंतर आलं ह्मणायचं !

**माधव**—कसलें प्रत्यंतर ? कोणती गोष्ट तुजपासून मीं लपवून ठेवली ?

**मनोरमा**—कोणती गोष्ट ? इकडून कादंबऱ्या अन् नाटकं रचायला होतात, ही गोष्ट मजपासून कां बरं लपवून ठेवली ?

**माधव**—( हंसून ) मी अन् कादंबऱ्या लिहिणार ? मग रस्त्यांतला एखादा फत्तर कां नाहीं कादंबऱ्या लिहिणार ?

**मनोरमा**—तर मग मघांच्यासारखं काव्यकल्पनांनीं भरलेलं, 'प्रेम–मीलन' 'प्रणय–जीवन' 'प्रेम-प्रकाश' अशा तऱ्हेच्या नाटकी शब्दांनीं खचलेलं भाषण आपल्या तोंडून कसं आलं ? मुद्दाम अगोदर तयार करून ठेवायचं होतं वाटतं तें वाक्य ? होय ना ? सांगायचं गडे !

**माधव**—थट्टा–तुझी आपली सदोदित थट्टा ! मघांच्या तुझ्या शब्दांनीं मी इतका भिऊन गेलों ह्मणतेस, कीं काय सांगूं ! ह्मटलें कोणता आरोप तूं मजवर करते आहेस कोण जाणे ! तूं माझ्या भाषणाची थट्टा कर किंवा वाटेल तें कर, आज माझ्या हृदयांत कांहीं अवर्णनीय अशा आनंदाच्या लहरी कल्लोल करीत आहेत, हें मात्र कांहीं खोटें नव्हे.

**मनोरमा**—मीं ह्मटलं तें कांहीं खोटं नव्हे. आपण नाटकंकादंबऱ्या लिहायला सुरुवात केली आहे—निदान नाटकं वाचायला अन् पहायला तरी जारीनं सुरुवात केली आहे, यांत कांहीं संशय नाहीं! मघांपासून इकडून जें ह्मणायला होत होतं आहे तें सारं नाटकांतल्या भाषणासारखं दिसतं! नाटक-कादंबऱ्यांतले नायक आपल्या प्रियांनां–विरहानं पोळलेल्या नायिकांनां विरहाच्या अन्तीं अशींच भाषणं ह्मणून दाखवित असतात!

**माधव**—नाहीं तरी या नाटकांतली नायिका तूं, अन् नायक मीच आहें कीं नाहीं? नायिकेवर संकटं येतात, कांहीं काल प्रियवल्लभांशीं त्यांचा विरह होतो, नंतर शेवटच्या अंकांत त्या प्रणयियुग्माचें पुनर्मीलन होतें, त्याप्रमाणं तुझ्यामाझ्यावर संकटं येऊन विरहानंतर पुनः आपलं आज प्रणयमीलन झालें आहे.

**मनोरमा**—वहावा! माझ्या बोलण्याला एक एक हा पुरावाच मिळत चालला आहे—

**माधव**—मी आतां कांहीं बोलतच नाहीं—

**मनोरमा**—ह्मणजे आपण 'मूक-नायक' व्हायचं वाटतं?

**माधव**—शावास शाबास! तुझ्यापुढें का माझा बोलण्यांत टिकाव लागणार आहे?

**मनोरमा**—मग कशांत लागेल?

**माधव**—अगदीं कोणत्याहि गोष्टींत लागणार नाहीं असा तुझा समज आहे वाटतें? कदाचित् एखाद्या गोष्टींत तुझ्याशीं मी बरोबरी करूं शकेन!

**मनोरमा**—कोणत्या गोष्टींत?

**माधव**—प्रेमांत!

**मनोरमा**—( हंसून ) खरंच!

**माधव**—( खालीं मान घालून ) नाहीं, मनोरमे! कोणत्या तोंडानें मी ही गोष्ट बोलूं? कुठें तुझें मजवरील स्वर्गीय प्रेम! त्या प्रेमाला पायांखालीं तुडवून मी अनाचारांत रत होऊन गेलों असतांहि तुझें मजवरील प्रेम रतिमात्रहि कमी झालें नाहीं! त्या निर्मल प्रेमाशीं का माझ्या कलुषित प्रेमाची—नव्हे प्रेमाभासाची—रूपलालसेची–बरोबरी होणार? काय तरी माझा अहंकार! मी सुविद्य, श्रीमान्, कुलवान् ह्मणून माझें प्रेमहि अत्यंत श्रेष्ठ दर्जाचें आहे, असा मला मोठा गर्व होता! प्रेमाच्या चढाओढींत मी कोणालाहि हार जाणार

नाहीं अशी मला मोठी घमेंड होती! नीच कुलांत जन्मलेल्या नीच स्वभावाच्या माझ्या अनेक मित्रांपेक्षां मी शतपटीनें श्रेष्ठ आहें, असा माझा समज होता! विशेषतः तुझ्यावर माझें जें निःसीम प्रेम आहे, त्यांत माझी कुणीहि बरोबरी करणार नाहीं, असा मला अहंकार होता! परंतु तें सारें माझ्या अधम नीच वर्तनानें मीं खोटें ठरविलें! मनोरमे! मी खरोखर नराधम आहें— मी पशुपेक्षांदेखील पशु आहें! अरेरे! अगोदरच मी शुद्धीवर आलों असतों तर—(दीर्घ निःश्वास टाकतो)

**मनोरमा**—(माधवाच्या वक्षःस्थलावर डोकें टेंकून स्फुंदत) नको गडे असं भलतंसलतंच कांहीं बोलून घेऊं! तें सारं मला लागतं हो! मी आपल्या चरणांची दासी ना? मजवर आपलं निःसीम प्रेम आहे ना? मग हें सारं बोलून माझ्या मनाला कां वरं उगीच यातना द्यायच्या! माझ्या मनांतलं दुःख मीं कधीं लवमात्र तरी आपणाला दाखविलं का? आह्मी आर्य आई-बापांच्या मुली, आर्य सासूसासऱ्यांच्या सुना, अन् आर्य पतींच्या अर्धांगी! सीता, सावित्री, दमयंती इत्यादि आर्य पतिव्रता ललनांच्या कुलांत आह्मांला परमेश्वरानं जन्म दिला! पति हेंच आमचं सर्वस्व—पति हेंच आमचं आराध्य दैवत! इतर दैवतं आह्माला ठाऊक नाहींत! पति जर आमच्याकडे किंचित् उपेक्षेच्या दृष्टीनें पाहूं लागले, तर आह्मां आर्यस्त्रियांनां सार्वभौमाचं सिंहासन मिळालं तरी तेंहि तुच्छ वाटेल! पतीच्या एका मधुर वचनासाठीं, पतीच्या प्रेमलवप्राप्तीसाठीं आह्मी प्रत्यक्षः स्वर्गसुखावरहि लाथ मारूं!

**माधव**—अन् आह्मी आर्यपुत्र कोठें कमी आहोंत? स्वर्गसुखाबरोबर आमच्या देवांगनातुल्य पतिव्रता स्त्रियांनांहि लाथ मारून पत्रावळीएवढ्या विस्तीर्ण कुलांत जन्मलेले आह्मी आर्यपुत्र नरकतुल्य दुर्गंधयुक्त नीच पाप-गंगाजींनां शंकराप्रमाणें मस्तकीं धरून तांडव करतों!

**मनोरमा**—पहा पहा—कुठली गोष्ट कुठं आणायला झाली ती! आपला स्वभाव तरी लहरी गवयांसारखाच आहे ह्मणायचा!

**माधव**—कसा तो!

**मनोरमा**—यजमानांनीं गवयांला बैठकींत ठुमरी ह्मणायला सांगितली कीं ते जसे 'धितलांग तनन तों तों' चा त्याच्यावर वर्षाव करतात, तसंच आपणहि आतां केलं! माझ्या मनांत एक गोष्ट अन् आपण करायची—नव्हे ह्मणायची भलतीच!

**माधव**—( हंसून ) अस्सें अस्सें ! यावेळीं गायची लागली आहे वाटतें आपली लहर ? त्याशिवाय कांहीं संबंध नसतां गवयाच्या गोष्टीचा आपण उल्लेख केला नसता ! बरें बरें, गा पाहूं कांहीं तरी ! आजपर्यंत तुच्छ वाटत असलेल्या स्वर्गसुखाचा आह्मांला आज लाभ घडूंद्या.

**मनोरमा**—माझी कुठं ना आहे गायला ? आपण बसावं हार्मोनियमवर.

**माधव**—छे छे ! आपल्या गायनाचा तसाच वादनाचाहि लाभ घडूंद्या आह्मांला. आह्मी आपले इथें स्वस्थ पडून श्रोत्याचें काम करणार.

**मनोरमा**—बरं तर. ( हार्मोनियम वाजवून गाते. )

**"नच लवही रोहिणीच्या हृदयीं प्रमोद मावे !**
**गुरुभार्याप्रणयपाशा**
**त्यजुनि बघे जैं गृहाशा**
**इंदु, तदा द्वारदेशा**
**रमणी सहर्ष धांवे !**
**हृदयिं वहे जरि कलंका,**
**पति तरि ती हो विशंका—**
**आलिंगी त्यासि !—पंका**
**प्रीती कधीं न पावे !**
**नच लवही रोहिणीच्या हृदयीं प्रमोद मावे !"**

**माधव**—तुह्मी स्त्रिया ह्मणजे शुद्ध प्रीतीच्या मूर्ति ! मनोरमे ! तूं तर प्रत्यक्ष स्वर्गीची देवता आहेस !

**मनोरमा**—हें तर पुष्कळ दिवसांपासूनच ठरून गेलं आहे ह्मणा ! कारण, लग्न झाल्यापासूनच आपण मला ही पदवी देऊन ठेविली आहे. तरी बरं आहे, कीं, माझं नांव कांहीं देवींच्या नांवांपैकीं नाहीं ! हें आतां सारं राहूंद्या गडे ! हो, पण बरी आठवण झाली. भारीच बाई विसराळू माझा स्वभाव ! आज बुधवार ना ? आज काय काय करायचं ठरलं आहे, तें आहे ना सारं लक्ष्यांत ?

**माधव**—हो, सारें लक्ष्यांत आहे. तें मी कसें विसरेन ?

**मनोरमा**—पण सगळ्यांत मुख्य गोष्ट ही लक्ष्यांत ठेवायची बरं, कीं, भाऊजींनां या गोष्टीचा लवमात्रहि मागमूस लागूं द्यायचा नाहीं. उषेसंबंधाची हकीगत इकडे समजली आहे असं जर भाऊजींनां कळलं, तर त्यांनां

लज्जेनं मेल्याहूनहि मेलं होईल. मीं सांगितल्या वेळीं नेमकं नजरबागेंत यावं, ह्मणजे झालं.

**माधव**—बरोबर चार वाजतां भाऊसाहेबांनां बरोबर घेऊन मी राजेबहाद्दरांच्या बागेंत येतों. आजचा मोठा आनंदाचा प्रसंग असल्यामुळें त्याच्या स्मरणार्थ नजरबागेंतच आपल्या कटांतील साऱ्या मंडळीला एक चमचमीत picnic झडलें पाहिजे. मनूच्या लग्नाच्या केळवणीला आज नजरबागेंतच प्रारंभ होऊंद्या. तुझ्या सूचनेप्रमाणें भाऊसाहेबांपाशीं मीं सर्व कांहीं युक्तियुक्तीनें सांगून ठेविलें आहे. माझी ही प्रस्तावना ऐकून त्या सरलहृदय ह्मातान्याला किती आनंद झाला आहे ह्मणतेस! आनंदाच्या भरांत आपल्या कांपणाऱ्या हातांनीं भाऊसाहेबांनीं माझा हात घट्ट पकडला! त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागले; हर्षातिशयामुळें त्यांचा कंठ अगदीं भरून येऊन त्यांनां एक शब्दहि बोलतां येईनासा झाला! बाबांवर भाऊसाहेबांची भारीच भक्ति होती अन् त्या दोघांत मित्रत्वहि तसेंच होतें. मनूला मात्र तूं काय तें नीट पढवून ठेव—नाहीं तर आयत्या वेळीं सारा घोटाळा!

**मनोरमा**—( हंसून ) तें कांहीं कुणीं मला सांगायला नको हो! भाऊजींच्या लग्नाचं प्रकरण इथपर्यंत रंगाला यायला कारण कोण झालं, आहे ठाऊक?

**माधव**—हो तर, बायकांतली तूं एक भद्रेश्वर दीक्षितच आहेस ह्मणायची! मनोरमे! खरोखर, 'गृहलक्ष्मी' ही पदवी सर्वथैव तुलाच योग्य होय. तुझी योग्यता मी काय वर्णन करूं? माझ्यासारख्या अयोग्य, असच्चरित्र, अधमाधम पतीलाहि परमपूज्य समजून त्याला मस्तकीं धारण करणें हें तुजसारख्या गृहलक्ष्मीखेरीज कुणाला शक्य आहे? मजकडून तुझी इतकी अवहेलना व पदोपदीं अवमान होत असतां, एक दिवसहि तूं माझा लवमात्र तिरस्कार केला नाहींस; एक क्षण तूं मजवर रागावली नाहींस; सर्व अभिमान विसरून, मजकडून झालेला अपमान गिळून, मातेप्रमाणें निरंतर माझ्याजवळ राहून मला यत्किंचितहि न दुखवितां असन्मार्गापासून मीं विमुख व्हावें ह्मणून मृदु शब्दानीं मला सदुपदेश केलास! सदोदित मी तुला झिडकारित असतांहि या अधम पतीचें दास्य करून तूं हळुहळू युक्तिप्रयुक्तीनें मला चैतन्य दिलेंस! मनोरमे! प्रत्यक्ष देवांगनाहि तुझ्या दास्यांत अपूर्व आनंद मानतील!

**मनोरमा**—( खालीं मान घालून ) पुनः पुनः मला लाजवायचं तरी किती बाइ! कांहीं झालं तरी मी आपली अर्धांगी आहेना? ( स्वगत )

आतां हा विषयच मुळीं बदलावा, तें बरं. (उघड) बरं, त्या अस्पृश्य जातीच्या शाळेंतील मुलांनां एकदा मेजवानी द्यावी, असं आज पुष्कळ दिवसांपासून माझ्या मनांत आहे. रविवारीं होईल करायला त्याची व्यवस्था ?

**माधव**—या रविवारीं नाहीं जमायचें तें, मनोरमे ! या रविवारीं एक महत्त्वाचें काम आहे.हेमन्तपुरांतून पांच तरुण विद्यार्थ्यांनां या वर्षी अमेरिकेंत आणि जपानांत agriculture अन् mining शिकायला पाठवायचें आहे, त्याची वाटाघाट करण्यासाठीं या रविवारीं शहरांतल्या प्रमुख लोकांची सभा भरायची आहे. मनूच्या लग्नानंतरच तूं ह्मणतेस तशी मेजवानी द्यावी, ह्मणजे एका कामांत दोन कामें साधल्यासारखीं होतील. येतें ना हें तुझ्या मनाला ? आजपासून तुझा प्रत्येक शब्द मला शिरसा प्रमाण आहे.

[ पडद्यांतून "दादा! तुह्मी कुठें आहां?" असा शब्द ऐकूं येतो. ]

**माधव**—कोण ? मनु ? ये इकडे.

[ मनोहर प्रवेश करतो. ]

**मनोहर**—वहावा ! इथें वहिनीहि आहे वाटतें ? मग बरेंच झालें. दादा ! मघांपासून मधुकर तुह्माला शोधतो आहे. बाहेर दिवाणखान्यांत तो तुमची वाट पहात बसला आहे.

**माधव**—ओ हो ! कशी आठवण नाहीं पहा मला ! मधुकराला आज या वेळीं मींच इकडे बोलाविलें होतें. मी त्याला एक महत्त्वाचें काम सांगणार आहें.

**मनोहर**—आतांच तुमच्या नांवानें एक पत्र आलें आहे दादा !

**माधव**—कुणाकडून आलं आहे तें पत्र ?

**मनोहर**—हिंदुयुनिव्हर्सिटी फंडाच्या सेक्रेटरींकडून. त्यांनीं लिहिलें आहे, कीं, फंडाला 'हेमन्तपुरांतून' निदान पंधरा हजार रुपये तरी मिळाले पाहिजेत. आपल्यासारख्या संपन्न देशहितैषी मंडळीनीं मनावर घेतलें तर ही रकम हां हां ह्मणतां जमेल, मग काय तुमचा विचार आहे ?

**माधव**—विचार कसला त्यांत ? आजच्या आज सेक्रेटरींनां पांचशें रुपयांचा एक चेक पाठवून दे. मी अगोदर मधुकराला जाऊन भेटतों. [ जातो.

**मनोरमा**—अहो तुह्मी देशहितैषी ! आमच्यासारख्या सामान्य मंडळीवर आपली मेहेरनजर असावी ह्मटलं ! बाकी, मोठमोठ्या संस्थांपुढं आह्मां गरिबां-कडे आपल्यासारख्या पुढारी मंडळीचं लक्ष्य कशाला जातं आहे ?

**मनोहर**—कसले पुढारी अन् कसले काय? वहिनी! माझा आतां अंत किती बघणार तूं? हा महिना देखील संपत आला, आतां तुझा विचार तरी काय आहे, तें मला कळूं दे एकदा.

**मनोरमा**—( गुणगुणते ) 'किती उताविळ होशि मुकुंदा? कुंजवनीं—' आतां अगदीं थोड्यावर आलं आहे! आज दोनप्रहरीं चार वाजतां या नाटकाचा शेवटचा प्रवेश नजरबागेच्या रंगभूमीवर आणावा, असं मीं ठरविलं आहे. तुह्मी तर नाटकांतले नायक! ठरल्यावेळीं तुह्मी तिथं हजर असा, नाहीं तर आह्मांला हॅम्लेटशिवाय हॅम्लेट नाटक करून दाखवावं लागेल! उषेला घेऊन मी नेमल्या वेळीं येत्यें. तुमच्या मधूला सांगून ठेवा, कीं, बागेंतले माळी दिखील तिथं त्या वेळीं असतां कामा नयेत.

**मनोहर**—ठीक आहे.

**मनोरमा**—नुसतं 'ठीक आहे', ह्मणून नाहीं या वेळीं चालायचं. मीं सांगितल्याप्रमाणं भगवी कफनी, भगवा पटका, झोळी वगैरे सारा गोसाव्याचा वेष तयार आहेना?

**मनोहर**—अंः! तो का मी विसरणार? काल संध्याकाळींच तो पैदा करून त्याचें एक गांठोडें बांधून ठेविलें आहे. पण त्याचा उपयोग कसा करायचा तें तर सांगशील?

**मनोरमा**—'मतिविकार' नाटकांत मनोहराच्या बंधूला—चकोराला—बायकोकरतां गोंसाव्याचा वेष घ्यावा लागला आहे; पण आमच्या या नाटकांत खुद्द मनोहरालाच प्रियेच्या प्राप्तीसाठीं तो वेष परिधान करावा लागणार आहे; तुह्माला गोंसावी बनविण्यांत माझे दोन हेतु आहेत. उषेची प्राप्ति माझ्या योजनेप्रमाणं या वेषानं झाली तर ठीकच आहे; परंतु उषा जर तुह्माला प्राप्त झाली नाहीं, तर त्या वेषानं तुह्माला परस्पर काशीला पळून जातां येईल! माझं जर ऐकाल, तर आतांच तो बैराग्याचा वेष तुह्मी चढवाल तर बरं होईल. एक तर त्यानं पुढील खेळाची रंगी तालीम झाल्यासारखी होईल, अन् दुसरं असं, कीं, उषेचा लाभ न झाल्यामुळं गोसांवी बनून तुह्मी असेच जर परस्पर काशीला पळून गेलां तर तुमच्या त्या सुंदर योगिवेषाचं जें दर्शन आह्मांला पुढं कधींहि होणार नाहीं, तें आतां तरी होईल!

**मनोहर**—तुझी थट्टा देखील कधीं कधीं अगदीं माझ्या मर्मावर डाग देते वहिनी!

**मनोरमा**--एकूण माझी थट्टा दिखील मोठी मार्मिक असते ह्मणतां ?

**मनोहर**--( त्रासून ) होय, शोकरसप्रधान ठरलेल्या 'हरिश्चंद्र' नाटकाला एका नाटककारानें हास्यरसप्रधान करण्याचा केलेला प्रयत्न जितका मार्मिक आहे, तितकीच, वेळीं अवेळीं केलेली तुझी थट्टाहि मार्मिक असते, समजलीस ? बरें, राहूं दे ती गोष्ट. पुढें मीं काय करायचें ?

**मनोरमा**—मी जसजसं तुह्माला करायला सांगेन तसतसं करायचं अन् असं वर्दळीवर यायचं नाहीं, समजलं ? अजूनपर्यंत खरा मनोहर कोण त्याचा बिचाऱ्या उषेला मागमूसहि नाहीं ! तोतया मनोहरावर मात्र ती अगदीं आषक होऊन गेली आहे; इतकी, कीं, तो जें जें कांहीं सांगेल तें तें करायला ती अगदीं एका पायावर तयार आहे. परंतु खरा मनोहर आपल्यासाठीं बैरागी बनून देशान्तराला जात आहे असं जेव्हां उषेला कळून येईल—

**मनोहर**—वहिनी ! आलीस पुनः तूं आपल्या मुळावर—

**मनोरमा**—तो नवीन पायघोळ झगा, पटका, चढाव वगैरे माझा पोषाकहि बरोबर घ्यायला विसरूं नका हो ! मी हा राजवेष चढवीन अन् तुह्मी कफनी, टोपी, झोळी, चिमटा वगैरे भणंग गोंसाव्याचा वेष घ्या—

[ पडद्यांतून "मनु ! एकदा जरा इकडे येऊन जा बरें," असा शब्द होतो. ]

**मनोहर**—हे दादा बोलावताहेत मला, जाऊन येतों चटकन्.

**मनोरमा**—बरं जा, पण जातांना मला भेटल्याखेरीज मात्र जाऊं नका ! जातांना काय काय करायचं त्याची तुह्माला नीट तालीम देऊन ठेविली पाहिजे.

**मनोहर**—ठीक आहे.

[ दोन बाजूंनीं दोघें जातात.

---

## प्रवेश तिसरा.

[**स्थल**—भाऊसाहेबांच्या बंगल्यांतील दिवाणखाना. उषा सचिंत प्रवेश करते.]

**उषा**—आतां या वेड्या मनाला करूं तरी काय ? ध्यानीं, मनीं, स्वप्नीं, उठतां, बसतां, अष्टौप्रहर या मनाला मनोहराशिवाय कांहीं सुचत नाहीं ! मनोहरानं मनाचं हरण करावं, हा त्याचा धर्मच आहे; परंतु या वेड्याला अशी भुरळ कां पडावी ? मनोहरपंत ! आतां नका गडे, या अबलेचा छल करूं—'मला पदरांत घ्या' असं लज्जेनं जरी आपणाला मला स्पष्ट सांगवत नाहीं, तरी माझ्या मनाची खरी स्थिति आपणाला आजपर्यंत ताडतां आली

नाहीं, तर आपण 'मनोहर' कसले ? काय करूं ? 'मूकनायक' नाटकांत त्या वीणारवाच्या दर्शनानं अन् सान्निध्यानं सरोजिनाची जी स्थिति झाली होती, तीच स्थिति मनोहराच्या दर्शनानं माझीहि हल्लीं झाली आहे. वीणारव रात्रं-दिवस सरोजिनीसह एकाच राजप्रासादांत तरी वास्तव्य करीत होता; पण मनोहरपंतांचं मला दिवसांतून कुठं एखादेवेळीं दर्शन घडतं, मग माझी अशी स्थिति कां व्हावी ? त्या वीणारवाप्रमाणं मनोहरपंत ! आपणहि कुणी छद्म-वेषधारी असाल काय ? वीणारवाच्या हजारों मूर्ति ज्याप्रमाणं सरोजिनीला सभोंवार दिसत असत, त्याप्रमाणं आपल्याहि हजारों मूर्ति मला खालीं, वर सभोंवतालीं दिसत आहेत ! मनोहरपंत ! सरोजिनीनं वीणारवाची प्रार्थना केली, त्याप्रमाणं मीहि आपल्याला विनंति करत्यें, कीं, मजसभोंवतालचा हा कडक पहारा उठवून टाकून मला आपल्या नजरकैदेंतून मुक्त करा—

"उगिच कां कान्ता गांजितां दासी दीना ?—
व्यापुनियां सारी धरणी, मूर्ति आपुली या नयनीं,
खेळते पहा दिनरजनीं, तेविं हृदयमंचकिं लीना !"

[ पडद्यांतून " गडे उ ! ये ग ये ! हें पहा मनोहरपंतांचं पत्र आलं आहे—" असा शब्द ऐकूं येतो. ]

**उषा**—( हर्षानें ) काय मनोहरपंतांचं पत्र ? अग बाई ! आल्यें ग आल्यें सु !

[ त्वरेनें जाते.

---

## प्रवेश चवथा.

[ **स्थल**—राजेबहाद्दरांची नजरबाग. मनोहर व मधुकर बोलत बोलत प्रवेश करितात. ]

**मनोहर**—अगदीं बोलूं नकोस मधु ! तुझें हें मत साफ चुकीचें आहे.

**मधुकर**—माझें हें मत चुकीचें ठरतें तर त्यांत माझ्यापेक्षां कोणालाच अधिक आनंद झाला नसता. पण वस्तुस्थिति अशी आहे, कीं, माझ्या मतांत पूर्ण सत्य भरून राहिलें आहे. स्त्रीशिक्षणाच्या मी विरुद्ध आहें असें का तूं समजतोस ? स्त्रीशिक्षणापासून आपल्या समाजाचें आणि देशाचें अतिशय हित झालेलें धडधडीत दिसत असतां त्याविरुद्ध बरळणारा मनुष्य शुद्ध पशु आहे, असेंच ह्मटलें पाहिजे. आपल्या अर्धांगी अज्ञानांधकारांत धडपडत असतां

आपल्या उन्नतीची अपेक्षा करणें हें फाटलेल्या मगजाचेंच लक्षण आहे. मुलींनां उच्च शिक्षण अवश्यमेव द्या, उच्च शिक्षणानें त्यांनां खऱ्या कार्यक्षम करा, आमची त्याला पूर्ण संमति आहे; परंतु बहकून भलतीसलतीच स्त्री-शिक्षणाची दिशा आंखूं नका, एवढीच आमची तुह्मांला विनंति आहे. हल्लींच्या उच्च दर्जाच्या स्त्रीशिक्षणपद्धतींत एका प्रकारचा western aristocrat भाव डोकावतो आहे, यांत मात्र कांहीं शंका नाहीं. आमचें ह्मणणें एवढेंच कीं, त्याचें सर्वस्वी समर्थन करणें इष्ट नाहीं. उच्च शिक्षणानें स्त्रियांचीं मनें पूर्णपणें विकसित होऊन त्यांचें आपल्या समाजाच्या व देशाच्या खऱ्या उन्नतीला साहाय्य झालें पाहिजे, हा स्त्रीशिक्षणाचा आद्य हेतु आहे अन् सदोदित असला पाहिजे. पतीसमोर टेबलावर चहाचा कप ठेवून त्याच्यापासून delicious, नाटकी तऱ्हेच्या प्रणयभाषणाची अपेक्षा करणें, किंवा हंसतमुरडत पियानोवर **'अरसिक किति हा शेला'** वगैरे पदें वाजवून गाणें, अथवा घरच्या बल्लवमहाराजांनी 'यःपलायते' केलें असतां लोंकरीच्या विणकामाचें श्राद्ध करीत खाणावळींतून ताटें मागविणें, किंवा ती सोय नसली तर पतिराजांना थंडा फराळ घालणें, अथवा बूटस्टाकिंग्स चढवून पतीच्या हातांत हात घालून शिकारखान्यावर हवा खावयास जाणें, एवढींच काय तीं सुशिक्षित स्त्रियांचीं कर्तव्यें, असें मात्र नाहीं, हें तुलाहि कबूल केलेंच पाहिजे. बाबा! आह्मी हिंदु लोक पडलों दरिद्री! आमच्या स्त्रियांचीं जर हींच कर्तव्यें ठरूं लागलीं तर आह्मां गरिबांचा निभाव लागावा कसा? हल्लींच्या पाश्चात्य शिक्षणाचा एक मुख्य दोष हा आहे, कीं, त्याच्या योगानें luxury किंवा विलासप्रियता हा दोष आहे असें आह्मी समजत नसून, उलट ती एक आवश्यक गोष्ट आहे अशी आमची दृढ कल्पना होते.

**मनोहर**—इंग्रजी शिकलेल्या सरसकट सर्व स्त्रियांवर तूं हा आरोप कसा लादतोस, तें मला कळत नाहीं.

**मधुकर**—हा तूं मात्र मजवर आरोप करीत आहेस! सर्व सुशिक्षित स्त्रियांवर मी असा आरोप कधींहि करणार नाहीं. विशेषतः तुझ्या वहिनी-सारख्या विद्याविनयसंपन्न स्त्रियांचें उदाहरण डोळ्यांपुढें असतां मी असें ह्मणेन तरी कसा? तुह्मी खुशाल इंग्रजी शिक्षण द्या, नुसत्या शिक्षणापासून कोणाचें अहित कधींहि होणार नाहीं; परंतु शिक्षण देतांना एवढेंच लक्ष्यांत ठेवा, कीं, पियानोवर पदें वाजविण्याकरतांच किंवा drawing room मध्यें guest receive

करून 'मि–लॉर्ड' करण्यासाठींच कांहीं स्त्रियांना शिक्षण द्यावयाचें नाहीं! आमच्या स्त्रियांच्या शिक्षणांत गृहधर्मावरच विशेष जोर देणें अत्यावश्यक आहे. सरस्वतीमंदिराची उभारणी पाश्चात्य पद्धतीची करावयाची असली, तरी त्याचा पाया पौर्वात्य पद्धतीचाच पाहिजे. सर्वच स्त्रियांवर शिक्षणाचा असा अनिष्ट परिणाम होतो, असें मी कसें ह्मणेन? परंतु बऱ्याचजणींवर होतो, यांत मात्र शंका नाहीं. इकडे पति जरी मरणोन्मुख असला तरी कांहीं fashionable रमणींचें पियानो वादन, लोंकरीचें विणकाम, 'सोफ्या'वर पडून नॉव्हेल–वाचन वगैरे काम ऐटींत चाललेंच असतें! पतीजवळ बसावयाचें तें केवळ luxury ह्मणून, कर्तव्य ह्मणून नव्हे! मनोहर, मी पुनः पुनः जोरानें सांगतों आहें, कीं, सर्वच सुशिक्षित स्त्रियांचें हें वर्णन नव्हे! परंतु पुष्कळ cases नां हें वर्णन बरोबर लागू पडेल! भलताच गैरसमज करून घेऊं नकोस.

**मनोहर**—तर मग असें कां ह्मणेनास, कीं, आमच्यांतील कांहीं उच्च दर्जाच्या लोकांची अंतःस्थिति जितकी वरून सुखाची दिसते तितकी खरोखर नसते!

**मधुकर**—खरी गोष्ट बोलायची, ह्मणजे असें ह्मणणें भाग आहे. दोन चार घोड्यांच्या फैटणी, मोटार, शेंकडों रुपये किंमतीचे सूट, किंवा शर्टच्या तकतकीत कडक प्लेटस या मापानें कांहीं खरें गृहसुख मोजतां येणें शक्य नाहीं! पुष्कळ बड्या लोकांनीं आपलीं खरींखुरीं आत्मचरित्रें लिहिलीं तर त्यांत त्यांनीं गृहसुखाच्या अभावीं दीर्घ निश्वास टाकल्याचें ठिकठिकाणीं आढळून येईल!

**मनोहर**—मग आमच्या स्त्रियांचें ideal तरी काय ठरवतोस तूं?

**मधुकर**—आपल्या या हिंदुस्थान देशाचें ideal पाश्चात्य ध्येयापेक्षां अर्थातच निराळें असणार! आमच्या आर्यस्त्रियांचें सुमातृत्व हेंच ideal—नाटकी नायिका नव्हे! Mother of a son, and not a heroine!

**मनोहर**—ठीक ठीक!

**मधुकर**—दूर जायला कशाला पाहिजे? तुझ्या Lady-love कडे पहा-सना! मनोहर, माझ्यावर रागावूं नकोस हो! सहज डोळ्यांसमोर उदाहरण दिसलें अन् तें तुला चांगलें पटेल अशी खात्री वाटली, ह्मणून उषेचें उदाहरण मीं घेतलें, इतकेंच. लहानपणीं तिची आई निवर्तल्यामुळें तिला शिस्तीची रीतभात लावायला कोणीच बायको मनुष्य राहिलें नाहीं; त्यामुळें स्त्रियांचें

मुख्य भूषण जें गृहधर्मज्ञान त्याचा तिला कधीं गंधहि लागला नाहीं. शाळेंत अन् कॉलेजांत कांहीं इंग्रजी कादंबऱ्या, काव्यें व नाटकें वाचल्यामुळें व त्याला नाटकप्रयोगदर्शनाची भर पडल्यामुळें उषेच्या sensitive मस्तकांत आपण कोणी नाटकी नायिका आहों, अशी दृढ भावना उत्पन्न झाली, अन् त्यामुळेंच राजश्री! आपण आज एवढ्या मनोयातना भोगीत आहां! उषेकडे पहा अन् तुझ्या वहिनीकडेहि पहा—Look on this picture and on that! इंग्रजी शिक्षणांत तुझ्या वहिनी उषेपेक्षां कांकणभर सरसच आहेत; परंतु उपयुक्त गृहशिक्षणाच्या जोरावर अलीकडच्या सुशिक्षित स्त्रीवृंदाला त्या आदर्शरूप होऊन बसल्या आहेत!

**मनोहर**—हें मात्र कांहीं खोटें नव्हे. तूं ह्मणतोस त्या मुद्द्याचा सर्व बाजूंनीं विचार केला तर–तर—

**मधुकर**—मी तरी तेंच ह्मणतों. Unbiassed होऊन जर तूं विचार करशील तर मी ह्मणतों त्यांत पूर्ण सत्य आहे, अशी तुझीहि खात्री झाल्याखेरीज राहणार नाहीं. माझें हें मत सर्वांनीं accept करावें, असा कांहीं माझा आग्रह नाहीं; परंतु माझा मुद्दा विचार करण्यासारखा तरी आहे, हें खास! आजपर्यंत माझे हे विचार, मी तुझ्यापाशींहि बोललों नव्हतों; परंतु तुझ्या या वेड्या प्रणयिनीची case बारकाईनें study करावयाला लागल्यापासून माझ्या या विचारांनां बराच जोर मिळाला, अन् ह्मणून आज हें तुझ्यापाशीं मी बोलतों आहें. स्त्रियांनीं काय किंवा पुरुषांनीं काय unoccupied असणें ह्मणजेच एका प्रकारचें वेड—निदान fashionable वेड होय! परकीयांच्या चालीरीतींचें, पोषाकाचें, वेषाचें अनुकरण; त्याप्रमाणेंच तुमचा fashionable hysteria–luxury—नव्हे, नाटकी–नॉव्हेली प्रकार—ओहो! ती पहा तुमची मंडळी–हल्लीं रंगभूमीवर चाललेल्या नाटकांतील पात्रें आलीं पहा. आपण आतां चटकन् त्या बाजूला आड होऊंया—आतां भगवा वेष चढवून आपणाला महंत बनलें पाहिजे!

**मनोहर**—होय बाबा! आला आहे खरा तसा प्रसंग! चल, चल लवकर.

**मधुकर**—चल, परंतु माझें आतां इथें काय काम आहे? वहिनी, उषा, अन् तूं आतां काय तो गोंधळ घाला. तुमच्या नाटकांतील हा शेवटचा प्रवेश चांगला वठून त्यांतल्या नायकनायिकेचें प्रेममीलन होऊंदे, एवढीच आह्मां

प्रेक्षकांची इच्छा, दुसरें काय ? वहिनींनीं नेमून दिलेली व्यवस्था पहायला मी जातों.

[ दोघे जातात.

[ पुरुषवेष धारण केलेली मनोरमा, उषा व सुशीला प्रवेश करतात. ]

**सुशीला**—हो, मघांपासून मी आपणाला विचारीन विचारीन ह्मणत्यें आहें. आजच आपण हा निराळा वेष कां बरं केला आहे ? ऐटदार अंगरख्याऐवजीं हा लांबच लांब पायघोळ झगा आपण चढविला आहे तो आपणाला कांहीं शोभत नाहीं.

**मनोरमा**—( हंसून ) हा वेष मीं उषेची परीक्षा पहाण्यासाठीं घेतला आहे. कदाचित् तिचें प्रेम मनोहरावर नसून बाह्य वेषावरच असेल.

**उषा**—( खालीं मान घालून ) नाहीं नाहीं, वेषावर का कुणाचं प्रेम जडतं ? आजपर्यंत लज्जेमुळं माझ्यानं आपणाला सांगवेना; परंतु आतां माझ्यानं धीर निघत नाहीं. मनोहरच माझं मन हरण करून मला आज कित्येक दिवस दारुण यातना देत आहेत ! महाराज ! या दासीचं आतां रक्षण करा.

**मनोरमा**—उषे ! मीं तुला आज निक्षून विचारतों. मजवर तुझें प्रेम आहे ? मी सांगेन त्याप्रमाणें अक्षरशः तें करायला तूं कबूल आहेस ? पहा, नीट विचार करून काय तें उत्तर दे.

**उषा**—आपण माझी परीक्षाच पहावी. आपल्या एका मधुर शब्दाकरतां मी प्राण द्यायलाहि तयार आहें ! दुसरं काय सांगूं ?

**मनोरमा**—( हंसून ) प्राण देण्यापलीकडेहि मनुष्याला अशक्य अशीं कांहीं कृत्यें असतात ! बरं, तूं माझ्याशीं विवाह करायला तयार आहेस ? मी दिसतों तसं माझं खरं स्वरूप नाहीं, हें मी तुला अगोदरच सांगतों.

**उषा**—आपण कसेहि व कुणीहि असा. आपली आज्ञा मला शिरसा प्रमाण आहे. दिवसरात्र आपल्या मधुर सहवासांत रहावं, माझ्या हृदयकुंजांत आपल्या मनोहर मूर्तीची स्थापना करून—

**मनोरमा**—( मध्येंच रागावल्यासारखें करून ) हां उषे ! मी तुला किती किती वेळ सांगितलें, कीं, हा तुझा स्वभाव मला आवडत नाहीं ! आपलें चांगलें सरळ संभाषण होत होतें, तों तूं आलीस आपल्या लहरींत !

**सुशीला**—लगिन झाल्यावर जाईल हें सारं !

**मनोरमा**—त्याबद्दल मला फार शंका वाटते.

**सुशीला**—कां बरं ?

**मनोरमा**—मला नाटकी, अलंकारिक, कृत्रिम भाषेची अन् भावाची भारी चीड आहे, अन् हीं दोन्हीहि तर उषेच्या रोमरोमीं खिळून गेलीं आहेत. बाकी, प्रेमाच्या बलावर काय वाटेल तें साध्य करतां येतें! बरं, तुह्मी इथं जरा बसा, मी हा जाऊन आलोंच ! [ जाते.

**सुशीला**—गडे उ ! इथंच पहिल्याप्रथम मनोहरांनीं तुझं मन हरण केलं ! किती रम्य हें उद्यान ! अशा रम्य स्थानीं मनोहरांनां मनोहरणांत यश आलं तर त्यांत नवल काय? अहाहा ! ही **'अनल-मुखरित—**

**उषा—पिक-कुहरित रमणीया वनभूमि !'—**

**सुशीला**—Romantic !-romantic !

**उषा**—जें romance आज अनेक दिवस माझ्या हृदयचित्रपटावर चित्रित झालं आहे, तें या उद्यानानं मूर्तरूपानं मला दाखविलं-पण ऐक—

[ गात गात मनोरमा प्रवेश करिते. ]

**मनोरमा—**

**"फसलिस मुग्धे! राधे! समजुनि हृदयीं मजसि मुरारि !**
**सरल मना तव वंची माधव शठ तो मोहविकारीं !**
**सजवी स्वकरीं अपुल्या वेषें, मजला निजरूपा दे-**
**वदे आग्रहें मग 'जा, फसवीं प्रणयमधुवचें राधे.'**
**प्रेममूढ तूं नुमजसि मजसी मदभिनयें स्वच्छन्दें !**
**चंद्रावलि मी आली प्रिय तव; शंका लोपविं सारी.**
**फसलिस मुग्धे! राधे! समजुनि हृदयीं मजसि मुरारि !"**

**उषा**—( सहर्ष ) अहाहा ! किती romantic ! किती सुंदर !

**मनोरमा**—तुझ्या मुखकमलापेक्षां नाहीं कांहीं !

**उषा**—( सलज्ज ) कांहीं तरी ह्मणायचं झालं !

**मनोरमा**—यांत लाजायला काय झालें? उषे! माझ्या गायनाची स्तुति करायचें कांहीं कारण नाहीं. तुझ्या गायनाच्या पासंगासहि तें पुरायचें नाहीं.

**उषा**—काय ? माझं गाणं ?

**मनोरमा**—हो हो ! तुझें गाणें. तुझ्या त्या गाण्यानें तर माझें मन स्वर्गसुखांत पोहूं लागलें !

**उषा**—माझ्या गाण्यानं ? कुठल्या बाई ?

**मनोरमा**—काल दोन प्रहरीं तुमच्या दिवाणखान्यांत कोचावर बसून तूं म्हणत होतीस तें. सुशीला त्यावेळीं हार्मोनियमवर तुझी साथ करीत होती. मीं तें बाहेरून ऐकिलें.

**उषा**—अग बाई!

**सुशीला**—अन् तें पद स्वतः उषेनं रचलं आहे!

**मनोरमा**—होय का? तर मग तें तूं मला म्हणून दाखीव पाहूं उषे!

**उषा**—मला नाहीं तें आतां आठवत. क्षमा करायची गडे मला!

**मनोरमा**—तशी मी क्षमा करायची (जीभ चावून)-करायचा नाहीं—एकदा तरी मी तें ऐकणारच!

**उषा**—मला कां बरं उगीच लाजवायचं? शिवाय माझा गळाहि आज बसला आहे.

**मनोरमा**—गायला सांगितलें म्हणजे कोणत्या गवयाचा गळा बसलेला नसतो? बरें, मी कांहीं तुला आग्रह करीत नाहीं, हा मी चाललों. (जाऊं लागते.)

**उषा**—हां हां! जाऊं नये, जाऊं नये. मी का आपल्या आज्ञेबाहेर आहें?

**मनोरमा**—माझ्या शब्दाचा कुणीं अपमान केला म्हणजे मला भारी राग येतो. उषे! माझें तुजवर किती प्रेम आहे याची तुला कल्पना नाहीं का?

**उषा**—असं मी कसं म्हणूं? मजवरील आपल्या प्रेमाला तुलनाच नाहीं. (गातेः- )

"सतत वसे मूर्ति रम्य हृदय-मन्दिरीं!
तद्विस्मृति होय कधीं प्राण जोंवरी?
निष्प्रभसा चंद्र गमे प्रियमुखाहुनी!
सांठविली सकल द्युति तेथ, जी जनीं!
व्यापि अवनि दयित-विरहिं घोर शर्वरी!
मूर्ति तीच नयनींच्या दिव्य तारका!
हृद्गगनीं राका-शशि ती न मधुर का?
पारिजात गंधशील चित्त-भूवरी!
सतत वसे मूर्ति रम्य हृदय-मन्दिरीं!"

**मनोरमा**—वहावा! वहावा! फारच गोड! उषे! तुझ्या या मधुर गायनाची गोडी अधिक, कीं, या रमणीय उद्यानाची शोभा अधिक, हें आपण जरा इकडे तिकडे फिरून ठरवूं या-चला.

[ सर्व जातात.

[ बैराग्याचा वेष केलेला मनोहर प्रवेश करतो. ]

**मनोहर**—( हंसून स्वत:कडे पाहून ) वः! कोण ह्मणेल मी अस्सल बैरागी नाहीं ह्मणून? सतत तीन दिवस या वेषाची तालीम खोलीच्या दरवाजाला कडी लावून चालविली होती ती उगीच नाहीं! ज्या तऱ्हेनें हें सारें proceeding चाललें आहे, ती तर purely dramatic! वहिनीच्या व्यूहाला यश येऊन उषेशीं जर माझा विवाह झाला, तर तो एक अपूर्व होणार यांत कांहीं संशय नाहीं! असला चमत्कारिक विवाह कधीं कुणाचा झाला नसेल. कादंबरीकार, कवि यांचा, फार काय नाटककादंबऱ्यांतील नायकांचाहि असा विवाह कधीं झाला नसेल!

[ मनोरमा प्रवेश करते. ]

**मनोरमा**—( हंसून ) वा वा वा! भाऊजी! अगदीं गांजेकस बैराग्यांचे प्रपितामह बनलां आह्मां अन् काय? चला आतां असेच काशीला अन् जन्मभर बसा त्या झोळीला घट्ट मिठी मारून! छेः आला राग!—पण बैराग्यांनां इतका राग अगदीं नाकावर असणं बरं नाहीं हो! त्यांनीं शांतपणं काय मिळेल तो भाकरीचा तुकडा पदरांत घेतला पाहिजे. बरं, आतां ठरल्याप्रमाणं सुरू करा, समजलं? आतां मी तिला घेऊन येत्यें.

**मनोहर**—काय इथेंच?

**मनोरमा**—फक्त उषेलाच मी आणत्यें. पलीकडच्या कुंजांत त्यांनां बसवून मी चटकन् इकडे आल्यें. ठरल्याप्रमाणं आतां सारं होऊंद्या. आयत्या वेळीं मी आड होईन.

[ जाते.

**मनोहर**—आली आमच्या परीक्षेची वेळ! या वेळीं माझ्या मनाची कशी चमत्कारिक स्थिति झाली आहे! युनिव्हर्सिटीच्या परीक्षेंत देखील माझी अशी कधीं घाबरगुंडी उडाली नव्हती. ( झोळींतून एक कागद बाहेर काढून ) यांत माझ्या भाषणाचे सर्व points note down करून घेतले आहेत, त्यांची एकदा घाइघाईनें उजळणी करून ठेऊंया. तरी आयत्या वेळीं फजिती झाली नाहीं ह्मणजे मिळविलें! 'प्रेम-पाश' नाटकांतील नायकाच्या एका भाषणाचा बराचसा भाग मीं तोंडपाठ करून ठेवला आहे. ओहो! आतां अवकाशच नाहीं. वहिनी अन् उषा आल्याच! आतां सुरू केलेंच पाहिजे. ( गंभीर भावानें 'नायका'च्या स्वरानें ) "हाय! आतां जगण्यांत काय अर्थ

राहिला ? ज्या सुंदरीची प्राप्ति न झाल्यामुळें हा जन्म–ज्या सुंदरीची प्राप्ति न झाल्यामुळें–" ( स्वगत ) अरे बापरे ! आतां काय करूं ? पुढें आठवत नाहीं—

[ उषा व मनोरमा प्रवेश करतात. ]

**मनोहर**—"या जगांत आतां सुख राहिलें नाहीं; शांतीचा मागमूसहि कोठें नाहीं ! माझा सारा जन्म आतां मरुभूमीप्रमाणें शून्य झाला आहे. त्या सुंदरीनें तर मजकडे एकवारहि ढुंकून पाहिलें नाहीं. झाला—माझ्या सुखस्वप्नाचा भंग झाला ! हा संसार आतां स्मशानाप्रमाणें बनला ! या ठिकाणीं कोणी कुणाकडे ढुंकूनहि पहात नाहीं–कोणाची कुणाला दया नाहीं. कोणाच्या मनांतील दारुण यातनांकडे कुणीहि लक्ष्य देत नाहीं ! सर्वांचीं–सर्व मनुष्यप्राण्यांचीं—हृदयें पाषाणापेक्षांहि कठोर बनलीं आहेत ! तर मग या स्मशानतुल्य संसारांत रहाण्यांत आतां अर्थ तरी काय राहिला ?" ( स्वगत ) " अर्थ तरी काय राहिला ? काय राहिला ? —पुढें काय ? पुढचें विसरलों ! आतां काय करूं ?–काय राहिला ?–हं हं ! आठवलें ( उघड ) "आतां गहन अशा विजन अरण्यांत मी जाणार–खास जाणार ! त्या वनांत व्याघ्रसिंहादि हिंस्र पशु असतील !–असले तरी काय हरकत आहे ? तेथें स्त्रीरूपी राक्षसी तरी खास नसतील ! पाषाणहृदयाची स्त्री तेथें एकहि नसेल ! बैरागी होऊन वनांत जावें ह्मणून हा भगवा वेष करून आज मी घरांतून बाहेर पडलों आहें. हातांत कमंडलु नाहीं–तो मी जातां जातां विकत घेईन–पण घरीं परत फिरणार नाहीं. ( थांबून ) सुंदरि ! वनांत जायला मला धीर व्हायचा नाहीं, असें तुला वाटतें काय ? कां बरें ? काय ह्मणतेस ? 'प्रेमाच्या सुवर्णशृंखलेमुळें ?' हाः हाः हाः ! प्रेम ह्मणजे आतां शून्यांत विलीन झालेलें सुखस्वप्न होय ! तूं तर मजकडे पहातहि नाहींसना ? हा चाललों मी वनांत ! परंतु एका निरपराधी प्राण्याच्या सुखसर्वस्वावर तूं पाणी ओतलेंस–त्याच्या जन्माचा सत्यनाश केलास—याचें पातक तुझ्या मस्तकावर आहे ! हाय ! उहुः !—"

**उषा**—( गद्गद स्वरानें ) अग बाई ! कोण बरं हा ?

**मनोरमा**—काय ? याला तूं ओळखलास नाहीं ?

**उषा**—नाहीं.

**मनोरमा**—याची हकीगत बहुतेकांनां ठाऊक आहे. याचें एका तरुणीवर प्रेम जडलें–परंतु याच्या प्रेमाला त्या तरुणीकडून मुळींच प्रेमाचा मोबदला मिळाला नाहीं–याच्याकडे ती निष्ठुर स्त्री ढुंकूनहि पाहीना! ह्मणून या बिचाऱ्याला वेड लागलें आहे. वेडाच्या भरांत तो असा फिरत असतो.

**उषा**—अरेरे! त्या तरुणीचं हृदयं किती कठोर ह्मणायचं?

**सुशीला**—खरंच! तिला उपमा ह्मटली ह्मणजे पाषाणाचीच!

**मनोरमा**—होय, तुह्मी ह्मणतां तें कांहीं खोटें नाहीं. या बिचाऱ्याची इतकी करुणास्पद स्थिति झाली असतांहि अजून तिला याची दया येत नाहीं.

**उषा**—राक्षसीच ती! ती ह्मणते तरी काय?

**मनोरमा**—ह्मणणार काय? त्या तरुणीच्या बापानें अन् इष्टमित्रांनीं त्या उभयतांचा विवाह होण्याविषयीं खटपटीची शिकस्त केली; परंतु तिचें ह्मणणें एक—कांहीं झालें तरी आपण लग्न करणार नाहीं!

**उषा**—काय ह्मणतां?

**मनोरमा**—मग या तरुणाला वेड लागलें यांत त्याच्याकडे काय बरें दोष? सुखासमाधानानें का तो बैरागी होऊन अरण्यांत जातो आहे?

**सुशीला**—आपणाला हें कसें कळलें.

**मनोरमा**—तें–तें–याची माझी तशी थोडीशी ओळख आहे.

**उषा**—काय? हा बैरागी होऊन वनांत निघून जाणार?

**मनोरमा**—संसारांत मनुष्याच्या सुखाची आशा समूळ नष्ट झाली ह्मणजे तो संसारांत कसा रहाणार? समज, मला जर मरण आलें, तर संसारांत रहायला तुला तरी बरें वाटेल का?

**उषा**—इडा पिडा टळो, अमंगळ पळो! काय हें भलतंच बोलायचं?

**मनोरमा**—( हंसून ) भलतेंच असलें तरी खरें आहे ना? अरे, पण हा पहा तो पुनः आला. बिचारा काय बडबडतो तें ऐकायला काय हरकत आहे?

[ मनोहर येतो. ]

**मनोहर**—"छेः! वनांत जाऊन तरी माझ्या व्यथित अन्तःकरणाला सुख कसें मिळणार? माझ्या हृदयवल्लभेच्या दारुण चिंतनानें तेथें माझ्या हृदयाच्या यातना अधिकच वाढतील. अरेरे! काय माझी ही दशा? मी काय करूं ह्मणजे या साऱ्या यातना नाहींशा होतील? परमेश्वराची करुणा भाकली ह्मणजे मनुष्याच्या सर्व दुःखांचें निरसन होतें असें ह्मणतात; परंतु

मज अनाथावर परमेश्वरहि निष्ठुर झाला आहे. ( मनोहराला खूण करून मनोरमा कुंजाआड जाते. ) चिंतेच्या या भयंकर ज्वाला कशानें विझतील? ( एकदम उषेसमोर येऊन तिजकडे तीव्र दृष्टीनें पहात ) हीच ती पाषाणहृदयी सुंदरी! आलीस पाषाणहृदये! रहा–तेथेंच उभी रहा. अरे, हें मी काय करतों आहें? माझ्या हृदयवल्लभेवर राग? सुंदरी! मला घरीं सुख नाहीं–कुठेंहि नाहीं. सुख प्राप्त व्हायला मी काय करूं तें तरी सांग. काय, तोंड फिरवतेस? तुला आश्चर्य वाटतें?—कां बरें? माझ्या निर्मल प्रेमाची उपेक्षा केलीस ती तूंच नव्हे?

**उषा**—( आश्चर्यानें ) काय? मीं?

**मनोहर**—होय–तूंच–तूंच! तुला त्या गोष्टीचें विस्मरणसुद्धां झालें काय? कठिण हृदयानें–निष्ठुरपणानें माझा उपहास केलास तो तूंच! थांब–उभी रहा. माझ्या अतृप्त, उपेक्षित, सुखाशापूर्ण आयुष्याचा शेवटचा अभिनय तुझ्या समोरच आज करून दाखवितों.

**उषा**—( भीतीनें ) अगबाई! तुम्ही हें काय बोलतां?

[ मनोरमा येते. ]

**मनोरमा**—कां बरं? हे अगदीं बरोबर बोलले.

**उषा**—( आश्चर्यानें ) म्हणजे? मला तर त्यांत कांहींच कळत नाहीं—

**मनोरमा**— केवळ तुझ्यासाठीं हे मनाच्या दारुण यातना भोगीत आहेत उषे! तुझ्यासाठीं आज हे आपल्या आप्तमित्रांनां अन् घराला पारखे झाले आहेत.

**उषा**—हें काय? मनोहरपंत—आपण दिखील—

**मनोरमा**—उषे! तुझा हा भ्रम आहे. मनोहरपंत मी नव्हे–मनोहरपंत हे! यांच्याशींच तुझं लग्न व्हावं अशी भाऊसाहेबांची अन् तुझ्या इतर आप्तमित्रांची खटपट चालली होती. भाऊसाहेबांच्या विनंतीवरून हे खरे मनोहरपंत–तुला पहायला गेले होते, आठवतं तुला? परंतु यांनीं तुझं नांव विचारलं मात्र तों यांची हेटाळणी करून तूं यांनां तेथून घालवून लावलंस. त्या दिवसापासून यांनीं तुझा सारखा ध्यासच घेतला. त्या दिवसापासून एखाद्या वेड्याप्रमाण हे कुठं तरी भटकत असतात. कां, स्तब्ध राहिलीस? मजवर तुझा विश्वास बसत नाहीं?

**उषा**—छे-पण-हे मनोहरपंत तर मग आपण कोण ?

**मनोरमा**—हे मनोहरपंत, तेव्हां मी मनोहरपंत नव्हे, हें उघड आहे. मी या खऱ्या मनोहरपंतांची भावजय-माझं नांव मनोरमा. यांच्या अन् माझ्या नांवांत पहिलीं दोन अक्षरं मात्र तींच आहेत. ( अंगावरचा झगा व डोकीचा मंदील काढते.) कॉलेजांत चारदोन काव्यं वाचून अन् थिएटरांतलीं नाटकं पाहून तूं heroine होऊन बसलीस. तुझं माथं इतकं फिरून गेलं, कीं, याच नजरबागेंत थोड्या दिवसांपूर्वीं मला पाहून अन् माझं गाणं अन् मुरली ऐकून 'romance'—'romance' ह्मणून तूं मजवर एकदम आषक्त झालीस! त्यानंतर मी तुझ्या घरीं येऊं लागल्यें- तुझे बाबाहि मला खुषाल येऊं देत असत, परंतु माझ्या खऱ्या स्वरूपाचा तुला कधीं एकवारहि नुसतां संशयसुद्धां आला नाहीं ! तुझं मस्तक एका क्षणांत इतकं भरकटून गेलं, कीं, 'मी मुळींच लग्न करणार नाहीं; लग्न ह्मणजे पुरुषाचं दास्य!' अशा वल्गना करणारी तूं या बागेंत, पुष्करणीच्या तीरावर माझं गाणं अन् मुरली ऐकून, माझ्याशीं-एका स्त्रीशीं—लग्न करायला तयार झालीस! काय ह्मणावं तुला ? छे छे ! उषे !—

**उषा**--( खालीं मान घालून ) अगबाई ! खरंच का मी इतकी वेडी होऊन गेल्यें ? मला क्षमा करा.

**मनोरमा**—छे, आतां अशी का कुठं क्षमा मिळत असत्ये ? मी काय वाटेल तें सांगितलं तरी तें ऐकेन असं तूं नुकतंच मजपाशीं कबूल केलं आहेस, त्याप्रमाणं तुला मी सांगेन तसं आतां केलं पाहिजे. मनोहरासाठीं तूं इतकी वेडी होऊन गेली होतीस; तर मग आतां या तुझ्या हृदयवल्लभाशींच तुझं लग्न होऊं दे. यांची तुला कांहींच दया येत नाहीं काय ? मघाशीं मीं ज्या पाषाणहृदयी स्त्रीचं वर्णन केलं, ती स्त्री तूंच आहेस उषे ! तुझ्यासाठीं भाऊजी वेडे होऊन, बैरागी बनून खरोखरच गृहत्याग करून निघून जात आहेत. असं प्रेमपूर्ण हृदय तुला फिरून कधीं सांपडणार नाहीं ही तुझी खात्री असूं दे. उषे ! मजवर तुझं प्रेम आहेना? मग निदान माझ्यासाठीं तरी भाऊजींशीं लग्न करायला कबूल हो. तुह्मी उभयतां एकमेकांनां अगदीं योग्य आहां. तुझ्या नकारानं मोठे अनर्थ घडतील-भाऊजी वैराग्य घेतील-त्यांचा सारा जन्म व्यर्थ होईल. उषे ! विचार कर, निष्ठुर होऊं नको.

**उषा**—( खालीं मान घालून स्तब्ध रहाते. )

**मनोरमा**—उषे ! स्तब्ध कां राहलीस ? तुझ्या या हट्टामुळं भाऊजी निराशेनं देशान्तराला जात आहेत. इकडे भाऊसाहेबहि तुझ्या हट्टानं वैराग्य घेतील ! त्यांच्या पोटीं तूं जन्म घेतलास, नाना प्रकारचे अवर्णनीय कष्ट सोसून त्यांनीं तुला लहानाची मोठी केली–त्यांनां वृद्धपणीं असं दुःख देणं तुला बरं वाटतं काय ? मजवर तुझं प्रेम आहे ह्मणून तूं मला आजपर्यंत भासविलंस,–माझ्या शब्दाचा अवमान करून तूं आतां आपलं प्रेम खोटं ठरविणार काय ? माझ्या शब्दासाठीं तरी भाऊजींशीं तूं लग्न कर. नाहीं तर मी तुला बजावून सांगत्यें उषे ! कीं, तुझ्याशीं मी अतःपर भाषणहि करणार नाहीं; इतकंच नाहीं, तर तुझा मी तिरस्कार करीन. मी तर बोलूनचालून स्त्री आहें. माझ्याशीं लग्न करायाची तुझी कितीहि इच्छा असली तरी तें शक्य नाहीं ! तुझ्या हृदयेश्वराचं नांव मनोहर–मनोरमा नव्हे ! विचारांत पडण्याचं कारण नाहीं–माझं ह्मणणं ऐक–तुला कधींहि पश्चात्ताप होणार नाहीं. उषे ! भाऊसाहेब अन् मी काय करूं तें तुझ्या हिताचंच करूं ना ?

**उषा**—( खालीं मान घालून ) इतकी का मी वेडी झाल्यें होत्यें ?

**मनोरमा**—तें अगोदर राहूं दे, माझ्या प्रश्नाचं उत्तर दे.

**उषा**—मी का आपल्याबाहेर आहें ? तरी पण आपण माझ्याशीं असं कपटानं—

**मनोरमा**—तें सारं मी तुमच्या उभयतांच्या हितासाठीं केलं. हं, भाऊजी ! आतां उशीर नको. घरीं गेल्याबरोबर जोशीबुवांकडून लग्नाचा मुहूर्त पाहिला पाहिजे.

**मनोहर**—आज बुधवारींच एक मुहूर्त होता वहिनी !

**मनोरमा**—छेः, आज कसं तें जमणार ? काय उषे ?

**उषा**—( एकीकडे ) जा गडे !—

**मनोरमा**—ही लज्जा ह्मणजे प्रेमाचं एक लक्षण आहे, समजलं भाऊजी ?

**मनोहर**—परवां शुक्रवारीं एक मुहूर्त आहे. ( उसासा टाकून ) तो चुकला तर मात्र आणखी चार दिवस मुहूर्त नाहीं !

**मनोरमा**—बरं बरं ! तें जोशीबुवा ठरवितील.

**मनोहर**—जोशीबुवाच कशाला पाहिजेत ? मला सारे मुहूर्त ठाऊक आहेत.

**मनोरमा**—अगबाई ! Philosophyबरोबर हा पंचांगाचा अभ्यास आपण कधीं केलात तरी ? जोशीबुवांच्या पोटावर तुह्मीं पाय आणलेत

ह्मणायचे ! पंचांगांतले सारे विवाहमुहूर्त तुह्मीं तोंडपाठ करून ठेवले आहेत वाटतं ? पाहिलंस उषे ! तुझ्यासाठीं भाऊजी किती वेडे झाले आहेत ते ?

**उषा**—झाली आपली थट्टा सुरू ! मी जात्येंच मुळीं— [ जाते.

**मनोरमा**—काय ? भाऊजी ? सारं जमलं तुमच्या मनासारखं ? आतां 'गरज सरो, वैद्य मरो' असं मात्र करूं नका. बक्षीस आहे का लक्ष्यांत कबूल केलेलं ?

**मनोहर**—लग्न झालें कीं दुसऱ्या दिवशीं तुझ्या हातीं हरिणांची जोडी पडली समज !

**मनोरमा**—अस्सं ! लग्नाच्या अगोदर बक्षीस द्यायला धीर नाहीं वाटतं होत ? हो, कदाचित् सारंच ओंफस झालं तर ? पण अनाथबालिकाश्रमाचे पैसे मात्र विसरूं नका हो !

**मनोहर**—अरे बापरे ! हें काय ? दादा अन् भाऊसाहेब याच वेळीं इकडे कुठून आले ? चल, वहिनी, ही सारी तुझी लबाडी दिसते. तूं जिकडे तिकडे डंका पिटलास वाटतें ?

**मनोरमा**—काय, इतक्यांत इतकी कृतघ्नता ? आली तर आली मंडळी—सीमान्तपूजन इथंच उरकून घेऊं.

**मनोहर**—चल चल ! तुझी आपली भलतीच थट्टा–आता इथं राहून उपयोग नाहीं–मला या बैराग्याच्या वेषांत पाहून दादा अन् भाऊसाहेब ह्मणतील तरी काय ?

**मनोरमा**—प्रेमाच्या फंदांत पडतांना कांहीं पुढचामागचा विचार होता का ?

**मनोहर**—आतां 'यः पलायते स जीवति !'

[ त्वरेनें जातो.

[ माधव येतो. ]

**माधव**—तूं सांगितल्याप्रमाणें भाऊसाहेबांनां घेऊन मी आलों आहें. बरें, तुमच्या इकडली काय हकीगत ? सारें नीट पार पडलें ना ? भाऊसाहेब तर अगदीं मुहूर्तनिश्चय करण्याच्या तयारीनेंच आले आहेत ह्मणेनास ? बरें, picnic ची व्यवस्था ठीक आहे ना ?

**मनोरमा**—ती सर्व व्यवस्था मधुकरावर सोंपविली आहे. त्याच्याकडून कधीं चुकी व्हायची नाहीं.

**माधव**—बरें, इकडची काय हकीगत ?

**मनोरमा**—हकीगत दुसरी काय असायची आहे? उषेच्या साऱ्या भ्रमाचं निरसन होऊन भाऊजींशीं लग्न करायला तिची संमति मिळाली. आतां आपण लग्नाच्या तयारीला अगदीं जारीनं लागलं पाहिजे हो. आपले बंधु इतके अधीर झाले आहेत, कीं, पंचांगबिंचांग स्वतःच पाहून त्यांनीं परवां शुक्रवारचा मुहूर्त निश्चित केला दिखील! आज बुधवार–मध्यें अवघे चोवीस तासच राहिले.

**माधव**—वः, फार उत्तम! उषेचें सारें वेड गेलें एकूण?

**मनोरमा**—तर मग तोतया मनोहराशीं तिनं लग्न करावं असं का आपलं म्हणणं? हे भाऊसाहेब आले वाटतं? मी जात्यें तर—

**माधव**—अंः, त्यांनां कांहीं लाजायला नको–ते नानासाहेबांसारखेच आहेत तुला.

[ भाऊसाहेब प्रवेश करितात. ]

**भाऊसाहेब**—काय माधवराव? इथें मनोरमाबाई आहेत वाटतें? मनोरमाबाई! तुमचे सर्व मनोरथ ईश्वर पूर्ण करो. उषा आली ना आतां नीट शुद्धीवर?

**माधव**—परवां शुक्रवारीं लग्नाचा मुहूर्त आहे–त्या दिवशींच—

**मनोरमा**—मी उषेलाच इथं आणत्यें बोलावून.

[ जाते.

[ मधुकर प्रवेश करितो. ]

**भाऊसाहेब**—काय तुम्हीहि आलांत? फार आनंदाची गोष्ट आहे. माधवराव! आमचे हे विश्वंभर–नव्हे–मधु-मधुसूदनराव फार योग्य गृहस्थ आहेत.

**मधुकर**—( हंसून ) भाऊसाहेब! माझें नांव मधुकर!

**भाऊसाहेब**—हो हो! मधुसूदन नव्हे–मधुकर–मधुकर! आतां नाहीं मी कधीं विसरणार.

**मधुकर**—( माधवाला एकीकडे ) दादासाहेब! वहिनींच्या सांगण्याप्रमाणें पलीकडल्या बंगल्यांत सर्व व्यवस्था जय्यत आहे. इथली सारी हकीगत मनोहरानें मला सांगितली—

**माधव**—परवां शुक्रवारचा मुहूर्तहि ठरला मधु!

**मधुकर**—तेंहि ऐकलें मीं. दादासाहेब! हा आनंदाचा प्रसंग केवळ वहिनींच्या करामतीनें आला. बरें, आपण एकदा तिकडे येऊन गेलां तर बरें होईल.

**माधव**—चल, या मुलीहि इकडेच येत आहेत. भाऊसाहेबांनां अन् उषेला बोलायला आपण एकान्त करून द्यावा, तें बरें.

[ दोघे जातात.

[ दुसऱ्या बाजूनें उषा व सुशीला येतात. ]

**भाऊसाहेब**—ये ये पोरी! माझी गुणांची लक्ष्मी ती! मनोहरपंतां-सारखा पति तुला कधींहि मिळायचा नाहीं. माझा म्हाताऱ्याचा शब्द ऐक. माझें हें म्हणणें तूं जर ऐकलेंस नाहींस, तर पोरी, मी कांहीं आतां संसारांत रहायचा नाहीं. काशीला जाऊन संन्यास घेईन, ही तुझी खात्री असूं दे.

**उषा**—( खालीं मान घालून ) बाबा! आपल्या आज्ञेबाहेर का मी आहें? आजपासून आपल्या शब्दाबाहेर एक केंसभरहि जायचं नाहीं असा मीं निश्चय केला आहे.

**भाऊसाहेब**—( उषेला जवळ घेऊन तिच्या पाठीवरून हात फिरवीत ) माझी गुणांची पोर-माझी सोन्याची लक्ष्मी! पोरी, तुझ्यावर माझा सारा जीव. पोरपणाच्या भरांत थोडेंसें भ्रमिष्ट झालेलें तुझें डोकें शुद्धीवर आलेलें पाहून माझा आनंद गगनांतहि मावेनासा झाला आहे! अन् सुशीले! तुझे यज-मानहि आजच इकडे आले आहेत तुला घेऊन जाण्यासाठीं. तुम्ही इकडे निघून आल्यावर विद्याधरपंत आले. पांचसात दिवस रहाणार आहेत—

**सुशीला**—मी नाहीं जाणार मामा!

**भाऊसाहेब**—काय? जाणार नाहीं? अन् तें कां पोरी! वेडी कुठली! नवऱ्याबरोबर जायचें नाहीं? विद्याधरपंत हल्लीं कोण आहेत, आहे ठाऊक? हल्लीं ते विक्रमपुर संस्थानचे दिवाण् झाले आहेत दिवाण! समजलीस? दिवाणच काय? परंतु विद्याधरपंतांसारख्या बुद्धिमान् विद्वान् तरुणाला कोणती जागा मिळणें अशक्य आहे? अन् दिवाणे! त्यांच्याबरोबर जायचें नाहीं म्हणतेस का? विक्रमपुरला त्यांचें वैभव केवढें आहे, आहे ठाऊक? एक बडा थोरला बंगला, शिपाई प्यादे, नोकरचाकर-सर्व कांहीं थाटांत! असें वैभव तुला नकोसें का झालें आहे? खुळी पोर! विद्याधरपंतांनां हें समजलें तर ते म्हणतील तरी काय सुशीले?

**सुशीला**—मी का बरोबर जायला नाहीं ह्मणलें मामा? पण उषेचं लगिन झाल्याशिवाय मात्र नाहीं मी जाणार?

**भाऊसाहेब**—तें तर उघड आहे. अन् मी तरी तुला अगोदर जाऊं देईन का पोरी?

**सुशीला**—( उषेला एकीकडे ) गडे उ! विक्रमपुरचे दिवाण व्हायचं! बंगला, शिपाई, थाटमाट! आतां मी कां बरं जाणार नाहीं? तिथं romance खूब असेल!

**उषा**—( एकीकडे ) सुशीले! आजपर्यंत झालं तें झालं, आतां हें सारं romanceचं वेड टाकून दे कशी!

**भाऊसाहेब**—तुह्मां दोघीजणींच्या वर्तनानें आज मला किती सुख होत आहे ह्मणून सांगूं? ईश्वर तुह्मां दोघींनां अन् तुमच्या पतींनां चिरसुखांत ठेवो, अन् आजपर्यंतच्या खुळाचा तुह्मांला पुनः कधीं स्पर्शहि न होवो, असा मी अंतःकरणापासून आशीर्वाद देतों.

**उषा**—बाबा! आजपर्यंत मीं तुह्मांला किती तरी कष्ट दिले—मला क्षमा—

**भाऊसाहेब**—पोरी! माझी का क्षमा मागतेस? तूं एवढीशी होतीस, तेव्हांपासून माझ्या संसाराचें बंधन तूंच आहेस अशी भावना धरून मी संसारांत राहिलों, अन् तुला लहानाची मोठी केली—तुजवर मी कधीं रागावणें तरी शक्य आहे का? माझी कसली क्षमा मागतेस पोरी?

**सुशीला**—हे उषेचे भाऊजी येताहेत तुमच्याकडे. आह्मी तोंपर्यंत जातों मामा!

[ दोघी जातात.

[ माधव प्रवेश करतो. ]

**माधव**—भाऊसाहेब, जरा एकदा तिकडे यायला पाहिजे आपणाला.

**भाऊसाहेब**—माधवराव! याच बैठकीला आपण लग्नासंबंधानें सर्व व्यवस्था ठरवूं या. मनोरमाबाईहि इथेंच आहेत.

**माधव**—आह्मी आपल्या शब्दाबाहेर मुळींच नाहीं. परंतु एकदा आपण जरा त्या बंगल्याकडे चला, कांहीं जरूरीचें काम आहे.

**भाऊसाहेब**—चला—माधवराव! नानासाहेब जर आज जिवन्त असते, तर त्यांनां किती आनंद झाला असता ह्मणून सांगूं? तुह्मी आह्मांला पदरांत घेतलेंत—

**माधव**—आपणाला मी नानासाहेबांच्या जागींच समजतों.

[ दोघे जातात.

[ उषा आणि मनोहर यांनां ओढीत मनोरमा प्रवेश करते. ]

**मनोरमा**—उषे! तशी कांहीं मी तुला सोडायची नाहीं. कुठं पळून चाललीस? भाऊजींच्यापेक्षां तुजवर माझाच हक्क अधिक आहे. अन् तूं हें कबूल केलंहि आहेस. अन् भाऊजी! तुह्मीदिखील हें नीट ध्यानांत टेवा, समजलांत?

**मनोहर**—वहिनी! तुझे मी उपकार कसे फेडूं? जन्मजन्मान्तरीं तुझा गुलाम होऊन जरी मीं तुझी एकनिष्ठपणें सेवा केली, तरीहि तुझ्या उपकारांची माझ्यानें अंशतःसुद्धां फेड व्हायची नाहीं.

**मनोरमा**—माझे तुमच्यावर काय उपकार झाले असतील ते एकदोन जन्मांत तुमच्याकडून मी कसेबसे फेडून घेईन–परंतु असलीं नाटकी भाषणं आपल्या या प्रणयिनीपुढं फारशीं कधीं करित जाऊं नका हो! नाहीं तर माझा सारा खटाटोप व्यर्थ जाईल!

**उषा**—त्याबद्दल आपण आतां कांहीं काळजी करूं नये! मला माझ्या पूर्ववर्तनाचा पूर्ण पश्चात्ताप झाला आहे.

**मनोहर**—वहिनी! मी तुला खरोखरच सांगतों, कीं, या महिन्यांत माझा जर विवाह होण्याची कांहींसुद्धां आशा नसती, तर मी बैरागी बनून—

**मनोरमा**—पसार झालों असतों—हेंच कीं नाहीं? कुणाला सांगतां हें?

**मनोहर**—कां बरें? तूं मला ओळखीत नाहींस का वहिनी?

**मनोरमा**—पुरी ओळखलें, आपण बडे विरही आहां! विरहाचीं लक्षणं तर आपल्यांत अलीकडे स्पष्ट दिसूं लागलीं आहेत. आपण डोकीच्या केशांनां अलीकडे भांग पाडीत नाहीं! कोटाची बटणें जाकिटाला अन् जाकिटाचीं कोटाला लावतां! एक शर्ट आपणाला अलीकडे दोन दिवस चालतो. विरहाचीं हीं लक्षणं तुमच्या कालिदासानं तरी आपल्या विरही यक्षाच्या ठिकाणीं दाखवलीं आहेत का? अन् ह्मणे कविकुलगुरु! उषे! भाऊजींचा हा जाडा विरह तुझ्यासाठीं बरं!

**मनोहर**—वहिनी! तूं किती थट्टा केलीस तरी मी आजपर्यंत विरह-यातना काय भोगल्या त्या माझ्या मला ठाऊक!

**मनोरमा**—भाऊजी! उषे! तुमचे सर्व मनोरथ परिपूर्ण झालेच आहेत. तरी या नाटकाचा गोड शेवट करण्याकरतां पुनः मी तुह्मांला विचारतें, तुमची आतां काय इच्छा आहे?

**मनोहर**—माझी इच्छा एवढीच आहे, कीं, भरतखंडांत उत्तरोत्तर स्त्रीशिक्षणाचा जारीनें प्रसार होऊन तुझ्यासारख्या अनेक विद्याविनयसंपन्न स्त्रिया निपजोत, आणि आपल्या समाजाच्या उन्नतिसाधनांत आपल्या सहचरांना मनःपूर्वक साहाय्य करोत.

**मनोरमा**—तथास्तु.

शेवटचा पडदा पडतो. ]

संपूर्ण.